# हाकारा

वर्ष एकोणिसावे • अंक ३ व ४

जुलै-डिसेंबर १९९८



## आदिवासी समाज व संस्कृती : संशोधनात्मक अभ्यास

जव्हार

# सूची


१) जानेवारी - मार्च १९८० - जबरन जोत जंगल जमीन

२) एप्रिल - जून १९८० - आदिवासी व शिक्षण

३) जुलै - सप्टेंबर १९८० - आदिवासी व वनसंवर्धन

४) ऑक्टोबर - डिसेंबर १९८० - आदिवासी साहित्य व कला

५) जानेवारी - मार्च १९८१ - दलितांना सवलती व राखीव जा. माहिती

६) एप्रिल - जून १९८१ - आदिवासी व आरोग्य

७) जुलै - सप्टेंबर १९८१ - रोजगार हमी योजना

८) ऑक्टोबर - डिसेंबर १९८१ -

९) जानेवारी - मार्च १९८२ - उत्ताराखंड अभ्यास मोहीम

१०) एप्रिल - जून १९८२ - धरणे व विकास

११ - १२) जुलै - डिसेंबर १९८२ - जंगल व्यवस्थापन

१३) जानेवारी - मार्च १९८३ - आदिवासी व दारू

१४) एप्रिल - जून १९८३ - आदिवासींच्या सामाजिक / राजकीय चळवळी

१५) जुलै - सप्टेंबर १९८३ - प्रा. सरदार गौरव अंक / आदिवासी साहित्य

१६) ऑक्टोबर - डिसेंबर १९८३ - आदिवासी साहित्य व सामाजिक प्रश्न

१७ - १८) जानेवारी - जून १९८४ - आदिवासींमधील स्वयंसेवी कार्य

१९) जुलै - सप्टेंबर १९८४ - आदिवासी स्त्री

२०) ऑक्टोबर - डिसेंबर १९८४ - आदिवासी आरोग्य व शिक्षण

२१) जानेवारी - मार्च १९८५ - आदिवासी संघटन

२२) एप्रिल - जून १९८५ - जमीन हस्तांतर

२३) जुलै - सप्टेंबर १९८५ - आदिवासी महिला

२४) ऑक्टोबर - डिसेंबर १९८५ - आदिवासी व सरकार

२५) जानेवारी-मार्च १९८६ - जंगल व धरण

२६) एप्रिल - जून १९८६ - आदिवासी कला

२७) जुलै - सप्टेंबर १९८६ - आदिवासी व वेठबिगारी

२८) ऑक्टोबर - डिसेंबर १९८६ - आदिवासीविषयक ग्रंथ मानवशास्त्र परिचय

२९) जानेवारी - मार्च १९८७ - भटक्याविमुक्त जमातींचे प्रश्न

३०) एप्रिल - जून १९८७ - आदिवासी आणि सांस्कृतिक बदल

३१ - ३२) जुलै - डिसेंबर १९८७ - राष्ट्रीय वननीतीचा प्रश्न

३३) जानेवारी - मार्च १९८८ - सवलती अपहरणाची समस्या

३४) एप्रिल - जून १९८८ - आदिवासी साहित्य

३५ - ३६) जुलै - डिसेंबर १९८८ - आदिवासी समाज व संस्कृती

३७ - ३८) जानेवारी - जून १९८९ - डॉ. वेरीअर एलवीन विशेषांक

३९ - ४०) जुलै-डिसेंबर १९८९ - व्यवसाय मार्गदर्शन

४१ - ४२) जानेवारी - जून १९९० - महाराष्ट्रातील आदिवासींची पांगस्थिता

४३) जुलै - सप्टेंबर १९९० - जागतिक आदिवासी

४४) ऑक्टोबर - डिसेंबर १९९० - गं. बा. सरदार स्मृति विशेषांक

४५ - ४६) जानेवारी - जून १९९१ - आदिवासी साहित्य संमेलन विशेषांक

४७) जुलै - सप्टेंबर १९९१ - आदिवासींच्या विकासात्मक व सांस्कृतिक समस्या

४८) ऑक्टोबर - डिसेंबर १९९१ - आदिवासी जीवन व संस्कृती

४९ - ५०) जानेवारी - जून १९९२ - सर्वसाधारण आदिवासी

५१ - ५२) जुलै - डिसेंबर १९९२ - अनुताई वाघ विशेषांक

५३ - ५४) जानेवारी - जून १९९३ - आदिवासी धर्म, सण व उत्सव

५५ - ५६) जुलै - डिसेंबर १९९३ - धरण-विस्थापन व पुनर्वसन

५७) जानेवारी - मार्च १९९४ - सर्वसाधारण आदिवासी

५८) एप्रिल - जून १९९४ - आदिवासी एकता परिषद

५९) जुलै - सप्टेंबर १९९४ - आदिवासी विकासाची सैद्धान्तिक भूमिका

६०) ऑक्टोबर - डिसेंबर १९९४ - आदिवासी जमाती

६१ - ६२) जानेवारी - जून १९९५ - राणीपूर विशेषांक

६३) जुलै - सप्टेंबर १९९५ - कुपोषण विशेषांक

६४) ऑक्टोबर - डिसेंबर १९९५ - पर्यावरण विशेषांक

६५) जानेवारी - मार्च १९९६ - आदिवासी जमाती

६६) एप्रिल - जून १९९६ - महाराष्ट्र, ओरिसा अभ्यास दौरा

६७) जुलै - सप्टेंबर १९९६ - आदिवासी जमाती

६८) ऑक्टोबर - डिसेंबर १९९६ - आदिवासी शिक्षण

६९ - ७०) जानेवारी - जून १९९७ - वारली लोकगीते व बोलीभाषा विशेषांक

७१) जुलै - सप्टेंबर १९९७ - पंचायत राज विशेषांक

७२) ऑक्टोबर - डिसेंबर १९९७ - साहित्य संमेलन विशेषांक

७३) जानेवारी - मार्च १९९८ - वृक्ष लागवड व संवर्धन विशेषांक

७४) एप्रिल - जून १९९८ - सर्वसाधारण आदिवासी

कै. श्री. मणिभाई देसाई

यांच्या स्मृतीस सविनय अर्पण

*Dedicated to the memory of the Late Shri Manibhai Desai*

# आदिवासी विकासाची दिशा

(आदिवासी जीवन, संस्कृती विषयक पायाभूत अभ्यास)

# Prospect for Development

(Baseline Studies in Tribal Culture)

भारतीय कृषी-औद्योगिक प्रतिष्ठान (बायफ), पुणे

यांचे करिता

For

Bharatiya Agro-Industries Foundation (BAIF), Pune


**महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद, पुणे**

**The Maharashtra Association of Anthropological Sciences (MAAS), Pune.**

१९९४

**1994**

# संशोधन गट

मुख्य संशोधक : **प्रा. रा. के. मुटाटकर**
सचिव, महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

सह संशोधक : **डॉ. राम गंभीर**
व्याख्याता, मानवशास्त्र विभाग, पुणे विद्यापीठ

**डॉ. वि. श्री. कुलकर्णी**
प्रपाठक, मानवशास्त्र विभाग, पुणे विद्यापीठ

**डॉ. पराग माणकीकर**

संशोधन सहाय्यक : **श्री. पुरुषोत्तम आगाशे**

**कु. सुनंदा भागवत**

**श्री. सुमेध गुर्जर**

**कु. आरती कौलगेकर**

**कु. सुषमा कुलकर्णी**

**श्री. नरेंद्र सिंग**

**कु. हेमा पिसाळ**

सल्लागार : **डॉ. विजय भानू**
प्रपाठक, मानवशास्त्र विभाग, पुणे विद्यापीठ

कष्टकरी जनता, भूषण भारता, वंदन करितो पददलिता !

महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे त्रैमासिक

# हाकारा

## अनुक्रमणिका


- संपादकीय : ४
- Editorial : ५
- Jawhar Baseline Study : ६
- Summary : ९
- प्रास्ताविक : १२
- पायामूत अभ्यास सारांश : १५
- गावांची माहिती : १८
- आर्थिक परिस्थती : २५
- जीवनचक्र : ३७
- धामिक जीवन : ४९
- समाज जीवन व बदल : ५५
- स्त्रियांचा सामाजिक दर्जा : ६०
- आरोग्य संस्कृती : ७७
- ऋणनिर्देश : ९९
- संपादकास पत्र : १००


अनुवाद : पुरुषोत्तम आगाशे, सौ. मोहिनी पोतनीस, सौ. मुग्धा लेले, सोनाली नगरकर, अभय कुदळे

वर्ष एकोणिसावे :
अंक - तिसरा-चौथा
जुलै-डिसेंबर १९९८

**पत्रव्यवहाराचा पत्ता**
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद
६४, आनंद पार्क, औंध,
पुणे - ४११ ००७.
फोन : ३८७२१९

**संपादक**
रामचंद्र मुटाटकर

**कार्यकारी संपादक**
पुरुषोत्तम आगाशे

**छायाचित्रे**
पराग माणकीकर

**मूल्य रू. ३०/-**

**प्रकाशक**
रा. के. मुटाटकर
सचिव, महाराष्ट्र मानव विज्ञान
परिषद यांच्यासाठी
असाईन सिस्टीम्स्
६६७, दत्तवाडी, पुणे ३०
येथे छापून पुणे येथे प्रसिध्द केले

**अक्षरजुळणी**
सन ग्राफीक्स,
दत्तवाडी, पुणे ३०.

अंकात व्यक्त झालेल्या लेखकांच्या विचारांशी किंवा मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# संपादकीय

ठाणे जिल्ह्यातील जव्हार तालुक्यात आदिवासींचे जीवनमान सुधारण्यासाठी 'बायफ' (भारतीय ॲग्रो इंडस्ट्रीज फाउंडेशन) या संस्थेने वाडी प्रकल्प सुरु केला आहे. आर्थिक व सामाजिक विकासामुळे रोगराई कमी होऊन आरोग्य सुधारते असा प्रगत पाश्चिमात्य राष्ट्रांचा अनुभव आहे. या सिध्दांताची पडताळणी करावयाची झाल्यास विकास कार्यात अग्रणी असलेल्या 'बायफ' सारख्या संस्थेने पुढाकार घेणे क्रमप्राप्त आहे. सर्वंकष पायाभूत संशोधन - अभ्यास करणे महत्वाचे आहे. त्यामुळे कार्यक्रम राबविल्यावर काही वर्षांनी शास्त्रीय मुल्यमापन करणे सोयीचे ठरते. अशा पायाभूत अध्यनातून व मुल्यमापानातून ध्येय-धोरणांची योजना व अंमलबजावणीस मदत होईल.

हाकाराचा हा जोडअंक चार वर्षांपूर्वी केलेल्या पायाभूत अभ्यासाच्या अहवालावर आधारित आहे. महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेने मानवशास्त्र व आरोग्यशास्त्रात प्रवीण असलेल्या विद्यार्थी व सहकारी यांच्या मदतीने आदिवासींमध्ये राहून जलद अभ्यास पध्दतींचा वापर करून शास्त्रशुध्द पध्दतीने अभ्यास केला. संख्यात्मक व गुणात्मक दोन्ही पध्दतींचा सुरेख मिलाफ म्हणजे हा अहवाल, जो या जोडअंकात सादर करण्यात येत आहे. याचा उपयोग इतर स्वयंसेवी संस्थांना होईल असा आम्हास विश्वास वाटतो.

महाराष्ट्रातील आदिवासी मुलांचे कुपोषण हा आता दरसालचा आरोग्य व राजकीय प्रश्न बनला आहे. आमच्या प्रत्यक्ष संशोधनातून, अभ्यासाच्या वर्षात नवजात बालकांच्या मृत्यूचे प्रमाण ३०% एवढे प्रचंड आढळले. लोकांना स्वत:च्या उत्पादनावर संक्रांत किंवा शिमग्याच्या पलीकडे जगता येत नाही. त्यामुळे कामासाठी शहरी भागात स्थलांतर ही नित्याची बाब आहे. हे थांबविण्यासाठी वाडी प्रकल्प हा एक चांगला उपाय आहे. या प्रकल्पाचा आदिवासींच्या एकंदर संस्कृतीवर, आरोग्यावर काय परिणाम होतो हा मूल्यमापनाचा विषय आहे.

पायाभूत संशोधन-अध्ययनात आदिवासी जमाती व ते राहात असलेल्या गावांची तुलनात्मक माहिती सादर केली आहे. त्या अंतर्गत त्यांची संस्कृती म्हणजे आर्थिक, सामाजिक, धार्मिक, स्त्रीयांचा दर्जा, आरोग्य व रोगराई याबाबत प्रत्यक्ष गोळा केलेली माहिती देण्यात आलेली आहे. जन्म-मृत्यूचे संस्कार, सण, समारंभ, कर्जबाजारीपणा, आहार-पोषण, शेती उत्पादन, शेतीचे नवीन तंत्रज्ञान इ. सर्व माहिती गोळा करण्यात आली.

शास्त्रीय माहिती थोड्या वेळात कशी गोळा करावयाची याचा अनुभव महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेस आहे. तसेच त्याचे विश्लेषण कसे करावे याचाही अभ्यास व अनुभव आम्हास आहे. विद्यार्थी, प्राध्यापक, स्वयंसेवी संस्थांचे कार्यकर्ते यांची मागणी झाल्यास संशोधन पध्दतीचे ज्ञान कार्यशाळेच्या स्वरूपात त्यांच्यापर्यंत पोहोचवण्याची जबाबदारी महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद घेण्यास तयार आहे.

हाकाराचा या जोडअंकाबद्दल आपल्या प्रतिक्रियांची आम्ही अपेक्षा करीत आहोत. वाचकांस व हितचिंतकांस नववर्षाच्या शुभेच्छा.

**३१ डिसेंबर १९९८** **रा. के. मुटाटकर**

# EDITORIAL

This issue of HAKARA, the quarterly magazine of The Maharashtra Association of Anthropological Sciences (MAAS) is based on the baseline study undertaken for Bharatiya Agro Industries Foundation (BAIF) in selected villages of tribal Taluka of Jawhar in Thane district in Western Maharashtra.

It is strongly argued that the communicable diseases disappeared from the West as a result of general socio-economic development much before the drugs were found for the cure of these diseases. In order to test this hypothesis, BAIF decided to introduce development inputs; in the poverty striken tribal areas in Thane District. With an experience of improving the quality of life among tribals, as a result of general development efforts, BAIF has been the most suitable agency to undertake such a task, initiated by the late Shri. Manibhai Desai.

Scientific testing of hypothesis of this nature needs proper evaluation of the project estimating the improvement in health status as a result of development inputs. Baseline study conducted by MAAS is a first step towards this objective. Subsequently, concurrent evaluation of the health & development relationship could be undertaken at periodic intervals.

This number of HAKARA has presented the philosophy and methodoloy adopted to undertake the baseline study. The village profiles of study village, ethnography of tribal group detailing the economic organisation, religion organisation and status of women, besides data on nutrition, anthropometry, health behaviour, morbidity, mortality, disease burden and issues concerning maternal and child health have been presented. The baseline study was designed to help planning of intervention packages and consequent evaluation. These presentations of methodology, data and its analysis would undoubtedly help voluntary organisations in planning and executing similar studies.

Discussion of malnutrition of tribal children in Maharashtra has become a political issue and the measures taken are epirsodic and sporadic. The study team has reported 30% infant mortality in the study year. Food security beyond January and March-April is widespread, forcing migration of tribals to urban areas to work at construction sites. The Wadi project initiated by BAIF is a step in the correct direction to increase food security and prorvide avenues of income on their own land or wasteland. The impact of wadi project on their culture including health is a matter for assessment.

Maharashtra Association of Anthropological Sciences has the expertise and experiance of undertaking scientific investigation in tribal areas in Maharashtra and outside. We are willing to organise training workshops in qualitative, quantitative and rapid assessment procedures for the students, teachers and workers of voluntary organisations.

We look forward to reactions to this number of HAKARA. As decided earlier, a summary of the issue has been presented in English language. The original report in English need to be published.

With every good wish for the NEW YEAR

**- R. K. Mutatkar**

# JAWHAR BASELINE STUDY

## INTRODUCTION

Primary Health Care approach has strengthened the philosophy of intersectoral coordination, emphasising the role of non-conventional health inputs in health development. The impact of general socio-economic development on health and disease control in western countries has been accepted as a proved hypothesis. To study the impact of development on health can therefore be a researchable area by undertaking a prospective study.

BAIF has undertaken poverty alleviation programmes using wasteland development schemes as an entry point popularly known as wadi project. The studies in Vansda in Gujrat clearly indicate the improvement in the quality of life by improvement in the economic status with the spin off effects on other aspects of life.

If a prospective intervention study on impact of development on health has to be undertaken, it becomes necessary to build the monitoring and evaluation system in the study itself. Since BAIF is in the process of introducing development inputs as Wadi project in the tribal areas of Jawhar tehsil, Thane district in the State of Maharashtra, it was found necessary to undertake a baseline study which would help in the monitoring and subsequent evaluation at periodic intervals.

The baseline survey was to include both the qualitative and quantitative indicators,such as, village survey, family survey, sociocultural profile, nutrition and diet survey, including anthropometry of under fives, health and ethnomedicine, status of women, and economic and agricultural activies.

## METHODOLOGY

The data was collected with the use of both qualitative and quantitative research tools. The villages were selected by purposive selection. i. e. the villages selected by BAIF for Wadi project. The families selected as acceptors of Wadi project were taken in the sample for study. similarly wadi non participant families were also selected to serve as control for future studies. Since the Wadi project has just begun, no difference was anticipated in the Wadi acceptors and non-wadi tribals at the baseline study.

The following villages were selected :

1. Sakharshet - Umbarvihir
2. Vavar - Behedpada
3. Kharonda - Hedicha pada.
4. Chambharshet
5. Akra

BAIF had provided a list of families included in the wadi project. The control families were selected at random in the neighborhood of wadi families.

The proposed project was discussd between four researchers of the Maharashtra Association of Anthropological Sciences (MAAS) and the officers of BAIF for full three days. Subsequently the schedules and interview guides were designed by MAAS. A pilot team was sent to Jawhar field area to see the villages proposed to be included in the study. The BAIF field staff provided the support to MAAS team. The team assessed the possibilities of stay in the study villages, since it is always considered essential, to stay in the villages with the people who are to be studied.

A team of 23 researchers was selected for undertaking essentially the collection of quantitative data. Of these, about 8 researchers were to stay back for collecting exclusively qualitative data.

A one day workshop was organised of these researchers on 8 January 1994 to discuss nature and canvas of field work. Datailed discussion was held of the schedules for family data, nutritional survey, morbidity survey and the qualitative data collection about health and health behaviour and the status of women. The traditional methods of collecting ethnographic information covering all aspects of culture were also highlighted.

The researchers were divided into three teams to study respectively Sakharshet, Vavar and Chambharshet-Kharonda area. However, due to heavy rains, accessibility to Vavar was affected for about a week. As a result, the teams meant for Sakharshet and Vavar were merged to form one team. The quantitative data was collected during 11 January to 20 January 1994. The qualitative data was also collected during this period. However, the team of 8 researchers stayed back till 28 January to collect exclusive qualitative data.

The research teams stayed in villages. amongst the people, hiring a hut or a part of it. Local hands were hired to cook food. There were problemes about cooking utensils. The local cooks brought utensils from their homes which were very insufficient.

The following tools and techinques

were used for the collection of primary data.

1. Village profile : A guide was prepared to collect the follwoing information -

a) Population and land

b) Transport and communication

c) Public amenities and facilites

d) Developmental activities

2. Household Schedule: A structured schedule to collect the following data -

a) Family census

b) Economic data including land holding, cattle, house types and material artifacts, income, expenditure, credit, food security and migration. This also included morbidity, mortality data and diet survey.

3. Data was collected on the following on the basis of semistructured guidelines

a) Diet of children

b) Diet of lactating mothers

c) Morbidity history of children under 5

d) History of most recent pregnancy and delivery

4. Nutritional assessment, diet survey by weighment method and Anthropometry.

5. Semi-structured interview guide to collect information on health behaviour.

6. Informal interviews to collect ethnographic data, data about status of women and health behaviour.

## ANALYSIS

Quantitative data was analysed at the BAIF computer centre with the use of SPSS package. The point of debate was as to whether the data was to be analysed villagewise or tribewise. Although the analysis has been done on both the counts, it has been strongly felt that the development motivation would diffuse on kinship lines necessitating tribewise presentation. Analysis of Wadi participants has not been separately attempted since at the level of baseline, both the groups would show similar results. However the data is available for future analysis.

It may be advisable to undertake comparisons with other BAIF projects of similar nature as also data from the state of Maharashtra and India.

# SUMMARY

The baseline study of the culture of the tribals in selected villages in Jawhar Taluka of Thane district, Maharashtra has been undertaken to prepare a scientific base for designing intervention packges so as to study its impacton development in few years time. The study will help to devise process documentation and evaluation in areas where quantitative indicators are found difficult.

The villages range from 20 kms to 40 Kms from the Taluka place Jahar, connected mostly by kachha roads with seasonal public transport available. The nearest permanent market, bank, veterinary dispensary and police station are equally distant from study villages. The primary Health Centre or the Primary Health Unit are however within reach, although its utilisation is not ideal. Distance of police station would indicate functioning local systems which ensure law and order and do not warrant external controls. The level of illiteracy ranges from tribewise variations of 54 % to 77% excluding the age group upto 5 years, but including those attending Balwadi. Over the years, village Sakharshet has developed some facilities like grocery shops and the flour mills, besides having a PHC.

The major tribal groups ranging in population size are respectively Warli, Kokna and Thakar, while other tribals include Dhor Koli. Malhar Koli and others, However, on the basis of literacy and economic indicators, the ranking is in the descending order of Kokna, Thakar, Warli and other groups. The Wadi acceptors as at present range in the order of Kokna, closely followed by Warli and Thakar and others lagging behind.

Tribal economy is a subsistence economy. Kokna possess more land, more than 5 and 10 acres followed by Thakar and Warli, while more Warliare landless. The tribls do not report starvation, a small percentage report missing one meal out of three during summer. However, the proportion of migration for work and borrowing in cash and kind for meeting food scarcity are indicators of shortfall in agricultural production. Warli top in borrowing in general, and specifically to meet food shortages, while Kokna borrow for managing sickness and to meet marriage expenditure. 43% of the loans are taken form financial insuitutions while 57% are drawn from informal sector like friends, relatives and money lenders.

Out migration for work is as high as 82% in the total population, meaning the migration of atleast one male member per family. Predictably Warli and Thakar

migrate more than the Kokna.

The cash economy has entered tribal belt by way of wages earned in migratory jobs. Local payments continue to be made in grain. At weeky markets, purchase of food items and vegetables continue to be exchanged in barter.

The data on morbidity in the month of December. 1993 which is usually labeled as healthy season, brings out 43% cases of total morbidity under 5 children, females leading the males. Of these, fever tops the list followed by diarrhoea and other intestinal problems. The utilisation of government facilities of health care is good, around 59% while around 20% people have contacted Bhagat as the first or second contact. They have their own clasification as to the diseases like diarrhoea and fevers being controlled by doctors while the Bhagats ward off evils due to spirit and ghosts and ensure preventive care of health and increased production.

Infant mortality under 12 months show more mortality under 1 month, males out numbering females in all ages. The major causes of infant deaths appear to be measles, followed by diarrhoea and low birth weight. The number of deaths in the first month are same as that from 1 month to 1 year. Diarrhoea has also been killer under 5 population during the last two years, again male out numbering the weaker sex in mortality. There has been only one maternal death.

People are aware about the relationship of diarrhoea with water and belives that medicine put in water may prevent its occurence. In diarrhoea blood gets converted to water according to them and body becomes cold.

Due to the custom of bride price, tribal women enjoy better status than the caste Hindu women. Divorce and widow remarriage are easy. In the patriarchal society of tribals, boys are perferred to girls, although girls are not shunned. In case of divorce. usually sons are left with father to get share in property while the girls go with the mother. Desertion of women is a non-issue in tribal society.

Women enjoy greater autonomy in decision making to the extent of exercising rights over self earned income and the expenditure. Levirate and Soroate marriages are accepted but the custom is on the decline. A woman deserts a man in case of sterility and marries another to prove her fertility. However, a woman has no position in religious matters on account of pollution due to menstruation. A woman enjoys no special privileges in terms of special diet or restrictions on her work during pregnancy. After child birth, there are restrictions on diet for a month. Colostrum is given immediately after birth.

Contrary to many regions in India vasectomy is preferred to tubectomy among the tribals. Consumption of milk

by milching the cows is very uncommon as cow's milk is meant for the calves. Tribals, both man and women are given to alcohol which has become an inseparable part of social and religious rituals. people are generally aware about the importance of personal hygiene, there is no strong motivation or facilities to take remedial action in the matter.

The acceptance of Wadi technology though in its early stages has brought about changes in attitudes. They have learnt the importance of caring for plants and close monitoring. They are more busy on the land than ever before and are willing to sacrifice such traditional recreation as dance. How ever, there is a big gap between awarenss and acceptance, particularly of new varieties of crops such as wheat. Marketing of vegetables is a problem since transport is expensive to reach vegetables to the town market. There is growing awareness about the acceptance of Wadi. But meager land used for Paddy and Nagli cannot be converted into wadi for fear of shortfall in food production necessary for subsistance. Care will have to be taken that acceptance of Wadi by local 'Haves' does not lead to widening gaps between 'subsistence haves' and 'starvation have nots.'

Looking at the proportion of waste land, there is scope for waste land development and improving the land yield from cultivated fields. Gender bias not being a strong culture pattern can be used for promoting women development schemes. It appears necessary to take up special surveys on child morbidity and mortality and provide relief from diarrhoea and measles which have been the major killers. The nearest town maket is Jawhar which unless tapped may not provide real income to the people, inspite of increased production. Programmes like dairy development will need change in behaviour and faith in the production of healthy bulls, ensuring their survival, since people are not used to consumption of milk in the interest of health of the calves. There is scope for poultry and fisheries development even for increased consumption. People may respond well to technology for increased Nagli and Paddy production.

In the background of total nakedness among children in vavar in month of December, quality of life could be measured in terms of the children being clothed by their parents to protect them from inclement winter.

• • •

# प्रास्ताविक

पडिक जमिनीच्या विकास योजनेतून दारिद्रय निर्मूलनाचा कार्यक्रम बायफने हाती घेतला आहे. हा कार्यक्रम 'वाडी प्रकल्प' म्हणून ओळखला जातो. गुजरातमधील वांझदा भागातील अभ्यासातून असे आढळून आले आहे की आर्थिक परिस्थितीत बदल घडल्याने रहाणीमानाचा दर्जा तर उंचावतोच पण त्याचबरोबर जीवनाच्या अन्य गोष्टींमध्ये देखील बदल घडतो.

महाराष्ट्रातील जव्हार तालुक्याच्या (जि. ठाणे) आदिवासी भागामध्ये बायफने वाडी प्रकल्पाद्वारे विकास करण्याची योजना आखली आहे. या कार्यक्रमावर नियमितपणे देखरेख व्हावी, मूल्यमापन व्हावे यासाठी सर्वसमावेशक अशा पायाभूत अभ्यासाची गरज वाटली. या पायाभूत अभ्यासाचा उपयोग पुढील काळामध्ये या विकास कार्यक्रमामुळे होणारा बदल मोजण्यासाठी संदर्भ रेषा म्हणून उपयोगी ठरेल.

या पायाभूत अभ्यासामध्ये संख्यात्मक तसेच गुणात्मक अशी दोन्ही प्रकारची माहिती गोळा केली गेली. त्यामध्ये गावांची माहिती, कुटुंबांचे सर्वेक्षण, आहार सर्वेक्षण, शारीरिक मोजमापे, आरोग्य, पारंपारिक उपचार पद्धती, सामाजिक व सांस्कृतिक चालरिती, प्रथा, रुढी, स्त्रियांचा सामाजिक दर्जा वगैरे गोष्टींचा समावेश होता.


संख्यात्मक व गुणात्मक पद्धतीची माहिती, संशोधनासाठी वापरल्या जाणाऱ्या प्रचलित पद्धतींचा व साधनांचा वापर करून गोळा करण्यात आली. अभ्यासासाठी गावे मुद्दामच निवडली गेली, त्यासाठी बायफने वाडी प्रकल्पासाठी निवडलेली गावे हाच निकष लावण्यात आला. वाडी प्रकल्पामध्ये सहभागी झालेल्या कुटुंबांचा अभ्यासात अंतर्भाव करण्यात आला. त्याचबरोबर त्याच गावातील अन्य कुटुंबे (वाडी प्रकल्पात सहभागी न झालेली) निवडण्यात आली. एकूण पाच गावात मिळून २६० कुटुंबांचा अभ्यास केला गेला. जून १९९३ पासून वाडी प्रकल्प सुरु झाल्याने वाडी प्रकल्पात सहभागी झालेले व न सहभागी झालेले यांच्यामध्ये फारसा काही फरक नव्हता त्यामुळे विश्लेषण करताना सर्व कुटुंबांची एकत्रित आकडेवारी दिली आहे.

या अभ्यासासाठी पुढील गावांची निवड करण्यात आली- साखरशेत, वावर, खरोंदा, चांभारशेत व अक्रा.

बायफने वाडी प्रकल्पात सहभागी झालेल्या कुटुंबांची यादी दिली. या कुटुंबांच्या आसपासच्या घरातूनच अन्य कुटुंबांची अभ्यासासाठी निवड केली गेली.

महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे संशोधक व बायफचे अधिकारी यांच्यामध्ये पायाभूत अभ्यासासंदर्भात तीन दिवस सखोल चर्चा झाली. त्यातूनच पुढे सर्वेक्षण व मुलाखतींसाठी परिषदेतर्फे विविध संशोधन साधने तयार करण्यात आली.

प्राथमिक पहाणी करण्यासाठी परिषदेतर्फे दोन संशोधक पाठवण्यात आले. बायफच्या जव्हारमधील स्थानिक कर्मचाऱ्यांनी अभ्यासासाठी गावे निवडण्यात मदत केली. अभ्यास, संशोधन करत असताना लोकांच्या जास्तीत जास्त जवळ रहाणे महत्वाचे असते.



ही गरज लक्षात घेऊनच अभ्यास करावयाच्या गावांमध्ये रहाण्याच्या दृष्टीने देखील सोय करण्यात आली.

पहिल्या टप्प्यात संख्यात्मक माहिती गोळा करण्यासाठी म्हणून २३ जणांची निवड करण्यात आली. त्यापैकी ८ संशोधक दुसऱ्या टप्प्यामध्ये गुणात्मक माहिती गोळा करणार होते.

निवड झालेल्या संशोधकांना एक दिवस सर्वेक्षणाबाबत प्रशिक्षण देण्यात आले. या प्रशिक्षणामध्ये कुटुंबाची माहिती गोळा करण्यासाठी वापरण्यात यावयाच्या प्रश्नावलीवर सखोल चर्चा करण्यात आली. तसेच गोळा करावयाच्या अन्य संख्यात्मक व गुणात्मक माहितीविषयी देखील मार्गदर्शन करण्यात आले.

संशोधकांचे एकूण तीन गट तयार करण्यात आले. हे गट अनुक्रमे साखरशेत, वावर व खरोंदा-चांभारशेत या गावातून एकाचवेळी काम करणार होते. मात्र मुसळधार पावसामुळे पडल्याने वाटेत दरडी कोसळल्याने वावरला जाणे आठवडाभर तरी शक्य नव्हते. त्यामुळे साखरशेत व वावरच्या गटांनी संयुक्तपणे प्रथम साखरशेतमधून व नंतर वावरमधून माहिती गोळा केली. संख्यात्मक माहिती ११ ते २० जानेवारी १९९४ या कालावधीत गोळा करण्यात आली. त्याचबरोबर काही गुणात्मक माहिती देखील मिळवली गेली. मात्र ८ संशोधकांनी २८ जानेवारीपर्यंत या गावांमधून राहून केवळ गुणात्मक माहितीवरच आपले लक्ष केंद्रित केले.

संशोधक गट गावामध्येच घर भाड्याने घेऊन लोकांच्या बरोबर राहिले. स्वयंपाकासाठीचा शिधा जव्हार या तालुक्याच्या ठिकाणाहून खरेदी केला गेला. जेवण तयार करण्यासाठी स्थानिक आदिवासी लोकांचीच मदत घेण्यात आली. मोठ्या प्रमाणावर स्वयंपाक तयार करण्यासाठी लागणाऱ्या भांड्यांची मात्र समस्या होती. लोकांनी आपल्या घरातून भांडी आणून दिली पण ती

अपुरीच पडली.

पायाभूत अभ्यासाठी लोकांकडून माहिती मिळवण्यासाठी पुढील संशोधन साधनांचा उपयोग करण्यात आला.

१. गाव माहिती मार्गदर्शक - गाव पातळीवरील माहिती गोळा करण्यासाठी मार्गदर्शक तयार करण्यात आले. त्याद्वारे पुढील गोष्टींवर माहिती मिळवण्यात आली.

अ) लोकसंख्या

ब) जमिनीची माहिती

क) वाहतूक आणि दळणवळण

ड) सार्वजनिक सोयी सुविधा

२. कुटुंब प्रश्नावली - कुटुंबाची माहिती मिळवण्यासाठी संरचनात्मक प्रश्नावली तयार करण्यात आली होती.

अ) कुटुंबाच्या सदस्यांची माहिती

ब) आर्थिक माहिती - जमीन, पशुधन, घराचा प्रकार, कुटुंबाचा खर्च, कर्ज, स्थलांतर.

क) आरोग्य विषयक माहिती - आजार, मृत्यू

३. अर्ध-संरचनात्मक मार्गदर्शक - या मार्गदर्शकाचा वापर करून पुढील माहिती मिळवण्यात आली.

अ) लहान मुलांचा आहार

ब) गर्भवती मातांचा आहार

क) पाच वर्षांच्या आतील मुलांचे आजार

ड) नवप्रसूत बाळंतीण झालेल्या व गर्भवती राहिलेल्या मातेची माहिती.

४. अनौपचारिक मुलाखती -

अ) सांस्कृतिक व धार्मिक जीवन

ब) सणवार उत्सव,

क) स्त्रियांचा सामाजिक दर्जा

ड) आरोग्य

५. शारीरिक मोजमापे, आहार सर्वेक्षण.

माहितीचे विश्लेषण

संख्यात्मक माहितीचे विश्लेषण बायफच्या संगणकावर एसपीएसएस (या पॅकेज) च्या सहाय्याने करण्यात आले. मिळालेल्या माहितीचे गाववार का जमातवार विश्लेषण करायचे यावर मतभिन्नता होती. विश्लेषण जरी गाव व जमातवार केले असले तरी आदिवासी भागामध्ये विकास प्रक्रिया नातेसंबंधातूनच विस्तारत असल्याने जमातवार विश्लेषण होणे आवश्यक व महत्वाचे आहे. वाडीमध्ये सहभागी झालेल्या कुटुंबांचे वेगळे असे विश्लेषण केलेले नाही कारण पायाभूत पहाणीच्या वेळेस दोन्ही प्रकारची कुटुंबे (वाडीत सहभागी झालेली व न सहभागी झालेली) एकाच पातळीवर आहेत. मात्र माहिती उपलब्ध असल्याने भविष्य काळात असे विश्लेषण करता येऊ शकेल.

या संख्यात्मक माहितीची तुलना बायफच्या अन्य प्रकल्पांशी अथवा महाराष्ट्र किंवा भारताच्या आकडेवारीशी करणे देखील उचित ठरेल.

# पायाभूत अभ्यास सारांश

भविष्य काळामध्ये विकासाचा आदिवासींच्या जीवनावर होणारा परिणाम मोजता यावा म्हणून शास्त्रशुद्ध पध्दतीने माहितीचे संकलन करण्यासाठी आदिवासी जीवन व संस्कृतीचा पायाभूत अभ्यास ठाणे जिल्ह्यातील जव्हार तालुक्यात करण्यात आला. या पायाभूत अभ्यासाचा उपयोग जेथे संख्यात्मक माहिती उपयोगी पडत नाही अशा क्षेत्रांमध्ये विकास प्रक्रियेच्या नोंदीकरता व मूल्यमापनासाठी होऊ शकेल.

अभ्यासामध्ये समाविष्ट केलेली गावे जव्हार या तालुक्याच्या ठिकाणापासून वीस ते चाळीस किलोमीटर दूर आहेत. ही बहुतेक गावे रस्त्यांनी जोडली गेली असून तेथे केवळ हंगामी सार्वजनिक वाहतूक व्यवस्था उपलब्ध आहे. कायमस्वरुपी बाजार, बँक, पोलिस ठाणे व गुरांचा दवाखाना गावापासून दूर, केवळ तालुक्याच्या ठिकाणीच आहे. प्राथमिक आरोग्य केंद्र अथवा पथक मात्र गावाच्या अगदी जवळ आहे. पोलिस ठाण्याच्या अंतरावरुन पारंपारिक पंचायत गाव पातळीवरील कायदा व सुव्यवस्था सुरळीत राखण्यास सक्षम असल्याचे व बाहेरील कुठल्याही नियंत्रणाची गरज नसल्याचे दर्शवते. पाच वर्षाखालील मुले वगळून निरक्षरतेचे प्रमाण ५४% ते ७७% इतके आहे. गेल्या काही वर्षामध्ये किराणा मालाची दुकाने, चहाची हॉटेल, गिरण्या यासारख्या सोयीसुविधा साखरशेत गावात आल्या आहेत. इतर गावे मात्र याबाबतीत मागेच पडलेली दिसतात.

लोकसंख्येचा विचार करता वारली, कोकणा व ठाकूर या मुख्य जमाती आहेत. तर ढोर कोळी, मल्हार कोळी, राज कोळी यासारख्या जमाती थोड्या प्रमाणात आहेत. साक्षरता व आर्थिक परिस्थितीचे निकष लावता मात्र कोकणा, ठाकूर वारली व इतर जमाती अशी उतरंड पहायला मिळते. वाडी सहभागींमध्ये देखील कोकणा, वारली व ठाकूर आणि इतर जमाती असा उतरता क्रम दिसतो.

आदिवासी भागातील कुटुंबांची आर्थिक परिस्थिती केवळ वर्षभर सर्व सदस्यांचे पोट भरता येईल इतपतच असते. कोकणांकडे जास्त जमीन (५ ते १० एकर व अधिक) त्याखालोखाल ठाकूर व वारली असा जमीन धारणेच्या बाबतीत क्रम आढळतो. वारली लोकांमध्ये भूमिहीनांचे जास्त प्रमाण दिसते. आदिवासींमध्ये भूकमार दिसत नाही. मात्र काही लोकांनी उन्हाळ्यामध्ये १ जेवण कमी मिळते असे सांगितले. शेतीतून मिळणारे उत्पादन कमी असल्याने अन्नधान्याची तूट भरुन काढण्यासाठी कर्ज घेणाऱ्यांचे व स्थलांतर करणाऱ्यांचे प्रमाण लक्षणीय आहे. सर्वसाधारणपणे वारली लोकांमध्ये कर्ज घेण्याचे, त्यातही अन्नधान्याच्या तुटवड्यामुळे कर्ज काढण्याचे प्रमाण जास्त आहे. तर कोकणांमध्ये आजारासाठी अथवा विवाहासाठी कर्ज काढले जाते. ४३% कर्ज नोंदणीकृत संस्थांकडून तर ५७% कर्ज नातेवाईक, शेजारी अथवा गावकऱ्यांकडून घेतल्याचे आढळले.

कामासाठी स्थलांतर करणाऱ्यांचे प्रमाण खूप जास्त आहे. एकूण लोकसंख्येच्या २३% लोकांनी गेल्या एका वर्षात अर्थार्जनासाठी स्थलांतर केले. स्त्रियांपेक्षा पुरुष जास्त प्रमाणात स्थलांतर करतात. एकूण ८२% घरातून एक किंवा त्यापेक्षा अधिक सदस्यांनी स्थलांतर केले. स्थलांतर करण्यात कोकणांपेक्षा वारली व ठाकूर लोकांचे प्रमाण अधिक आहे. एका वेळेस २-३ आठवड्यासाठी स्थलांतर केले जाते. अशा तीन चार खेपा वर्षातून मारल्या जातात.

शहरामध्ये काम करुन रोख पैसा मिळत असल्याने आदिवासी भागात आता पैशात विनिमय करण्याचे प्रमाण वाढले आहे. असे असले तरी अजूनही बरेचसे स्थानिक व्यवहार वस्तूच्या स्वरुपातच होतात. आठवडे बाजारात भाजीपाला, किरकोळ सामान वस्तु विनिमय पद्धतीनेच खरेदी केले जात असल्याचे दिसते.

हिवाळ्यातील डिसेंबर १९९३ या तशा निरोगी महिन्याची .आजारविषयक माहिती बघितली असता असे दिसते की पाच वर्षाखालील ४३% मुले आजारी होती. त्यातही मुलांपेक्षा मुलींमध्ये आजाराचे प्रमाण जास्त होते. आजारांमध्ये ताप व जुलाब यासारख्या कारणांमुळे आजारी पडणाऱ्यांची संख्या जास्त होती. सरकारी आरोग्य सुविधांची सोय चांगली असल्याने ५९% लोक या सुविधांचा लाभ घेताना आढळले. केवळ २०% लोक भगताकडे गेल्याचे दिसून आले. लोकांची स्वत:ची अशी आजारांचे वर्गीकरण करण्याची पद्धत आहे. त्यानुसार ताप, जुलाब यासारखे आजार डॉक्टरच बरे करु शकतो तर भगत भूतपिशाच्याची बाधा दूर करतो असा या लोकांचा समज आहे. तसेच आजार होऊ नयेत म्हणून प्रतिबंधात्मक उपाय करण्यासाठी भगताची मदत घेतली जाते.

नवजात बालकांचे (एक वर्षाखालील) मृत्यू विचारात घेतले असता मुलीपेक्षा मुलांचे मृत्यू जास्त संख्येने झाल्याचे दिसते. एक महिन्याच्या आत मृत्यू पावणाऱ्या बालकांची संख्या एक महिना ते एक वर्ष या कालावधीत झालेल्या बालकांच्या मृत्यू एवढीच आहे. या मृत्यूंची कारणे बघितली असता गोवर, जुलाब व कमी जन्म वजन या कारणांमुळे जास्त मृत्यू झाले असल्याचे दिसते. एक ते पाच वर्षाखालील मुलांच्या मृत्यूसाठी देखील जुलाबासारखा आजार कारणीभूत असल्याचे गेल्या दोन वर्षाच्या माहितीवरुन दिसते. असे असले तरी केवळ एकच मातामृत्यू झाल्याचे या आकडेवारी वरुन दिसते.

लोकांना जुलाबाचा आणि खराब पाण्याचा संबंध आहे व पाण्यात औषध टाकल्याने जुलाबाचा आजार थांबवता येतो या गोष्टी माहित आहेत. त्याचबरोबर जुलाबात रक्ताचे पाण्यामध्ये परिवर्तन होते व शरीर एकदम थंड पडते अशा समजुती देखील आहेत.

वधूमुल्याच्या परंपरेमुळे आदिवासी स्त्रीला अन्य जातीच्या हिंदू स्त्रियांपेक्षा मानाचे स्थान आहे. घटस्फोट व विधवांचा पुनर्विवाह आदिवासींमध्ये सहजपणे होतो. आदिवासींच्या पितृसत्ताक पद्धतीमध्ये मुलीपेक्षा मुलांना प्राधान्य दिले जात असले तरी मुलींकडे दुर्लक्ष मात्र केले जात नाही. घटस्फोटाच्या प्रकरणात, वडिलांच्या संपत्तीचा वाटा मिळावा म्हणून मुलाला वडिलांकडेच ठेवले जाते तर मुलगी आईबरोबर रहाते. पत्नीला टाकून देणे यासारखा प्रकार आदिवासी समाजात घडत नाही.

निर्णय प्रक्रियेमध्ये स्त्रियांना अधिक स्वातंत्र्य असते. त्यांना स्वकमाईवर व तो पैसा खर्च करण्यावर कोणतेच बंधन नसते. पती मेल्यानंतर त्याच्या भावाशी किंवा पत्नी मेल्यानंतर तिच्या बहिणीशी लग्न करण्याची प्रथा असली तरी ती आता हळुहळू लोप पावत चालली आहे. विवाह संबंधातून मूल होत नसल्यास स्त्री आपल्या नवऱ्याला सोडून दुसरे लग्न करते व स्वत:चे निर्दोषत्व सिद्ध करते. असे असले तरी स्त्रियांना प्रदुषणामुळे (मासिक पाळीच्या) धार्मिक विधींमध्ये मात्र स्थान नसते. गर्भारपणामध्ये कुठलाही खास असा आहार घेतला जात नाही वा कामातही सूट मिळत नाही. बाळंतपणानंतर

एक महिना आहारावर बंधने असतात. जन्मानंतर लगेचच बाळाला आईचे दूध पाजले जाते.

कुटुंब नियोजनाच्या बाबतीत भारतातील अन्य भागापेक्षा येथे वेगळे चित्र बघायला मिळते. स्त्रियांच्या शस्त्रक्रियेपेक्षा, पुरुष नसबंदीची शस्त्रक्रिया जास्त प्रमाणात केली जाते. गायीच्या दुधाचा वापर पिण्यासाठी करण्याचा प्रघात येथे आढळत नाही कारण गायीचे दूध हे वासरासाठीच असते. दारु हे सामाजिक व धार्मिक जीवनाचे मूलभूत अंग बनले असून पुरुष व स्त्रिया दोघेही दारु पिताना आढळतात. लोकांना शुद्ध पाणी वैयक्तिक स्वच्छता व त्याचा आरोग्याशी असलेला संबंध याबद्दल माहिती आहे मात्र प्रत्यक्षात या माहितीचा दैनंदिन जीवनामध्ये वापर करण्याबद्दल उदासीनता आढळते.

बायफचा वाडी प्रकल्प जरी नुकताच सुरु झाला असला तरी त्यामुळे लोकांमध्ये बदल होत असल्याचे दिसते. झाडांची निगा कशी राखायची, काळजी कशी घ्यायची याबद्दल त्यांनी ज्ञान मिळवले आहे. आदिवासी लोक पूर्वीपेक्षा जास्त कामात गढून गेले आहेत. आणि त्यांनी वाडीसाठी आपल्या तारपा या पारंपारिक नाचावरदेखील पाणी सोडले आहे. पिकवलेल्या भाजीपाल्याच्या विक्रीची मोठी समस्या आहे कारण तालुक्याच्या ठिकाणी भाजीपाला पाठवणे आर्थिक परिस्थिती अभावी शक्य होत नाही. लोकांना वाडीचे महत्व पटायला लागले असले तरी भात व नागली खालची जमीन वाडीसाठी देणे अन्नधान्य तुटवड्याच्या भीतीपोटी शक्य नाही. वाडीमुळे गावातील श्रीमंत लोक (ज्यांच्याकडे पुरेसे अन्नधान्य आहे) व गरीब लोक (जे केवळ भूकमारी पासून स्वतःला दूर ठेवत आहेत) यांच्यातील दरी न वाढण्याची काळजी घेतली पाहिजे.

पडिक जमिनीचे प्रमाण बघता, पडिक जमीन विकासाला व लागवडीखाली असलेल्या जमिनीचे उत्पादन वाढवायला भरपूर वाव आहे. आदिवासी संस्कृतीमध्ये स्त्री पुरुष असा भेदभाव केला जात नसल्याने महिलांसाठी विकास योजना राबविणे शक्य आहे. लहान मुलांच्या आजार व मृत्यूविषयक सर्वेक्षण होणे अत्यंत जरुरीचे आहे. त्याद्वारे जुलाब, गोवर यासारख्या टाळता येणाऱ्या आजारांवर मात करता येईल. जव्हार हीच जवळची बाजारपेठ असल्याने तेथे मालाच्या विक्रीसाठी प्रयत्न झाले पाहिजेत तरच वाढलेल्या उत्पादनामुळे आदिवासींना पैसे मिळू शकतील. दुग्ध विकासासारख्या कार्यक्रमांसाठी लोकांचे मतपरिवर्तन करावे लागेल आणि चांगल्या बैलांची पैदास होईल व त्या वातारवणात संकरित बैल जगतील याची खात्री त्यांना द्यावी लागेल. मत्स्यपालन व कुक्कुटपालन यासारख्या कुटिरोद्योगांना स्थानिक पातळीवर भरपूर वाव असल्याने त्या दिशेने प्रयत्न होणे जरुरीचे आहे. भात व नागलीच्या भरघोस उत्पादन देणाऱ्या जातींना लोकांकडून चांगला प्रतिसाद मिळू शकेल.

डिसेंबर महिन्यातील कडाक्याच्या थंडीमध्ये उघडेनागडे हिंडणाऱ्या वावर गावातील मुलांच्या पार्श्वभूमीवर रहाणीमानाचा दर्जा हा थंडीपासून संरक्षण देण्यासाठी पालकांनी आपल्या मुलांना घातलेल्या कपड्यांवरुन ठरवता येऊ शकेल.

• • •

# गावांची माहिती

भारतीय कृषी औद्योगिक प्रतिष्ठानने (बायफ) वाडी प्रकल्पासाठी निवडलेल्या जव्हार तालुक्यातील (ठाणे जिल्हा) पाच गावांमधून पायाभूत अभ्यास करण्यात आला.

तक्ता क्र. १

**गावांची लोकसंख्या**

| गाव | मुख्य जमाती | एकूण पाडे | एकूण घरे | एकूण लोकसंख्या |
|---|---|---|---|---|
| १. बावर | वारली, कोकणा | ९ | ४१६ | २५८६ |
| २. साखरशेत | ठाकूर, कोकणा वारली, ढोर कोळी | ६ | ४५० | २४३७ |
| ३.खरोंदा | कोकणा, वारली | ६ | २७५ | १६०० |
| ४.चांभारशेत | कोकणा, वारली | ८ | २२५ | १२०० |
| ५. अक्रा | वारली, ढोर कोळी, कोकणा | ८ | २२५ | ११६१ |
| एकूण | | ३७ | १५११ | ८९८४ |

वरील तक्त्यामध्ये अभ्यास केलेल्या गावातील एकूण पाडे, घरे व लोकसंख्या दर्शविली आहे. या भागामध्ये वारली आणि कोकणा या दोन मुख्य आदिवासी जमाती आहेत. ठाकूर जमात केवळ साखरशेत गावातच आढळते. याशिवाय ढोर कोळी, राज कोळी, मल्हार कोळी व महादेव कोळी या जमातीची घरे अत्यंत तुरळकपणे पाड्या पाड्यातून विखुरलेली आढळतात.

या गावातील एकूण घरातूनच काही घरे पायाभूत अभ्यासासाठी निवडण्यात आली. बायफच्या वाडी प्रकल्पामध्ये सहभाग या निकषावर घरे निवडण्यात आली, तसेच त्या गावातील सहभागी न झालेल्या कुटुंबांचाही अभ्यासात समावेश केला गेला. हा अभ्यास पुढे दर्शवलेल्या पाड्यातून करण्यात आला.

तक्ता क्र. २

**अभ्यासात समाविष्ट असलेल्या गावाच्या पाड्यांची यादी.**

| गाव | पाडे |
|---|---|
| १. वावर | बामण पाडा, बेहेड पाडा, चिकाडी पाडा |
| २. साखरशेत | चालतवड, महाले पाडा, साखरशेत गावठाण, उंबरविहिर |
| ३. खरोंदा | हेदीचा पाडा, खरोंदा गावठाण |
| ४. चांभारशेत | बोरी पाडा, फणसपाडा, तासू पाडा, वड पाडा, वांगण पाडा |
| ५. अक्रा | अक्रा गावठाण, धांगड पाडा. |

ग्रामीण भागामध्ये जशी कुटुंबे वाड्या वस्त्यातून विखुरलेली आढळतात त्याचप्रमाणे आदिवासी भागात वस्ती पाड्या पाड्यामधून विखुरलेली असते. अनेक जमाती असल्यास सर्वसाधारणपणे एका पाड्यातून विशिष्ट जमातीचेच लोक रहाताना दिसतात. आणि अशा पाड्यातील कुटुंबे ही एकमेकांच्या नात्यातलीच असतात. अशा प्रकारच्या वस्तीस्थानांमुळे आपलेपणाची व सहकार्याची भावना वाढण्यास मदत होते. सर्व कुटुंबे नात्यातीलच असल्याने सामाजिक नियंत्रण ठेवणेदेखील सोपे जाते.

तक्ता क्र. ३

## सर्वेक्षण केलेली कुटुंबे (१९९४) जमातवार विभागणी

| जमात | वाडी प्रकल्पात सहभाग | | एकूण |
|---|---|---|---|
| | आहे | नाही | |
| १. कोकणा | २४ (९.२%) | ५४ (२०.८%) | ७८ (३०%) |
| २. वारली | २१ (८.१%) | ८७ (३३.५%) | १०८ (४१.६%) |
| ३. ठाकूर | १४ (५.४%) | ३६ (१३.८%) | ५० (१९.२%) |
| ४. इतर जमाती | ५ (१.९%) | १९ (७.३%) | २४ (९.२%) |
| एकूण | ६४ (२४.६%) | १९६ (७५.४%) | २६० (१००%) |

(इतर जमातींमध्ये ढोर कोळी, मल्हार कोळी, राज कोळी, महादेव कोळी या जमातींचा समावेश होतो.)

एकूण २६० कुटुंबामधून सर्वेक्षण केले गेले. त्यापैकी ६४ (२४..६%) कुटुंबे बायफच्या वाडी प्रकल्पामध्ये सहभागी झालेली होती तर १९६ (७५.४%) इतर कुटुंबे होती. या आदिवासी भागात वारली आणि कोकणा या दोन मुख्य जमाती असल्याने सर्वेक्षणात देखील या जमातींच्या जास्त कुटुंबाचा अंतर्भाव होणे स्वाभाविकच आहे.

तक्ता क्र. ४

## सर्वेक्षण केलेली कुटुंबे (१९९४) गाववार विभागणी

| जमात | वाडी प्रकल्पात सहभाग | | एकूण |
|---|---|---|---|
| | आहे | नाही | |
| वावर | १५ (५.८%) | ४५ (१७.३%) | ६० (२३.१%) |
| साखरशेत | २६ (१०%) | ७० (२६.९%) | ९६ (३६.९%) |
| खरोंदा | ११ (४.२%) | ३९ (१५%) | ५० (१९.२%) |
| चांभारशेत | ९ (३.५%) | ४१ (१५.८%) | ५० (१९.२%) |
| [illegible] | ३ (१.१%) | १ (०.४%) | ४ (१.५%) |
| [illegible] | ६४ (२४.६%) | १९६ (७५.४%) | २६० (१००%) |

तक्ता क्र. ४ मध्ये सर्वेक्षित कुटुंबाची गाववार व वाडी प्रकल्पाच्या सहभागानुसार विभागणी दर्शविली आहे. खरोंदा, चांभारशेत गावातून प्रत्येकी ५० कुटुंबाची तर वावर (६०), साखरशेत येथून ९६ कुटुंबांची माहिती घेतली गेली. साखरशेत गावामध्ये वाडी प्रकल्पात सहभागी होणाऱ्यांची संख्या २६ आहे तर वावर, खरोंदा, चांभारशेत येथे अनुक्रमे १५,११ व ९ कुटुंबे सहभागी झालेली होती. साखरशेत हे गाव जव्हारशी रस्त्याने जोडलेले आहे. तसेच तेथे इतर गावांच्या तुलनेने दळणवळणाच्या सोयीसुविधा जास्त प्रमाणात येथील उपलब्ध आहेत व लोकांचा बाहेरच्या जगाशी सतत संपर्क येत असतो. त्यामुळेच येथील लोक वाडी प्रकल्पामध्ये जास्त संख्येने सहभागी झाले असावेत.

तक्ता क्र. ५

**कुटुंबाचा सरासरी आकार**

| जमात | एकूण लोकसंख्या | एकूण कुटुंबे | कुटुंबाचा सरासरी आकार |
|---|---|---|---|
| १. कोकणा | ४३६ | ७८ | ५.६ |
| २. वारली | ५४२ | १०८ | ५.० |
| ३. ठाकूर | ३१० | ५० | ६.२ |
| ४.इतर जमाती | १३९ | २४ | ५.८ |
| एकूण | १४२७ | २६० | ५.५ |

(इतर जमातींमध्ये ढोर कोळी, मल्हार कोळी, राज कोळी, महादेव कोळी या जमातींचा समावेश होतो.)

सर्वेक्षण केलेल्या कुटुंबांचा सरासरी आकार ५.५ एवढा होता. जमातवार तुलना केली असता वारली कुटुंबाचा आकार सर्वात कमी म्हणजे ५ त्याखालोखाल कोकणा (५.६) व इतर जमाती (५.८) तर ठाकूर कुटुंबाचा सर्वात जास्त म्हणजे ६.२ माणसे एवढा आढळला.

तक्ता क्र. ६

**गाववार स्त्रीपुरुषांची विभागणी**

| गाव | पुरुष | स्त्रिया | एकूण |
|---|---|---|---|
| १. वावर | १७९ (१२.५%) | १८६ (१३%) | ३६५ (२५.५%) |
| २. साखरशेत | २९७ (२०.८%) | ३०७ (२१.५%) | ६०४ (४२.३%) |
| ३. खरोंदा | १२५ (८.८%) | १२७ (८.९%) | २५२ (१७.७%) |
| ४. चांभारशेत | ८८ (६.२%) | ९० (६.३%) | १७८ (१२.५%) |
| ५. अक्रा | १८ (१.३%) | १० (०.७%) | २८ (२%) |
| एकूण | ७११ (४९.६%) | ७१६ (५०.४%) | १४२७ (१००%) |

तक्ता क्र. ६ मध्ये सर्वेक्षण केलेल्या गावांमधील स्त्री पुरुष संख्या दर्शविली आहे. २६० कुटुंबांमधून एकूण १४२७ माणसे होती, त्यापैकी ७११ (४९.६%) पुरुष तर ७१६ (५०.४%) स्त्रिया होत्या.

सर्वेक्षित केलेल्या लोकसंख्येसाठी दर हजार पुरुषांसाठी स्त्रियांचे प्रमाण काढले असता ते १००७ स्त्रिया इतके येते. म्हणजेच स्त्री पुरुषांचे प्रमाण जवळजवळ सारखेच आहे. तर १९९१ च्या जनगणनेनुसार भारतामध्ये दर हजार पुरुषांमागे केवळ ९२७ स्त्रिया होत्या. गाववार देखील स्त्री पुरुषांचे प्रमाण सारखेच असल्याचे दिसते. आदिवासी स्त्रीला समाजामध्ये समान दर्जा व मानाचे स्थान असते. त्याचेच प्रतिबिंब या आकडेवारीतूनही दिसते.

अभ्यास केलेल्या लोकसंख्येपैकी ४२% लोक साखरशेत गावातील तर वावर, खरोंदा, चांभारशेत येथील अनुक्रमे २५%, १८% व १२% लोक होते.

तक्ता क्र. ७

**वयोगटानुसार स्त्रीपुरुष संख्या**

| वयोगट (वर्ष) | पुरुष | स्त्रिया | एकूण |
|---|---|---|---|
| ०-१ | ३१ (२.२%) | ३९ (२.७%) | ७० (४.९%) |
| १-५ | ८० (५.६%) | ८७ (६.१%) | १६७ (११.७%) |
| ५-१५ | १७२ (११.८%) | १७८ (१२.८%) | ३५० (२४.६%) |
| १५-४५ | ३३२ (२३.३%) | ३३१ (२३.२%) | ६६३ (४६.५%) |
| ४५-६० | ७९ (५.५%) | ६७ (४.७%) | १४६ (१०.२%) |
| ६० + | १७ (१.२%) | १४ (१%) | ३१ (२.२%) |
| एकूण | ७११ (४९.६%) | ७१६ (५०.४%) | १४२७ (१००%) |

वयोगटानुसार स्त्रीपुरुषांचे वर्गीकरण पाहिले असता १५-४५ वर्षे या उत्पादक गटामध्ये ४६% लोक असल्याचे दिसते. त्याखालोखाल ५-१५ या वयोगटात जवळजवळ २५% मुले दिसतात. त्यानंतर अनुक्रमे १-५ वर्षे (१२%) व ४५-६० वर्षे (१०%) या वयोगटांची संख्या आहे. नवजात बालकांचे प्रमाण सुमारे ५ टक्के तर साठ वर्षावरील वृद्धांचे प्रमाण केवळ २% आहे.

सर्व गटांमध्ये पुरुष व स्त्रियांची संख्या जवळजवळ सारखीच असल्याचे दिसून येते.

**शिक्षण :**

या भागातील ६७% लोक निरक्षर आहेत. निरक्षरांमध्ये पुरुषांपेक्षा (४४%) स्त्रियांमध्ये (५६%) अधिक निरक्षरता आहे. एकूण लोकसंख्येपैकी १६% लोकांनी प्राथमिक शिक्षण घेतले आहे तर केवळ १३% माध्यमिक शिक्षणापर्यंत पोहोचले आहेत. फक्त १% मुले महाविद्यालयीन शिक्षण घेत आहेत. मुलींपैकी कोणीही दहावीच्या पुढे शिकलेले नाही.

गाववार शिक्षणाचा विचार केला असता वावरमध्ये सर्वात जास्त (७७.६%) तर चांभारशेत (७१.६%), आक्रा (६७.९%) व खरोंदा (६५.५%) एवढी निरक्षरता आढळते. साखरशेतमध्ये सर्वात कमी म्हणजे (६०.४%) लोक निरक्षर आहेत. साखरशेतपेक्षा अन्य गावे दुर्गम भागात वसलेली असल्याने तसेच दळणवळणाच्या सोयी उपलब्ध नसल्याने या गावांमध्ये साक्षरतेचे प्रमाण कमी आहे.

जमातवार साक्षरतेचा विचार केला असता असे दिसते की कोकणा (४६%) सर्वात जास्त शिकलेले आहेत. ठाकूर (३५%) इतर जमाती (२४%) व सर्वात कमी वारली (२३%) असे साक्षरतेचे प्रमाण आहे.

तक्ता क्र. ८

## दळणवळणाच्या सोयीसुविधा

| गाव | तालुक्याच्या गावापासूनचे अंतर | रस्ता प्रकार | एस. टीची सुविधा |
|---|---|---|---|
| १. वावर | ४० | कच्चा (२० कि.मी.) | नोव्हेंबर ते मे |
| २. साखरशेत | २० | डांबरी | वर्षभर |
| ३. खरोंदा | ३५ | कच्चा (१० कि.मी.) | - |
| ४. चांभारशेत | ३२ | कच्चा (७ कि.मी.) | - |
| ५. अक्रा | २५ | कच्चा (५ कि.मी.) | नोव्हेंबर ते मे |

तक्ता क्र. ९

## सार्वजनिक सोयीसुविधा

(अंतर कि.मी. मध्ये)

| सुविधा | वावर | साखरशेत | खरोंदा | चांभारशेत | अक्रा |
|---|---|---|---|---|---|
| १. एस.टी. थांबा | ० | ० | १० | ७ | ० |
| २. आठवडे बाजार | १० | २ | १० | ७ | ६ |
| ३. टपाल कार्यालय | १० | ० | १० | ७ | ६ |
| ४. प्राथमिक आरोग्य केंद्र /पथक | ० (प्रा.आ.प) | ० (प्रा.आ.कें) | ३ (प्रा.आ.प) | ० (प्रा.आ.प) | ५ (प्रा.आ.कें) |
| ५. पोलिस ठाणे | ४० | २० | ३५ | ३२ | २५ |
| ६. माध्यमिक शाळा | १८ | ० | १० | ७ | १२ |
| ७. गुरांचा दवाखाना | ४० | २० | ३५ | ३२ | २५ |
| ८. सहकारी संस्था | १८ | ० | १० | ७ | १२ |
| ९. बँक | १८ | ० | ३५ | ३२ | २५ |
| १०. कायमस्वरुपी बाजार | ४० | २० | ३५ | ३२ | २५ |

अभ्यास केल्या गेलेल्या गावातील दळणवळणाच्या सोयीसुविधा तक्ता क्र. ८ मध्ये दाखवल्या आहेत. वावर हे जव्हार या तालुक्याच्या गावापासून ४० कि.मी. अंतरावर असून अत्यंत दुर्गम भागात वसलेले आहे. गावाला जाणारा साखरशेतच्या पुढचा २० कि.मी. रस्ता कच्चा आहे. पावसाळ्यामध्ये रस्त्यावर दरडी कोसळत असल्याने वावरचा इतर गावांशी चार महिने संपर्क तुटतो. इतर वेळेस दिवसातून दोनदा एस.टी. बस जाते.

साखरशेत या गावाला डांबरी रस्ता असल्याने बारा महिने एस.टी. ची सेवा उपलब्ध असते. अक्रा या जव्हारपासून २५ कि.मी. वर असलेल्या गावाला पावसाळा वगळता एस.टी. बस येते. चांभारशेत आणि खरोंदा ही गावे मात्र एस.टी. च्या सेवेपासून वंचित आहेत. खरोंदा गावातील लोकांना १० किलोमीटर चालत जाऊन जव्हारसाठी एस.टी. पकडावी लागते.

तक्ता क्र. ९ मध्ये सर्वेक्षित गावांमधील सार्वजनिक सोयीसुविधा व त्यांचे अंतर दाखविले आहे. आठवडे बाजार, टपाल कार्यालय, माध्यमिक शाळा, सहकारी संस्था व बँक यासारख्या सुविधा मिळवण्यासाठी लोकांना साधारपणे सरासरी १० कि.मी. जावे लागते. पोलिस ठाणे, गुरांचा दवाखाना व कायमस्वरुपी बाजार मात्र जव्हार या तालुक्याच्या ठिकाणीच आहे. समाधानाची बाब एकच की सर्व गावांमध्ये सरकारी आरोग्यसेवा उपलब्ध आहे. खरोंद्यातील लोकांना प्रा. आरोग्य पथकाच्या दवाखान्यात पोचण्यासाठी ३ कि.मी. जावे लागते. साखरशेत या गावामध्ये बऱ्याच सुविधा उपलब्ध आहेत.

तक्ता क्र. १०

**गावातील सोयीसुविधा**

| | वावर | साखरशेत | खरोंदा | चांभारशेत | अक्रा |
|---|---|---|---|---|---|
| १. विहीर | १४ | १३ | १३ | १२ | १४ |
| २. हातपंप | - | - | ४ | १ | - |
| ३. संडास | - | - | - | ३ | - |
| ४. अंगणवाडी | ५ | ५ | ४ | २ | ३ |
| ५. किराणा दुकान | - | १२ | १ | ३ | ३ |
| ६. पिठाची गिरणी | १ | ४ | १ | १ | १ |
| ७. हॉटेल | - | २ | - | - | - |
| ८. व्यायामशाळा | - | - | १ | - | - |

वरील तक्त्यामध्ये गावांमध्ये उपलब्ध असलेल्या सोयीसुविधा दर्शविल्या आहेत. या सुविधा केवळ सर्वेक्षण केलेल्या पाड्यातील नसून गावांच्या सर्व पाड्यांच्या मिळून आहेत. प्रत्येक गावातील पाड्यावर किमान एक तरी विहीर असून विहिरीचे पाणी हाच पिण्याच्या पाण्याचा मुख्य स्त्रोत आहे. केवळ खरोंदा (४) व चांभारशेत (१) येथेच फक्त हातपंप बसविण्यात आले आहेत. चांभारशेत या गावातच केवळ ३ संडास बांधल्याचे दिसले. अन्य कुठल्याही गावातून संडास दिसले नाहीत. लहान मुलांच्या (०-६ वर्षे) अनौपचारिक शिक्षणासाठी असलेल्या अंगणवाड्या सर्व गावातून दिसतात. वावर सोडून सर्व गावातून किराणा मालाची दुकाने आहेत. पिठाच्या गिरण्या देखील सर्व गावात दिसतात. खरोंदा गावातच केवळ व्यायामशाळा पहायला मिळाली. साखरशेत हे गाव सर्व गावांमध्ये पुढारलेले आहे हे तेथे उपलब्ध असलेल्या सोयी सुविधांवरूनच लक्षात येते. विशेष म्हणजे तेथे २ हॉटेलही आढळतात जी अन्य गावात नाहीत.

**इतर माहिती :**

**घरे** - येथील सर्व घरे (९८%) कारवीनेच बनलेली असतात क्वचितच ज्वारीच्या काठ्यांचाही घर बांधणीसाठी वापर होतो. एकूण २६० कुटुंबांपैकी केवळ ५ घरे (२%) वीटांनी बांधलेली आढळली. घरांच्या छपरांचा विचार करता १२ टक्के घरांवर गवताचे तर बाकी सर्व (८८%) घरांवर मंगलोरी कौलांचे छप्पर होते. सरकारी योजनेतून लोकांना घरासाठी मंगलोरी कौले मिळतात. खुल्या बाजारात मंगलोरी कौलाचा दर अडीच रूपये प्रति नग असा आहे. घरासाठी सागाच्या लाकडाचा उपयोग करतात. हे लाकूड जंगलातून आणले जाते. घराचा आकार १५० ते ८०० चौ. फूट या दरम्यान आढळला. सर्वसाधारणपणे ४०० चौ. फुट क्षेत्रफळ असलेली घरे आढळली. निम्म्या घरांमागे परसबागेत दोडका, लाल भोपळा, दुधी भोपळा व इतर भाज्या लावल्या असल्याचे केलेल्या पाहणीत आढळून आले. तसेच केळी, शेवगा यासारखी झाडे सुद्धा होती. सर्व घरांमध्ये जनावरे घरातच बांधतात, केवळ ५% (१४) घरातून जनावरांसाठी वेगळा गोठा बांधल्याचे दिसले.

**संडास :** सर्व गावातील लोक शौचासाठी गावाबाहेर मोकळ्या जागेत जातात. फक्त चांभारशेतमध्ये तीन संडास बांधलेले होते व त्यापैकी एकच वापरात होता, सरपंच व त्याचे कुटुंबीय वापर करत होते.

**पिण्याचे पाणी :** ८१% लोक विहिरीच्या पाण्याचा तर १५% लोक नदीच्या पाण्याचा पिण्यासाठी वापर करत होते. साखरशेतमध्ये काही कुटुंबांनाच नळाने पाणी मिळत असल्याचे दिसले.

**इंधन :** २२५ कुटुंबे (८६%) लाकडाचा इंधन म्हणून वापर करतात तर १४ टक्के कुटुंबांमधून लाकूड व रॉकेल दोन्हीही इंधन म्हणून वापरले जाते.

**वीज :** वावर सोडून सर्व गावांमध्ये वीज पोहोचली आहे. असे असले तरी ३५% (९१) कुटुंबे रॉकेलचे दिवेच वापरतात. वीज देयक भरण्यास रोख पैसा नसल्याने वीजेचा वापर होत नाही. वावरमध्ये वीजेच्या खांबांची उभारणी झाली असली तरी घराघरातून वीज पोहोचायची आहे.

**करमणुकीची साधने :** अतिरिक्त धान्य पिकत नसल्याने लोकांच्या हाती पैसा नसतो. चैनीच्या गोष्टी, करमणुकीची साधने अजूनही आदिवासी लोकांपासून दूरच आहेत. केवळ ५ कुटुंबामध्ये (२%) दूरदर्शन संच, २५ कुटुंबातून रेडिओ व फक्त २ कुटुंबातून टेपरेकॉर्डर आढळला.

# आर्थिक परिस्थिती

जव्हार तालुका उंचावर वसलेला असून डोंगराळ प्रदेश असल्याने येथे पर्जन्यमानाचे प्रमाण जास्त आहे. येथील लोकांचा शेती हाच मुख्य व्यवसाय आहे. जव्हार तालुक्यातील आदिवासी, शेतीमुळे स्थायिक झाले असून जंगलातून शिकार करणे, अन्न गोळा करणे यासारख्या परंपरा पूर्णपणे नष्ट झाल्यातच जमा आहेत. असे असले तरी पारंपारिक पद्धतीची शेती, अपुरे उत्पादन, नगदी पिकांचा अभाव यामुळे येथील आदिवासी गरिबीतच रहाताना दिसतो.

या भागात विपुल प्रमाणात उपलब्ध असलेली जंगले व नैसर्गिक साधन संपत्ती आणि विखुरलेली लोकसंख्या लक्षात घेता, या नैसर्गिक साधन संपत्तीचा कोणीच का उपयोग करून घेत नाही असे वाटण्याची शक्यता आहे. आदिवासी संस्कृतीमुळे आदिवासी अर्थव्यवस्थेला आकार येत असल्याने 'उपयुक्त साधनसंपत्ती' कुठली आणि तिचे कशा प्रकारे व्यवस्थापन करायचे हे त्या आदिवासी संस्कृतीवरच अवलंबून असते. म्हणून आदिवासींच्या आर्थिक व्यवस्थेचा अभ्यास करताना इतर आकडेवारीबरोबरच त्यांच्या सामाजिक व सांस्कृतिक व्यवस्थेचा विचार करणेही तितकेच महत्वाचे आहे.

आदिवासी जमातींच्या आर्थिक परिस्थितीचा आढावा घेताना तीन घटकांचा विचार करणे सयुक्तिक ठरेल.

१. वस्तूवाद संस्कृती - यामध्ये मालकीच्या जमिनीपासून ते कपडे, भांडी यांसारख्या सर्व गोष्टींचा समावेश होतो. उत्पन्न व खर्च यांच्या समीकरणातून वस्तूवाद संस्कृतीवर प्रकाश पडतो. येथील अर्थव्यवस्था अत्यंत साधी असल्याने, तसेच रोख पैशापेक्षा वस्तुविनिमय पद्धतीने बऱ्याच प्रमाणात व्यवहार होत असल्याने आवश्यक तेवढ्या वस्तूच घरात असल्याचे दिसते. (येथे मजुरीसुद्धा धान्य रूपातच दिली / घेतली जाते) मात्र आता बाहेरच्या जगाशी संपर्क वाढत चालल्याने हळूहळू वस्तूवाद संस्कृतीकडे लोकांचा कल वाढत चालला आहे.

२. आर्थिक उत्पन्न - यामध्ये मुख्यत्वे मिळणारे धान्यरूपी उत्पादन, धान्य विकून मिळणारी काही रोख रक्कम तसेच नोकरी, मजुरी यासारख्या कामातून मिळणारे उत्पन्न यांचा समावेश होतो.

३. केला जाणारा खर्च - यामध्ये घरासाठी वापरलेले धान्य, तसेच कपडे, औषधे, अन्नधान्य व इतर गोष्टींवर केल्या जाणाऱ्या खर्चाचा समावेश होतो.

अन्न पुरवठा, स्थलांतर व कर्ज या तीन महत्वाच्या गोष्टींचा अभ्यास आर्थिक परिस्थितीवर प्रकाश टाकण्यास उपयुक्त आहे.

**जमीन**

सर्वेक्षण केलेल्या २६० कुटुंबापैकी २२ (८.५%) कुटुंबाकडे जमीन अजिबात नव्हती तर २३८ (९१.५%) कुटुंबे जमीनधारक होती.

तक्ता क्र. १

**सरासरी जमीन**

| | |
|---|---|
| प्रति कुटुंब सरासरी जमीन | ५.८४ एकर |
| लागवडीखालील सरासरी जमीन | ४.१० एकर |
| सरासरी पडिक जमीन | १.७४ एकर |

वरील तक्त्यामध्ये प्रत्येक कुटुंबाकडे असलेली सरासरी जमीन व लागवडीखाली असलेली व पडिक जमीन दर्शविली आहे.

तक्ता क्र. २

**गाववार जमीन धारणा**

| गाव | भूमिहीन | ०-२ एकर | २-५ एकर | ५-१० एकर | १० + एकर | एकूण कुटुंबे |
|---|---|---|---|---|---|---|
| १. वावर | ७ (११.७%) | १७ (२८.३%) | २३ (३८.३%) | ८ (१३.४%) | ५ (८.३%) | ६० (१००%) |
| २. साखरशेत | ८ (८.३%) | १५ (१५.६%) | ३९ (४०.५%) | १७ (१७.८%) | १७ (१७.८%) | ९६ (१००%) |
| ३. खरोंदा | ३ (६%) | १७ (३४%) | १७ (३४%) | ११ (२२%) | २ (४%) | ५० (१००%) |
| ४. चांभारशेत | ४ (८%) | १५ (३०%) | १३ (२६%) | १२ (२४%) | ६ (१२%) | ५० (१००%) |
| ५. अक्रा | - | १ | २ | १ | ४ | |
| एकूण | २२ (८.५%) | ६५ (२५%) | ९४ (३६.१%) | ४९ (१८.९%) | ३० (११.५%) | २६० (१००%) |

वरील तक्त्यामध्ये गाववार कुटुंबांची जमीनधारणा दर्शविली आहे. एकूणपैकी २२ (५%) कुटुंबे भूमिहीन होती तर उरलेल्या २३८ (९१.५%) कुटुंबांकडे कमीत कमी एक एकरापासून ते वीस एकरापर्यंत जमीन होती. सोयीसाठी या जमीन धारकांचे चार गट पाडले आहेत.

सर्वात जास्त म्हणजे २ ते ५ एकरापर्यंत जमीन असणारी ९४ (३६.१%) कुटुंबे त्या खालोखाल ० ते २ एकर जमीन असलेली ६५ (२५%) कुटुंबे आहेत. केवळ ३० कुटुंबाकडे दहा एकरापेक्षा जास्त जमीन आहे. साखरशेत गावामध्ये १० एकरापेक्षा जास्त जमीन असणारे १७ (१७.८%) शेतकरी आहेत. याउलट वावर गावात भूमिहीनांचे प्रमाण ११.७% आहे.

तक्ता क्र. ३

**जमातवार जमीन धारणा**

| जमात | भूमिहीन | ०-२ एकर | २-५ एकर | ५-१० एकर | १० एकरापेक्षा अधिक | एकूण कुटुंबे |
|---|---|---|---|---|---|---|
| १. कोकणा | ५ | १७ | २९ | १६ | ११ | ७८ |
| | (६.४%) | (२१.४%) | (३७.२%) | (२०.५%) | (१४.१%) | (१००%) |
| २. वारली | १० | ३५ | ३८ | १८ | ७ | १०८ |
| | (९.२%) | (३२.४%) | (३५.२%) | (१६.७%) | (६.५%) | (१००%) |
| ३. ठाकूर | ३ | ९ | १९ | ९ | १० | ५० |
| | (६%) | (१८%) | (३८%) | (१८%) | (२०%) | (१००%) |
| ४. इतर जमाती | ४ | ४ | ८ | ६ | २ | २४ |
| | (१६.७%) | (१६.७%) | (३३.३%) | (२५%) | (८.३%) | (१००%) |
| एकूण | २२ | ६५ | ९४ | ४९ | ३० | २६० |
| | (८.५%) | (२५%) | (३६.१%) | (१८.९%) | (११.५%) | (१००%) |

(इतर जमातींमध्ये ढोर कोळी, मल्हार कोळी, राज कोळी, महादेव कोळी या जमातींचा समावेश होतो.)

(कंसातील आकडे टक्केवारी दर्शवतात.)

जमातवार कुटुंबांची जमीन बघितली असता असे दिसते की इतर जमती (१६.७%) व वारली (९.२%) यामध्ये भूमिहीनांचे प्रमाण जास्त आहे, तर कोकणा व ठाकूर जमातीत सहा टक्क्याच्या आसपास आहे. दहा एकरापेक्षा अधिक जमीन असलेल्या कुटुंबामध्ये ठाकूर (२०%) व कोकणा (१४.१%) यांचे वर्चस्व दिसते. तर केवळ ६.५% वारली व ८.३% इतर जमातीची कुटुंबे दहा एकरापेक्षा अधिक जमीनीचे मालक असल्याचे पहायला मिळते.



यावरून कोकणा व ठाकूर जमातीची आर्थिक परिस्थिती वारली व इतर जमातीपेक्षा चांगली असल्याचा निष्कर्ष निघतो.

## व्यवसाय

तक्ता क्र. ४

### गाववार मुख्य व्यवसाय

| गाव | शेती | | | मजुरी | | | इतर | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | पु. | स्त्री | एकूण | पु. | स्त्री | एकूण | पु. | स्त्री | एकूण | |
| १. वावर | ९९ | ७६ | १७५ | ९ | ३ | १२ | ३ | १ | ४ | १९१ |
| | (१२.९%) | (९.९%) | (२२.८%) | (१.२%) | (०.४%) | (१.०%) | (०.४%) | (०.१%) | (०.५%) | (२४.८%) |
| २. साखरशेत | १५५ | १५६ | ३११ | ११ | ९ | २० | ३ | - | ३ | ३३४ |
| | (२०.२%) | (२०.३%) | (४०.५%) | (१.५%) | (१.२%) | (२.७%) | (०.४%) | | (०.४%) | (४३.३%) |
| ३. खरोंदा | ६५ | ६६ | १३१ | ५ | ४ | ९ | - | २ | २ | १४२ |
| | (८.५%) | (८.६%) | (१७.१%) | (०.७%) | (०.५%) | (१.२%) | | (०.३%) | (०.३%) | (१८.५%) |
| ४. चांभारशेत | ४५ | ३१ | ७६ | ४ | ४ | ८ | २ | - | २ | ८६ |
| | (५.९%) | (४.६%) | (९.९%) | (०.५%) | (०.५%) | (१.०%) | (०.३%) | | (०.३%) | (११.२%) |
| ५. अक्रा | ९ | ७ | १६ | - | - | - | - | - | - | १६ |
| | (१.६%) | (०.९%) | (२.५%) | - | - | - | - | - | - | (२.५%) |
| एकूण | ३७३ | ३३६ | ७०९ | २९ | २० | ४९ | ८ | ३ | ११ | ७६९ |
| | (४८.५%) | (४३.७%) | (९२.२%) | (३.८%) | (२.६%) | (६.४%) | (१.६%) | (०.४%) | (१.४%) | (१००%) |

**इतर व्यवसाय** – नोकरी, सुतारकाम, शिवणकाम, गवंडीकाम, व्यापार

तक्ता क्र. ४ मध्ये गाववार काम करणाऱ्या स्त्री पुरूषांची संख्या दर्शविली आहे. एकूण १४२७ लोकसंख्येपैकी ७६९ लोकांनी आपण सध्या काम करत आहोत असे सांगितले म्हणजे ५४% लोक काम करतात. या काम करणाऱ्यांपैकी ४१० (५३.%%) पुरूष तर ३५९ स्त्रिया (४६.७%) आहेत. स्त्री पुरूषांचे प्रमाण जवळजवळ सारखे आहे.

९२.२% टक्के लोकांनी शेती हाच मुख्य व्यवसाय असल्याचे तर ४९ (६.४%) लोकांनी मजुरी व केवळ ११ लोकांनी आपण इतर व्यवसाय करत असल्याचे सांगितले.

बहुतांश लोकांचा शेती हा मुख्य व्यवसाय असला तरी पावसाळ्याचा काळ वगळता इतर वेळेस अन्य व्यवसायही अर्थार्जनासाठी केले जातात. (तक्ता क्र. ५) १४२७ लोकसंख्येपैकी २६१ (१८.३%) लोक अन्य व्यवसाय करतात. त्यापैकी १८३ पुरूष (७०%) तर ७८ स्त्रिया (३०%) आहेत. अन्य व्यवसाय करणाऱ्यांमध्ये स्त्रियांचे प्रमाण पुरूषांच्या मानाने बरेच कमी आहे. अन्य व्यवसायात २३० (८८.२%) लोक मजुरी तर (९.६%) लोक इतर व्यवसाय व केवळ (२.४%) लोक शेतीच करत असल्याचे पहाणीत आढळून आले.

तक्ता क्र. ५ -

**गाववार अन्य व्यवसाय**

| गाव | शेती | | | मजुरी | | | इतर | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | पु. | स्त्री | एकूण | पु. | स्त्री | एकूण | पु. | स्त्री | एकूण | |
| १. वावर | - | १ | १ | ३९ | १८ | ५७ | २ | १ | ३ | ६१ |
| | - | (०.४) | (०.४) | (१४.९) | (६.९) | (२१.८) | (०.८) | (०.४) | (१.२) | (२३.४) |
| २. साखरशेत | २ | १ | ३ | ४४ | २९ | ७३ | १२ | - | १२ | ८८ |
| | (०.८) | (०.४) | (१.२) | (१६.९) | (११.१) | (२८.०) | (१४.६) | - | (१४.६) | (३३.७) |
| ३. खरोंदा | - | १ | १ | ३९ | १४ | ५३ | ८ | - | ८ | ६२ |
| | - | (०.४) | (०.४) | (१४.९) | (५.४) | (२०.३) | (३.१) | - | (३.१) | (२३.८) |
| ४. चांभारशेत | १ | - | १ | ३३ | १३ | ४६ | २ | - | २ | ४९ |
| | (०.४) | - | (०.४) | (१२.६) | (५.०) | (१७.६) | (०.८) | - | (०.८) | (१८.८) |
| ५. अक्रा | - | - | - | १ | - | १ | - | - | - | १ |
| | | | | (०.४) | | (०.४) | | | | (०.४) |
| एकूण | ३ | ३ | ६ | १५६ | ७४ | २३० | २४ | १ | २५ | २६१ |
| | (१.२) | (१.२) | (२.४) | (५९.८) | (२८.४) | (८८.२) | (९.२) | (०.४) | (९.६) | (१००) |

**इतर व्यवसाय** - नोकरी, सुतारकाम, शिवणकाम, गवंडीकाम, व्यापार

(कंसातील आकडे टक्केवारी दर्शवतात)

**शेती** -

जव्हार हा डोंगराळ भाग असून डोंगर उतारावर अथवा जमीनीच्या छोट्या छोट्या तुकड्यांवर शेती केली जाते. पाण्याची कुठलीही सोय नसल्याने केवळ पावसाच्या पाण्यावरच भात व नागली ही मुख्य दोन पिके घेतली जातात. आदिवासी लोकांमध्ये नागलीला धार्मिक महत्त्व आहे. नागलीला हे लोक 'कणसरी माता' (धान्य देवता) मानतात व तिची पूजा करतात. धार्मिक महत्वामुळेच वस्तुविनिमय करताना अथवा अडीअडचणीच्या काळातदेखील नागली कधीही विकली जात नाही. उडीद व तूर ही दोन कडधान्ये तसेच तेलासाठी खुरासणी (कारळे) ही अन्य पिके घेतली जातात. ज्वारी व भूईभूग ही पिके अत्यंत कमी प्रमाणात लावली जातात.

**खते व कीटकनाशके** - पारंपारिक पद्धतीने शेती केली जात असल्याने खते व कीटकनाशकांचा वापर फार थोड्या प्रमाणात केला जातो.

केवळ २७ (११.३%) शेतकऱ्यांनी आपण रासायनिक खतांचा वापर करत असल्याचे सांगितले.

त्यापैकी अकरा शेतकऱ्यांना आपण कुठले खत वापरत आहोत याची माहिती नव्हती. येथे मुख्यत्वेकरून युरिया म्हणजेच स्थानिक भाषेतील 'साखरी', पोटॅश व सल्फेट ही खते वापरली जातात.

कीटकनाशकांचा वापरदेखील केवळ २४ (१०%) शेतकरी करतात. चौदा शेतकऱ्यांना आपण कुठले कीटकनाशक वापरत आहोत याचे ज्ञान अजिबात नव्हते. डीडीटी, बीएचसी आणि एंड्रिल यासारख्या कीटकनाशकांचा मुख्यत्वे उपयोग केला जातो.

### पशुधन

**बैल** - ८४% कुटुंबामध्ये बैल असल्याचे आढळून आले. सर्व बैल, स्थानिक जातीचेच असून त्यांचा शेतीसाठी वापर केला जातो. ६४% कुटुंबामध्ये दोन किंवा त्यापेक्षा अधिक बैल होते.

**गायी** - १४४ (५५%) घरांमधून गायी आहेत. गायीचा उपयोग दूध काढण्यासाठी केला जात नाही कारण आदिवासींच्या धारणेनुसार ''गायीचे दूध हे वासरासाठीच असते माणसासाठी नव्हे.'' सर्व गायी स्थानिक जातीच्याच असून त्यापैकी बऱ्याचश्या भाकडच आहेत. गायींचा उपयोग केवळ शेणासाठीच होतो. या शेणाचा वापर घरे सारवण्यासाठी तसेच खत तयार करण्यासाठी केला जातो.

**टोणगे** - १७% कुटुंबातून टोणगे असल्याचे दिसले. टोणग्यांचा मुख्य वापर शेतीसाठीच केला जातो.

**बकऱ्या** - ३६% कुटुंबातून बकऱ्या पाळल्या असल्याचे पहाणीत आढळले. बकरीच्या दुधाचा वापर पिण्यासाठी करतात. धार्मिक विधींमध्ये बळी देण्यासाठीसुद्धा बकऱ्यांचा उपयोग होतो.

**कोंबड्या** - जवळजवळ ७९% टक्के घरातून कोंबड्या होत्या. आदिवासींमध्ये अनेक सण समारंभ, धार्मिक विधी केले जातात. त्यामधून कोंबड्याचा बळी देण्यासाठी निरनिराळ्या रंगाच्या कोंबड्याचा वापर होतो. इतर वेळेस अंडीदेखील खाल्ली जातात.

### कुटुंबाचा खर्च

आदिवासी कुटुंबामध्ये वर्षाला केल्या जाणाऱ्या खर्चाचा तक्ता क्र. ६ मध्ये अत्यंत ढोबळ मानाने विचार करण्यात आला आहे. कारण वार्षिक खर्च काढताना अनेक अडचणी येतात तरीपण ही माहिती निश्चितच उपयुक्त आहे.

आदिवासी समाजात मजुरी, भाडे देताना, सण समारंभ व धार्मिक विधींमध्ये वस्तू स्वरूपातच व्यवहार केले जातात. ग्रामीण व शहरी भागातील कुटुंबाच्या खर्चाशी याची तुलना केली असता असे दिसते की पैशाच्या स्वरूपात होणारा खर्च अत्यल्प आहे.

जमातवार कुटुंबाच्या वार्षिक खर्चाची तुलना केली असता कोकणांमध्ये वारली व ठाकूरांपेक्षा अधिक खर्च केला जात असल्याचे पहायला मिळते. कोकणांकडे जमीन जास्त आहे. साक्षरतेचे प्रमाण, बाहय जगाशी सततचा येणारा संपर्क तसेच इतर स्त्रोतांपासून रोख उत्पन्न हे घटक कोकणांचे उत्पन्न व त्यायोगे खर्च वाढवण्यास कारणीभूत ठरले आहेत.

तक्ता क्र. ६

**कुटुंबाचा वार्षिक खर्च**

| तपशील | कोकणा | वारली व ठाकूर |
|---|---|---|
| **अ) नेहमीचा खर्च** | | |
| धान्य, किराणा माल | रु. १२००/ प्रति वर्ष | रु. १२०० प्रति वर्ष |
| कपडे | रु. ८००-१२०० प्रति वर्ष | रु. ३००-५०० प्रति वर्ष |
| भाजीपाला | रु. १०० प्रति महिना | रु. २५-३० प्रति महिना |
| औषधपाणी | रु. ५०-१०० प्रति महिना | रु. १०-५० प्रति महिना |
| इंधन | रु. २००-३०० प्रति वर्ष | रु. २००-३०० प्रति वर्ष |
| शेतीसाठी मजूरांवरचा खर्च | रु. २५ प्रति दिन (हंगामामध्ये) | मजूर लावत नाहीत. |
| बैलजोडीचे भाडे | - | १२० किलो धान्य (एका हंगामासाठी) |
| सण समारंभ | रु. ६००-प्रति वर्ष | रु. २००-४०० प्रतिवर्ष |
| धार्मिक विधी | रु. ५० प्रत्येक विधीसाठी | रु. १०-१५ प्रत्येक विधीसाठी |
| **ब) प्रासंगिक खर्च** | | |
| घर बांधणी | रु. ४०००-८००० | रु. ३०००-५००० |
| विवाह | रु. ६०००-१२००० | रु. ४०००-५००० |

तक्ता क्र. ७

**अन्नधान्याचा तुटवडा**

| | जमात | कुटुंबे |
|---|---|---|
| १. | कोकणा | ४ (५.१%) |
| २. | वारली | १३ (१२%) |
| ३. | ठाकूर | २ (४%) |
| | एकूण | १९ (७.३%) |

(कंसातील टक्केवारी जमातीच्या एकूण कुटुंबांच्या प्रमाणात काढली आहे.)

सर्वेक्षण केलेल्या गावांमधून कुठल्याही कुटुंबाची भूकमार होत असल्याचे दिसले नाही. मात्र १९ कुटुंबांमध्ये (७.३%) मार्च ते जून या काळात अन्नधान्याच्या तुटवड्यामुळे एक जेवण कमी करावे लागत असल्याचे (३ जेवणाऐवजी २ जेवणे) सांगितले गेले. कमी जमीन, अपुरे धान्य उत्पादन व रोजगाराच्या संधीची अनुपलब्धता या गोष्टी अन्नधान्याच्या तुटवड्यास कारणीभूत असल्याचे दिसते. जमातवार वर्गीकरण बघितले असता ही समस्या वारल्यांमध्ये (१२%) सर्वात जास्त असल्याचे दिसते.

आता आपण गेल्या एक वर्षात वस्तू अथवा पैशात घेतल्या गेलेल्या कर्ज अथवा उधार उसनवारीचे प्रमाण पाहू.

तक्ता क्र. ८

**कर्ज व उधार उसनवारी**

| जमात | एकूण कुटुंबे | कर्ज घेणारी कुटुंबे | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. कोकणा | ७८ | ३५ | ४४.९% |
| २. वारली | १०८ | ७१ | ६५.७% |
| ३. ठाकूर | ५० | २७ | ५४% |
| ४. इतर जमाती | २४ | १३ | ५४.२% |
| एकूण | २६० | १४६ | ५६.२% |

सर्वेक्षण केलेल्या एकूण २६० कुटुंबापैकी १४६ कुटुंबांनी कोणत्या ना कोणत्या तरी कारणासाठी कर्ज अथवा उधार उसनवारी केली आहे. हे प्रमाण जवळजवळ ५६% इतके होते. जे निश्चितच जास्त आहे व आदिवासींच्या आर्थिक स्थितीवर चांगलाच प्रकाश टाकते.

तक्ता क्र. ८ प्रमाणे वारली जमातीमध्ये कर्ज घेण्याचे प्रमाण सर्वात जास्त (६५.७%) आहे. ठाकूर व इतर जमातींमध्ये सारखेच म्हणजे ५४% इतके आहे. केवळ ४५% कोकणा कुटुंबांनी कर्ज घेतले आहे.

यावरून कोकणा जमात ही ठाकूर व वारलीपेक्षा पुढारलेली आहे हे सिद्ध होते.

काही कुटुंबांनी पैसे तसेच वस्तु अशा दोन्ही स्वरूपात कर्ज घेतले. अशी एकूण १४६ कुटुंबातून १६६ कर्जाची प्रकरणे आढळली. या १६६ प्रकरणांपैकी ५१ प्रकरणांमध्ये (४३%) बँक, सहकारी संस्था, महामंडळ वगैरेसारख्या नोंदणीकृत संस्थांकडून कर्ज घेतले होते. तर उरलेल्या ९५ प्रकरणात (५७%) नातेवाईक, शेजारी इतर गावकरी अथवा सावकाराकडून कर्ज काढल्याचे दिसले.

५१% प्रकरणामध्ये अजून कर्ज फेडले जायचे आहे. कर्ज रोख अथवा वस्तूच्या स्वरूपात घेतले असले तरी ते बहुतेक वेळेस रोखीनेच फेडावे लागते.

आदिवासी कुटुंबांना अन्नधान्याचा तुटवडा भासल्यास आदिवासी महामंडळाकडून १०० किलो भात किंवा नागली कर्जरूपाने दिली जाते. एक वर्षानंतर परतफेड करताना ४१५ रुपये द्यावे लागतात.

८१ (४९%) प्रकरणांमध्ये रोख पैशाच्या स्वरूपात कर्ज घेतले गेले. रुपये ४०० पासून ते रुपये ५००० पर्यंत कर्ज घेतले गेले. कर्जाची सरासरी रक्कम रुपये २१६०/- इतकी होती. ८५ (५१%) प्रकरणांमध्ये धान्य स्वरूपात कर्ज घेतले गेले. सरासरी ९५ किलो धान्य प्रत्येक प्रकरणात कर्ज म्हणून घेतले गेले.

तक्ता क्र. ९ मध्ये कर्ज काढण्याच्या कारणांचे जमातवार वर्गीकरण केले आहे. एकूण १६६ प्रकरणांपैकी १०३ प्रकरणांमध्ये (६२%) अन्नधान्याचा तुटवडा भासल्याने २४ (१४.५%) प्रकरणांमध्ये शेतीसाठी तर ९% प्रकरणांमध्ये आजारासाठी कर्ज काढले गेले. विवाहासाठी कर्ज काढणाऱ्यांचे प्रमाण ६% एवढे होते.

अन्नधान्याचा तुटवडा ही येथील मुख्य समस्या आहे पावसाच्या पाण्यावर फक्त खरिपाचे पीक घेतले जाते. पिकलेले धान्य कुटुंबाला वर्षभर पुरत नसल्याने कर्ज काढले जाते. वारली जमातीत धान्यासाठी कर्ज काढणाऱ्यांचे प्रमाण सर्वात जास्त म्हणजे ७४% आहे तर कोकणा आणि ठाकूरांमध्ये हेच प्रमाण अनुक्रमे ५१% व ४८% आहे.

तक्ता क्र. ९

## कर्ज काढण्याची कारणे

| | जमात | अन्नधान्य तुटवडा | शेती | आजार | विवाह | इतर | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | कोकणा | २२ | ४ | ११ | ४ | २ | ४३ |
| | | (५१%) | (९.३%) | (२५.६%) | (९.३%) | (४.८%) | (१००%) |
| २. | वारली | ६० | १० | ४ | ४ | ३ | ८१ |
| | | (७४%) | (१२.३%) | (४.९%) | (४.९%) | (३.९%) | (१००%) |
| ३. | ठाकूर | १३ | ८ | - | - | ६ | २७ |
| | | (४८%) | (२९.६%) | - | - | (२२.४%) | (१००%) |
| ४. | इतर जमाती | ८ | २ | - | २ | ३ | १५ |
| | | - | (५३%) | १३%) | (१३%) | (२१%) | (१००%) |
| | एकूण | १०३ | २४ | १५ | १० | १४ | १६६ |
| | | (६२%) | (१४.५%) | (९%) | (६%) | (८.५%) | (१००%) |

(इतर जमातींमध्ये ढोर कोळी, मल्हार कोळी, राज कोळी, महादेव कोळी या जमातींचा समावेश होतो.)

तक्ता क्र. १०

## गेल्या एक वर्षातील स्थलांतर

| | गाव | एकूण सर्वेक्षित केलेली कुटुंबे | स्थलांतर केलेली कुटुंबाची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १. | वावर | ६० | ५१ | ८५% |
| २. | साखरशेत | ९६ | ८३ | ८६.४% |
| ३. | खरोंदा | ५० | ४१ | ८२% |
| ४. | चांभारशेत | ५० | ३४ | ६८% |
| ५. | अक्रा | ४ | ४ | - |
| | एकूण | २६० | २१३ | ८२% |

अन्नधान्याच्या तुटवड्यासाठी जसे कर्ज काढले जाते. त्याचप्रमाणे स्थलांतरदेखील केले जाते. जव्हार भागातून मोठ्या प्रमाणावर आदिवासींचे स्थलांतर होते. त्याची माहिती तक्ता क्र. १० मध्ये दिली आहे.

एकूण सर्वेक्षित केलेल्या कुटुंबांपैकी २१३ कुटुंबातून (८२%) किमान एक तरी सदस्याने रोजगारासाठी स्थलांतर केल्याचे आढळले. बहुधा पुरूष मंडळीच कामासाठी बाहेरगावी जातात, स्त्रिया, मुले व म्हातारी माणसे गावातच रहातात. क्वचितच सर्व कुटुंबच्या कुटुंब स्थलांतर करते.

डहाणू, जव्हार, ठाणे, भिवंडी, कल्याण, दहिसर व मुंबईची इतर उपनगरे या ठिकाणी रोजंदारीवर काम करणारे मजूर म्हणून स्थलांतर केले जाते. कामाच्या प्रकारानुसार दिवसाला सरासरी ३० ते ४० रुपये मजुरी मिळते.

सर्वसाधारणपणे दिवाळीनंतर म्हणजे ऑक्टोबर पासून ते मे पर्यंत स्थलांतर केले जाते. स्थलांतराचा काळ १५ दिवस ते १ महिना एवढाच असतो. एका वर्षात तीन ते चार वेळा स्थलांतर केले जाते.

तक्ता क्र. ११

**जमातवार स्त्रीपुरूष स्थलांतरितांचे वर्गीकरण**

| | जमात | पुरूष | स्त्रिया | एकूण | एकूण लोकसंख्या | स्थलांतरितांची एकूण लोकसंख्येशी टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | कोकणा | ८२ | ५ | ८७ | ४३६ | २०% |
| २. | वारली | १२२ | १० | १३२ | ५४२ | २४.४% |
| ३. | ठाकूर | ५३ | २० | ७३ | ३१० | २३.५% |
| ४. | इतर जमाती | ३० | १२ | ४२ | १३९ | ३०% |
| | एकूण | २८७ | ४७ | ३३४ | १४२७ | २३% |

(इतर जमातींमध्ये ढोर कोळी, मल्हार कोळी, राज कोळी, महादेव कोळी या जमातींचा समावेश होतो.)

वरील तक्त्यामध्ये जमातवार स्त्रीपुरूष स्थलांतरितांचे वर्गीकरण दर्शविले आहे.

वर्ष १९९३ च्या एक वर्षाच्या काळात एकूण लोकसंख्येपैकी ३३४ लोकांनी म्हणजेच लोकसंख्येपैकी २३% लोकांनी कामासाठी स्थलांतर केले. त्यापैकी २८७ (८६%) पुरूष तर ४७ (१४%) स्त्रिया होत्या.

एकूण पुरूष लोकसंख्येपैकी (७११), ४१% पुरूष तर एकूण स्त्री लोकसंख्येपैकी (७१६) ६.५% स्त्रिया मजुरीसाठी शहराकडे गेल्या. जमातींमध्ये स्थलांतराचे प्रमाण इतर जमातीत जास्त (३०%) त्या खालोखाल वारली (२४.४%) व ठाकूर (२३.५%) असे आहे. कोकणांमध्ये सर्वात कमी म्हणजे २०% प्रमाण होते.

लहान आदिवासी शेतकऱ्यांसाठी वर्षाच्या इतर हंगामात स्थलांतर करून मजूरी मिळविणे हा रोख पैशासाठीचा महत्वाचा स्त्रोत आहे. अशा प्रत्येक घरातून कमीत कमी एक माणूस मुंबई व आसपासच्या उपनगरात स्थलांतर करतो. दिवसाला ३० ते ४० रुपये रोज याप्रमाणे वर्षभरात सरासरी १५०० ते २००० रुपये कमविले जातात.

पैशासाठी स्थलांतर जरी केले तरी स्वत:च्या शेतीकडे अजिबात दुर्लक्ष केले जात नाही. १५ दिवस ते १ महिना स्थलांतर करायचे, पैसा कमवून गावी यायचे. शेताची निगा राखायची व परत २-३ आठवड्यांनी स्थलांतर करायचे. तीन चार वेळा अशा चकरा मारायच्या असे स्थलांतराचे स्वरूप असते. या स्थलांतराला हंगामी स्थलांतर असेच म्हणावे लागेल.

## आदिवासी जमातींमधील आर्थिक भिन्नता

सर्वसाधारपणे जव्हार भागातील आदिवासींच्या आर्थिक परिस्थितीचा विचार करता कोकणा, ठाकूर, वारली असा येथील जमातींचा आर्थिक पुढारलेपणाच्या बाबतीत क्रम लावावा लागेल.

कोकणा जमात ही सर्वात पुढारलेली आदिवासी जमात आहे. कोकणांमध्ये भूमिहीनांचे प्रमाण अत्यल्प तर मोठ्या शेतकऱ्यांची संख्या जास्त आहे. कोकणांची घरे देखील मोठी व प्रशस्त आहेत. घरामध्ये सागवानाच्या मोठमोठ्या खांबाचा वापर केलेला दिसतो. वारल्यांच्या गवताच्या छपरापुढे कोकणा घरांची मंगलौरी कौले उठून दिसतात. कोकणांच्या घरामध्येदेखील स्टील व पितळ्याची भांडी जास्त प्रमाणात आढळतात. कोकणांकडे शेतीसाठीची आधुनिक अवजारे दिसतात. कोकणा लोकांची वेशभूषादेखील इतर जमातींपेक्षा वेगळी व आधुनिक सस्कृतीच्या जवळ जाणारी आहे.

कोकणांमध्ये साक्षरतेचे प्रमाण जास्त आहे. कोकणा लोक आपल्या मुलांना गावापासून दूर शिक्षणासाठी ठेवायला, त्यांचे शिक्षण, प्रवास, रहाण्यासाठी खर्च करायला तयार असतात. यावरून असे दिसते की, घरातील काम करणारे दोन हात कमी असले तरी त्यांची मजूर ठेवून काम करून घ्यायची व त्यांना पैसे द्यायची तयारी असते. इतर जमातीतील लोकांना असे करणे शक्य नाही.

कुटुंबाच्या खर्चाचा तपशील बघितला असता देखील कोकणा, वारली व ठाकूरांपेक्षा वरचढ असल्याचे दिसून येते. जास्त खर्च होतो याचाच अर्थ कोकणा लोकांना शेतीच्या उत्पादनातून तसेच इतर व्यवसायातून जास्त रोख पैसा मिळत असला पाहिजे.

या सर्व गोष्टींवरून कोकणा जमात अन्य जमातींपेक्षा आर्थिकदृष्ट्या पुढारलेली असल्याचे दिसते पण त्याचे कारण मात्र सांगता येत नाही.

जमिनीची मालकी बघितली असता कोकणा लोक फार मोठ्या जमिनीचे मालक आहेत असे काही दिसत नाही. व्यवसाय व स्थलांतरितांची आकडेवारी पहातादेखील त्यापासून फार मोठे उत्पन्न मिळत असेल असे म्हणता येत नाही. मग प्रश्न असा पडतो की कोकणा लोकांचा जास्त खर्च होतो, त्यांचे राहणीमान देखील चांगले आहे तर त्यासाठी लागणारा रोख पैसा येतो कुठून ?

या प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी कोकणा जमातीच्या सामाजिक व सांस्कृतिक अंगावर प्रकाश टाकला पाहिजे. कोकणांचे बऱ्याच वर्षांपूर्वी 'सांस्कृतिकीकरण' झाले आहे. त्यामुळे ही जमात हिंदूंच्या मुख्य प्रवाहाजवळ आली आहे. याचा परिणाम अधिक ज्ञान, माहिती मिळवण्यात झाला आहे. त्यामुळेच शेतीच्या तंत्रज्ञानाबद्दल देखील त्यांना माहिती असावी. या तर्काला खालील निरीक्षणातून पुष्टी मिळते. कोकणांकडे स्वत:ची बैलजोडी असते. ते लोखंडी फळाचा नांगर वापरतात. त्यांना मातीचा प्रकार, नांगरणीची पद्धत, बियाण्यांचा दर्जा, खते या शेतीविषयक गोष्टींबद्दल बरीच माहिती आहे. याउलट काही वारली लोक अजूनही नांगरणी न करता केवळ काठीने खड्डा करून पेरणी करतात. वारल्यांना नांगरणीसाठी बैलजोडी भाड्याने घ्यावी लागते. ते शेतावरच्या कामासाठी मजूर लावू शकत नाहीत. मात्र कोकणांची तेवढी ऐपत असते व ते मजूर लावू शकतात. कोकणांकडे स्वत:ची पूर्वीपासून चालत आलेली लागवडीखालील जमीन असते. वारली लोक वनखात्याच्या जमिनीवर अतिक्रमण करून शेती करतात. ही जमीन गावापासून लांब असते. डोंगर उतारावर, खडकाळ भागात जमीन असल्याने व पाण्याची सोय नसल्याने जमिनीचा दर्जा व येणारे पीक बेताचेच असते. कोकणांच्या व वारली, ठाकूरांच्या जमीन मालकीमध्ये फारसा फरक नसला तरी कोकणांची जमीन अधिक सुपिक असावी. या सर्व गोष्टींना प्रति एकरी उत्पादनातून पुष्टी मिळते. कोकणा लोक सरासरी प्रति एकर ३ क्विंटल धान्य पिकवतात तर वारल्यांमध्ये १ ते २ क्विंटल प्रति एकर उत्पादन निघते.

बदललेले रहाणीमान व कमी होत चाललेली आदिवासींची वैशिष्टये यांचा शेतीची पद्धत व उत्पादनाशी थेट संबंध लावता येत नसला तरी आर्थिक विकासासाठी प्रयत्न करताना याही गोष्टींचा विचार केला पाहिजे. वरील दोन गोष्टींमध्ये असलेले संबंध काळाच्या ओघातच स्पष्ट होतील.

● ● ●


## वर्गणीदारांना सूचना

सर्व वार्षिक वर्गणीदारांनी सन १९९९ सालची आपली वर्गणी लवकरात लवकर पाठवून द्यावी. तसेच मागील थकबाकी असल्यास ती देखील भरणे. वर्गणी डीडी अथवा मनिऑर्डरनेच आमच्याकडे पाठविणे. तसेच त्यासोबत आपला संपूर्ण नाव व पत्ता लिहिण्यास विसरू नये. सहकार्याच्या अपेक्षेत -

**सचिव**

महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

६४, आनंद पार्क, औंध, पुणे ४११ ००७.

# जीवनचक्र

## जन्म

**गर्भारपण :** स्त्री जरी प्रथमच गर्भवती झाली तरी आदिवासींमध्ये कुठल्याही प्रकारचा आनंदोत्सव साजरा केला जात नाही. एका सुईणीने सांगितल्याप्रमाणे नियमितपणे मासिकपाळी होणारी विवाहित स्त्रीचे पतीशी लैंगिक संबंध आल्यानंतर ती गर्भवती होते. अगदी प्राथमिक अवस्थेतील गर्भ हा एक मांसाचा गोळाच असतो. नंतर हात व आणि पाय तयार होतात आणि हळूहळू त्यांचा आकार वाढत जातो. नऊ महिने आणि नऊ दिवस पूर्ण झाल्याखेरीज चांगले सुदृढ बालक जन्माला येत नाही. ३ ते ४ महिने जर स्त्रीला मासिक पाळी आली नाही तर तिला दिवस गेले आहेत असे समजतात. मासिक पाळीच्या काळामध्ये स्त्री इतरांपासून वेगळी बसत असल्यामुळे, तिला दिवस गेल्याचे घरातील इतर मंडळींच्या लक्षात येते.

'कोकणा' स्त्रिया मात्र सुईणीकडून, आपण गर्भवती असल्याची खात्री करून घेतात. स्त्रीला दिवस गेले असतानाच्या काळात कुठलेही वैशिष्ट्यपूर्ण धार्मिक विधी किंवा समारंभ केले जात नाहीत. गर्भारपणाच्या काळातही स्वयंपाक करणे, पाणी भरणे, जात्यावर दळण दळणे, लाकूडफाटा आणणे, शेतातील कामे करणे, यासारखी सर्व रोजची कामे स्त्री करत असते. सुईणीच्या मते अशा तऱ्हेची सर्व कामे त्या काळात करणे चांगले असते. मात्र नऊ महिने पूर्ण झाल्यानंतर लाकूडफाटा आणण्यासारखी कामे गर्भवती स्त्री करत नाही. गर्भारपणात कुठल्याही तपासणीसाठी स्त्रिया जात नाहीत. परंतु जर काही अडचण वाटली तर सुईणीचा सल्ला घेतला जातो. जर ए.एन.एम्. तेथे उपस्थित असेल तर गर्भवती स्त्रियांना काही औषधे आणि इंजक्शन्स् दिली जातात.

गर्भारपणाच्या काळात गर्भवती स्त्री कुठलाही खास असा आहार घेत नाही. भाकरी, डाळ आणि भात हे रोजचेच जेवण अशा स्त्रिया घेतात. मात्र खालील काही गोष्टी गर्भारपणाच्या काळामध्ये पूर्णपणे वर्जित असतात :-

ठाकूरांमध्ये गर्भवती स्त्रिला आंबा, करवंद, मासे यासारखे चिकट पदार्थ दिले जात नाहीत. खाल्ल्यास बाळाच्या अंगावर पांढरे ठिपके उठतात असा समज आहे.

कोकणांमध्ये पपई, अंडी, दारू हे पदार्थ वर्जित असतात. यामागचे कारण मात्र त्यांना सांगता आले नाही.

वारली लोकांमध्ये गर्भवती स्त्रीच्या आहारावर कोणतीही बंधने नसतात.

**बाळाचा जन्म :** बाळाचा जन्म साधारणत: किती दिवसात होईल याचा अंदाज सुईण गर्भवती स्त्रिला तपासल्यानंतर देते. गर्भारपणातील कळा सुरू झाल्यानंतर सुईणीला घरी बोलविले जाते आणि घरातच बाळाचा जन्म होतो. बाळंतपणासाठी घरामध्ये कुठलीही ठराविक जागा नसते. मात्र बहुतेक वेळा गोठ्याच्या जवळची खोली निवडली जाते. वावर गावामध्ये मात्र एका वारली कुटुंबात प्रसूतीसाठी स्वयंपाक घराचा वापर केला होता. बाळाच्या जन्माच्या वेळी तीन सुईणींची गरज असते. यापैकी एक पोट धरण्यासाठी दुसरी प्रत्यक्ष बाळाला बाहेर काढण्यासाठी तर तिसरी सहाय्यक म्हणून असते.

स्त्रीची सर्व बाळंतपणं ही सुरवातीपासून तिच्या नवऱ्याच्याच घरात होतात. साखरशेत येथील काही कोकणांमध्ये मात्र पहिल्या बाळंतपणासाठी स्त्रिला आपल्या माहेरी पाठवले जाते. बाळाच्या जन्मानंतर,

त्याच खोलीत नाळ पुरली जाते, ठाकूरांमध्ये नाळ गोठ्यामध्ये पुरली जाते. नाळ जर स्त्रीच्या पोटामधून आपोआप बाहेर आली नाही तर ती तिच्या हृदयाच्या बाजूला सरकते आणि तेथे अडकते. त्यामुळे मातेचा मृत्यू संभवतो अशी या लोकांची समजूत आहे.

बाळाच्या जन्मानंतर नाळ ब्लेडने कापतात. उंबरविहिर मधल्या एकाच प्रशिक्षित सुईणीने मात्र असे सांगितले की नाळ कापण्याआधी ब्लेड उकळत्या पाण्यात टाकले जाते आणि मगच त्याचा वापर होतो. ब्लेड जर उपलब्ध नसेल तर विळा किंवा कोयत्याचा वापर केला जातो. परंतु ब्लेड, विळा किंवा कोयत्यापेक्षा खूपच पातळ असल्यामुळे बहुधा ब्लेडचाच वापर केला जातो.

बाळाच्या जन्माच्या वेळी बाळाबरोबरच नाळही बाहेर येते. अशावेळी तिच्यात 'जीव' असतानाच ती कापली जाते. नाळ कापताना ती बाळाच्या बेंबीपासून ३ इंच अंतरावर कापतात. हे अंतर हाताच्या बोटांचा वापर करून अंदाजेच मोजले जाते. नाळ कापल्यानंतर तिच्या शिल्लक राहिलेल्या भागावर लगेच कापड गुंडळतात ज्यामुळे बाळाच्या पोटातील हवा बाहेर निघून जात नाही, असे दाईने सांगितले.

नंतर शेळीच्या लेंड्या आणि चिंचेचा पाला एकत्र करून जाळला जातो आणि त्यापासून निर्माण झालेली राख शिल्लक राहिलेल्या नाळेच्या भागावर लावली जाते. त्यामुळे नाळ सुकते आणि आपोआप गळून पडते. ''पूर्वी आम्ही यासाठी शेंदूराचा वापर करीत होतो. आणि आता यासाठी औषधी भुकटी वापरतो,'' असे एका कोकणा स्त्रीने सांगितले.

प्रसूतीनंतर आई आणि बाळाला ताबडतोब आंघोळ घातली जाते आणि नंतर आई बाळाला अंगावर पाजते. पहिले ५ दिवस आईच्या आहारात फक्त वरईच्या पेजेचा समावेश असतो. 'आईने जर त्या काळात इतर काही खाल्ले तर बाळाचे पोट फुगते,' असा समज आहे. स्वत: पिकविलेली बहुतेक वरई विकली जात असल्यामुळे, काही घरांमधून प्रसूती झालेल्या स्त्रीला भाताची लापशी देतात. पाचवीच्या पूजेनंतर मातेच्या आहारात डाळ, ज्वारीची भाकरी आणि भाताचा समावेश केला जातो.

**वावर गावातील वारली कुटुंबातील पाचवीची पूजा -**

घरातील स्त्रीच्या प्रसूतीनंतर सुईणीने प्रथम, ज्या खोलीत प्रसूती झाली होती त्या खोलीच्या एका भिंतीवर शेणाने चौरस सारवून घेतला. नंतर सगळे घर आणि चूलही सारवून घेतली. त्यानंतर सुईणीने बाळाला आंघोळ घातली. ह्यावेळी बाळाला तेल लावले नाही. हळद, कुंकू, गुलाल, शेंदूर, बुक्का आणि चुलीतली राख यांच्या छोट्या छोट्या पुड्या सुईणीने बनविल्या. नंतर तिने वेखंडाचा तुकडा बाळाच्या डाव्या हातात आणि आईच्या गळ्याभोवती बांधला. बाळ रडायला लागले तर त्याला हे वेखंड चाटवतात. नंतर सारवलेल्या भिंतीवर सुईणीने हळद, कुंकू, गुलाल, शेंदूर आणि बुक्क्याच्या प्रत्येकी १० ठिपक्यांच्या दोन दोन ओळी चढत्या क्रमाने काढल्या. बुक्क्याचे सहा ठिपके दोन बाजूंना काढले. ह्या सर्वातून देवाला साकडं घातले जाते.

एका सुपावर डाव्या हातावर बाळ घेतलेल्या स्त्रीचे चित्र काढले. उजव्या बाजूला पाच मुठीभरून तांदूळाचे ढीग ठेवले. सुपाच्या एका बाजूला मातीचा दिवा लावला.

तांदुळाच्या प्रत्येक ढिगावर एक २५ पैशाचे नाणे ठेवले. नंतर बाळाला झोळीत घातले. आणि पाच वेळा त्याला झोळीच्या खालून आईच्या हातात दिले. ह्यावेळी

ज्यांनी झोळीला आधार दिला, त्या सर्वांना प्रत्येकी १० पैसे दिले. सुईणीला द्रोणामधून महुआ दिली, सगळ्या देवतांची नावे घेत पाच थेंब सुईणीने जमिनीवर शिंपडले. द्रोणातील महुआ पुन्हा बाटलीमध्ये घातली आणि ती सर्वांना पिण्यासाठी दिली गेली. नंतर एकाच घोटात सर्वांनी महुआचे प्राशन केले. ह्याप्रसंगी जे जे उपस्थित होते त्या सगळ्यांना भात आणि तुरीच्या उकडलेल्या शेंगा दिल्या गेल्या.

पाचवीच्या पूजेचा सोहळा वारली आणि कोकणा या दोनही जमातींमध्ये सारखा असतो. कोकणांमध्ये ह्या सोहळ्याच्या शेवटी बाळंतीण आणि तिचे मूल यांना चुलीजवळ नेले जाते. 'आता दैनंदिन कामास त्या स्त्रीने सुरुवात करण्यास हरकत नाही', असा याचा अर्थ. परंतु, पाणी भरण्याची अपेक्षा मात्र ह्या बाळंतिणीकडून केली जात नाही. नजर लागू नये म्हणून बाळाच्या हातात काळा दोरा किंवा मणी बांधले जातात.

ठाकूरांमध्ये मात्र पाचवीची पूजा थोड्या वेगळ्या पद्धतीने होते. पाचव्या दिवशी सुईण, गोठ्यामध्ये नाळ पुरुन त्यावर शेंदूर, हळद, कुंकू, गुलाल इ. वाहते आणि त्याची पूजा करते. त्याजागी मातीचा दिवा लावते. नैवेद्य म्हणून नारळ फोडते आणि त्यानंतर बाळाला झोळीत ठेवते.

पाच दिवस आई आणि बाळाची काळजी सुईण घेते. हे पाच दिवस सुईण बाळाला तेल लावून आंघोळ घालते. बाळंतिणीलाही आंघोळ घालते. मात्र तिला तेल चोळत नाही. पाचवीच्या पूजेनंतर घरातील सर्वात वयस्क स्त्री बाळंतिणीला आणि बाळाला जवळजवळ पाच आठवडे आंघोळ घालते. प्रसुती नंतर पहिले पाच दिवस बाळंतीण आणि बाळाच्या आरोग्याची काळजी सुईण घेते. पाचवीच्या पूजेनंतर सुईणीला २५ ते ३० रुपये मोहाची तयार केलेली दारू आणि अडीच ते तीन किलो तांदूळ भेट म्हणून दिले जातात.

प्रसुतीनंतर बारा दिवसांचा काळ बाळंतिणीसाठी अशुद्ध म्हणून समजला जातो. बारा दिवसानंतर एक समारंभ साजरा करून तिला शुद्ध करून घेतले जाते. प्रसुतीनंतर बाराव्या दिवशी रिकामे मातीचे मडके घेऊन बाळंतीण स्त्री विहिरीजवळ जाते. विहिरीच्या जवळपास पडलेला कोणताही दगड विहिरीजवळ ठेवला जातो. त्या दगडाला शेंदूर लावून अगरबत्ती लावली जाते. विहिरीजवळ उडीद, तांदूळ, नागली, वरई आणि खुरासणी अशी पाच प्रकारची धान्य ठेवली जातात आणि त्यावर पाच वेळा पाणी शिंपडतात. नंतर विहिरीची पूजा करून पाणी भरण्यास प्रारंभ केला जातो.

**प्रसुतीनंतर घेतला जाणारा आहार आणि इतर बंधने–**

प्रसुतीनंतर जवळजवळ महिनाभर ठरविकच आहार घेतला जातो. उडीद डाळ, नागली किंवा ज्वारीची भाकरी, मसालेदार पदार्थ, गूळ हे पदार्थ या काळात वर्ज्य समजले जातात. हा आहार घेतला तर बाळाचे पोट फुगते आणि त्याला अपचन होते असा समज आहे.

कांदा, लसूण, तेलकट पदार्थ, कोंबडी आणि बकरीचे मटण हेही वर्ज्य समजले जाते. त्यामुळे आईच्या स्तनातून दूध कमी येते असा समज आहे. परंतु भाजीवर घेतलेले कच्चे तेल मात्र वर्ज्य नसते.

या काळात अंडीही खायला परवानगी नसते. कोंबडी दूध देत नसल्यामुळे तिचे अंडे आईसाठी अयोग्य समजले जाते. तसेच या काळात भाकरीच्या कडाही बाळंतीण स्त्री खात नाही. भाकरीच्या कडा कडक असल्यामुळे आईचे दूध पातळ होते असा समज आहे.

प्रसुतीनंतर बाळाला लगेचच अंगावर पाजले जाते आणि अशी स्त्री दुसऱ्यांदा गरोदर राहीपर्यंत पहिल्या बाळाला अंगावर पाजणे चालूच राहते.

इतर बंधनांमध्ये, प्रसुतीनंतर दोन महिने स्त्रीला पतीशी लैंगिक संबंध ठेवणे वर्ज्य असते. असे केल्यास त्या स्त्रीचा मृत्यू होतो असा समज आहे.

**आईचा आहार :** वरईच्या पेजेला बाळंतपणातील आहारामध्ये महत्त्वाचे स्थान आहे. वरई पौष्टिक आणि पचायला हलकी असल्यामुळे आहारात मुख्यत्वाने वापर केला जातो. जंगलात सापडणाऱ्या एका विशिष्ट प्रकारच्या पांढऱ्या मुळांमधून रस काढतात आणि त्याचा वापर आईच्या आहारात करतात. त्यामुळे आईची दूध निर्मिती क्षमता वाढते.

**जावळ आणि बारसे :** साधारणपणे तीन महिन्यामध्ये जेव्हा मूल मान धरू लागते त्यावेळी त्याचा मामा त्याचे जावळ उतरवितो. कोकणा आणि ठाकूरांमध्ये, सोमवारचा दिवस ह्यासाठी शुभ समजतात. तर वारलींमध्ये बुधवार, शुक्रवार आणि रविवार. मुलांच्या मामाला त्याबद्दल कोकणांमध्ये हातरूमाल तर ठाकूरांमध्ये नारळ दिला जातो. बाळाचे नाव ठेवण्यासाठी कुठलाही खास समारंभ नसतो. बारसे कधीही केले जाते. काही जण अंगणवाडी सेविकेला यासाठी आमंत्रित करतात. बाळाच्या बारशानंतर आरोग्य सेवकाला त्याबद्दल माहिती पुरविली जाते.

जी स्त्री गर्भ धारण करू शकत नाही तिला 'साधी बायको' असे म्हटले जाते : नजर लागल्यामुळे किंवा तिच्या पोटात मांसाचा गोळा तयार झाल्यामुळे ती गर्भ धारण करू शकत नाही असा समज आहे.

स्त्री गर्भवती असताना जर तिने शरीर संबंध चालू ठेवले तर पोटातील गर्भाचा मृत्यू होतो आणि मूल मृत अवस्थेत जन्माला येते अशी एक धारणा आहे.

**शिडवा :** गर्भ धारणेची क्षमता नसणे, मूल पोटातून काढून टाकावे लागणे, मृत अवस्थेतील मूल जन्माला येणे, किंवा जन्मतःच ते आजारी पडणे, यासारख्या कारणांवर उपचार म्हणून 'शिडवा' केला जातो. यासाठी भगताचा सल्ला घेतात. भगत सुपामध्ये तांदळाचे दाणे पसरतो आणि स्वतःशीच काहीतरी गणित करुन औषध सांगतो. नंतर मंत्र म्हणून हे तांदळाचे दाणे ताईतामध्ये बांधतो आणि हा काळा ताईत आई आणि बाळाच्या गळ्यात घालायला देतो. आजारातून बरे झाल्यानंतर भगताबरोबर कुटुंबातील सगळेजण जंगलात जातात आणि तेथे शिडवा उतरवला जातो. नंतर बकरी किंवा कोंबडी कापून एकत्र जेवण केले जाते.

## मासिक पाळी

(प्रचलित शब्द - **धानफुल** - कोकणांमध्ये
**धान** - ठाकुरांमध्ये, **पालवी** - वारलींमध्ये)

वयात आलेली मुलगी मासिकपाळी सुरु झाल्यानंतर आपल्या पेहेरावात परिवर्तन करते. गुडघ्यापर्यंत नेसलेली अर्धी साडी, पोलके आणि डोक्यावर किंवा खांद्यावर घेतलेले फडके (ओढणी) असा तिचा पोषाख बनतो. मासिकपाळी सुरु झाल्यानंतर, घरामधला जो खांब छताला आधार देत असतो, त्या खांबाला ती मुलगी धरते. खांब धरल्याने भविष्यकाळात मासिक पाळीच्या वेळेस जास्त रक्तस्त्राव होत नाही असा समज आहे. इतर कोणत्याही प्रकारचा धार्मिक विधी केला जात नाही.

मासिक पाळी बद्दलची माहिती मुलींना आपल्या समवयस्क मैत्रिणीकडून किंवा घरातील मोठ्या बायकांकडून कळते. काही वेळा घरातल्या मोठ्या बायकांच्या मुख्यतः मासिक पाळीच्या काळातील वर्तनावरूनही, त्यांना हे समजते. मासिक पाळी चालू असताना कोणतेही विशेष कपडे घातले जात नाहीत. परंतु, हल्ली अगदी मोजक्या बायकांनी असे कपडे वापरण्यास सुरुवात केली आहे. त्या हे कपडे रोज धुतात आणि नवीन घालतात ज्या स्त्रिया असे विशिष्ट

कपडे वापरत नाहीत त्या, त्यांची साडी दिवसातून दोन वेळा बदलतात किंवा कमरेभोवती दुहेरी साडी नेसतात. ह्या काळात रोज आंघोळ केली जाते. मासिक पाळीच्या शेवटच्या दिवशी डोक्यावरून आंघोळ करतात. मासिकपाळीचा हा काळ स्त्रियांसाठी 'प्रदूषणाचा काळ' म्हणून समजला जातो. पाळीच्या काळात त्या मुख्यत: चुलीपासून दूर बसतात. त्या काळामध्ये स्वयंपाक करणे, पाणी भरणे, खळ्यावर काम करणे, इतरांना स्पर्श करणे हे सर्व वर्ज्य असते. खळं ही पवित्र जागा मानली जाते. जर विटाळशी स्त्रीने खळ्यावर काम केले तर पुढील वर्षी धान्याचे उत्पादन घटते अशी या लोकांची धारणा आहे. पुरुष माणसांना जेवायला वाढणे देखील या काळात वर्ज्य असते. कारण पुरुष धार्मिक विधींमध्ये सहभागी होत असतात, म्हणून ते अशुद्ध होता कामा नयेत, असा समज आहे.

## विवाह

मुली वयात आल्यानंतर आणि स्वयंपाक, पाणी आणणे, मुलांना सांभाळणे, शेतातली आणि जंगलातली कामे करणे यासारख्या सर्व गोष्टी शिकल्यानंतर, त्या लग्नासाठी योग्य समजल्या जातात. मुलांसाठी मात्र 'वयात येणे' ही एकच बाब लग्नास योग्यता ठरविण्यासाठी मानली जाते. साखरशेत येथे मुलांचे लग्नाचे सरासरी वय १७ ते १८ वर्ष तर मुलींचे १३ ते १४ वर्ष होते. वावरमध्ये, वारली समाजात १२व्या वर्षी सुद्धा मुलांची लग्न होतात आणि ८-९ वर्षाच्या मुलीसुद्धा लग्नाला उभ्या राहतात. साधारणत: गावापासून १५ कि.मी. आसपासच्या क्षेत्रातच मुलींची लग्न केली जातात.

पूर्वी आई-वडिलांमार्फत लग्न ठरविली जात परंतु आता एकत्र शिक्षणपद्धतीमुळे मुले स्वत:च लग्न ठरवतात आणि आपल्या पालकांना सांगतात. मुलाचे



आई-वडिल मुलीच्या पालकांकडे जातात आणि मुलीचा हात मागतात. मुलीच्या घरी जाताना भेट म्हणून दारूची बाटली नेतात. जर मुलीच्या पालकांना स्थळ पसंत असेल, तर दारूची बाटली स्वीकारली जाते. मुलगी बघताना तिचे चारित्र्य, वर्तणूक, कामसूवृत्ती, इ. गोष्टींची शेजारापाजाऱ्यांकडून चौकशी केली जाते. मुलाचीही अशीच चौकशी होते. परंतु, मुलगा पहताना घराण्याची मालमत्ता आणि जमीन यावर विशेष भर असतो. मुलगा जर शिकलेला असेल तर या गोष्टी दुय्यम ठरतात. लग्न ठरविताना मुलीचे मतही विचारात घेतले जाते. मुलापेक्षा मुलगी वयाने मोठी असली तरी ती कामसू असल्यास असा विवाह केला जाऊ शकतो.

मुलगी एकदा पसंत केल्यानंतर, दुसऱ्या भेटीसाठी मुलाचे पालक गावातील सरपंच, पोलीस पाटील आणि गावातील अन्य काही प्रतिष्ठित बैठकीच्या वेळी

मुलाबरोबर जातात. ठाकूर आणि वारलींमध्ये बैठकीच्या वेळी मुलगा बरोबर जात नाही. बैठकीत लग्नाचा खर्च आणि मुलीला देण्यात येणारे वधूमूल्य याबाबत ठरविले जाते. कोकणांमध्ये बैठकीच्या वेळी मुलगाही बरोबर जातो आणि ह्यावेळी मुलगी त्याला प्रथमच लपूनछपून बघते. मुलीला आलेले पाहिले स्थळ कधीच नाकारले जात नाही. असे केल्यास मुलीचे लग्न जमविणे कठीण जाते. वधूमूल्य देण्याची पद्धत सर्व आदिवासींमध्ये प्रचलित आहे. सर्वसाधारपणे साखरपुड्याच्या वेळी वधूमूल्य देतात. पैसे आणि वस्तूंच्या स्वरुपात मुलीचे आई- वडिल मुलाकडे वधूमूल्य मागतात. जवळजवळ अडीच मण धान्य (१०० किलो) यामध्ये, तांदूळ, वरई, तूर आणि उडीद यांचा समावेश असतो आणि एक हजार रुपये मुलीकडच्यांना दिले जातात. कोकणांमध्ये मुलीला धान्य आणि चारशे रुपये दिले जातात. वधुपित्याच्या आईला आणि वधूच्या आईला साडी; मुलीच्या मामाला कोट, शेला पागोटे आणि इतर नातेवाईकांना १५१ रु. दिले जातात.

साखरपुड्यासाठी प्रचलित असलेले शब्द -<br>
कोकणांमध्ये - साखरपुडा<br>
ठाकूरांमध्ये - वऱ्हाडकी<br>
वारलींमध्ये - साखरपुडा किंवा वाऱ्हाडकी

साखरपुडा मुलीच्या घरी होतो. ज्यावेळी नवरा मुलगा मुलीकडे येतो त्यावेळी सगळे गावकरी त्याला त्यांनी टाकलेल्या कचऱ्याजवळ बसायला लावतात. नंतर मुलीकडच्यांना कळविले जाते आणि मुलाला तिच्या घरी नेतात. सुवासिनी वधुला साडी, पोलके आणि कापड देते. त्या साडीला खोबऱ्याची वाटी, सुपाऱ्या, हळदी, खारीक आणि ५ ते १० पैशाची नाणी बांधलेली असतात. समारंभापूर्वी गावकऱ्यांची संमती घेतली जाते. साडी परिधान केल्यानंतर वधू सर्व मोठ्या माणसांच्या पाया पडते. नथ, कानातली, कर्णफुले, दागिने वधूला देण्यात येतात. नंतर जमलेल्या सगळ्यांना डाळ, भात आणि तांदुळाच्या पिठात साखर घालून जेवण देतात. ह्यावेळी केला जाणारा जेवणाचा खर्चही नवऱ्यामुलालाच करावा लागतो. यानंतर तरुण मुले-मुली संध्याकाळपर्यंत नृत्य करतात.

**विवाहसोहळा :** मुलाची आर्थिक स्थिती जर चांगली असेल तर साखरपुड्याच्याच महिन्यात किंवा त्याच्या पुढच्या वर्षी लगेच लग्न करतात.

फेब्रुवारी ते जून महिन्याचा काळ लग्नांसाठी चांगला समजला जातो. लग्नसोहळा चार ते पाच दिवस चालतो.

**पहिला दिवस** : 'हळदी' - नवरदेवाला सजविणे-

वधू आणि वर दोघांच्याही घरी आपापला हळदी समारंभ होतो. नवरदेवाला त्याच्या घरातील विवाहित स्त्रिया आंघोळ घालतात. नवरदेव एका दगडी पाटावर चादर आंथरून बसतो. उपस्थित असलेल्या पाच जोडप्यांपैकी एक जोडपे त्याला हळद लावते. हा कार्यक्रम दिवसभर चालतो.

नंतर तेल लावून मर्दन करण्याचा कार्यक्रम असतो. ह्यासाठी दगडी पाटावर एक घोंगडी अंथरतात. त्याच्यावर वरईचे तांदूळ पसरवितात. पाटाच्या चारही बाजूंना सुपारी, हळद, खारका, खोबऱ्याच्या वाट्या आणि चार भांडी ठेवतात. ह्यापैकी एका भांड्यात पाणी असते, दुसऱ्यामध्ये वरईचे तांदूळ, तिसऱ्या भांड्यात नाणी आणि चौथ्या भांड्यात नारळ आणि आंब्याची पाने ठेवतात. ही चारही भांडी एका दोऱ्याने एकमेकांना बांधतात. नंतर नवरदेव पाटावर बसतो. जमलेल्या स्त्रिया त्याच्याभोवती दोरा गुंडाळत गाणी म्हणतात. रात्री शिजवलेली मसाला घातलेली डाळ आणि भाताचे उंडे बनवून नवरदेवासमोर ठेवले जातात. नंतर एक विवाहित

स्त्री आणि नवरदेव यांना गोधडीमध्ये गुंडाळले जाते. नवरदेवाला ह्यानंतर ५ उंडे गोधडीमधून द्यावे लागतात आणि ज्या व्यक्तींना तो हे देईल, त्या व्यक्ती त्याला न बघता, ओळखाव्या लागतात. जर त्याला ह्या व्यक्ती ओळखता आल्या नाहीत तर शिक्षा म्हणून त्याला प्रत्येकी ८ रुपये (एका दारूच्या बाटलीची किंमत) द्यावे लागतात.

एकीकडे 'तेलवण' चालू असतानाच दुसरीकडे भगत पूजा करून कुलदैवताला आणि गावदेवाला साकडं घालतो. नवरदेवाच्या नावाने एका मोठ्या लाल कापडाचा तुकडा देवाला वाहिला जातो. तेलवणानंतर नवरदेवाला बाशिंग, रुईच्या फुलांच्या मुंडावळ्या बांधून सजविले जाते. त्या अगोदर सगळ्या गावकऱ्यांची संमती घेतली जाते. नंतर सगळेजण मिळून नाच करतात.

**दुसरा दिवस** : दुसऱ्या दिवशी सकाळी नवरदेवाला हळद लावून अभ्यंगस्नान घातले जाते. नवीन वस्त्रे परिधान करुन, नवरदेवाला त्याचा भाऊ आणि वहिनी घरासमोर उभारलेल्या मंडपात आणतात. त्याला खोबरे खाण्यासाठी देतात. तेथून नवरदेवाला नववधूच्या घरी नेण्यात येते. वधूच्या गावी, ज्याठिकाणी होळी पेटविलेली असते, त्या जागी नवरदेवाला आणतात. होळीमध्ये घालण्यासाठी मुलाकडच्यांना पाणी, शिजविलेला तांदूळ (भात) आणि लाकडे दिली जातात. नवरदेव ह्यातील पाच चमचे भात मुलांना वाटतो. इतर सर्वजण मात्र महुआ घेतात. ह्यानंतर नवरदेवाला खांद्यावर उचलून वधूच्या घरासमोरील मंडपात आणले जाते. ब्राह्मण भटजी आल्यांनतर, वधूला मंडपात आणतात. हे ब्राह्मण भटजी हिंदू ब्राह्मणच असतात असे नाही. बहुधा हे कोकणा जातीचे असून त्यांना धार्मिक विधी, मंगलाष्टके आणि मंत्र अवगत असतात. उखळावर पसरविलेली वरई (वरईचे तांदूळ) अक्षता म्हणून सगळ्यांना वाटतात. नवरदेव आणि नववधू यांच्यामध्ये पांढरा अंतरापट धरला जातो. कोकणा पंडितच अंतरपाट धरतात, मंगलाष्टके म्हणतात. त्यांनी टाळ्या वाजविल्यानंतर विवाह समारंभ संपतो. मात्र गावकऱ्यांची संमत्ती मिळविल्यानंतरच विवाह होतो आणि आनंदोत्सव साजरा केला जातो. ज्या पाटावर नवरदेव आणि वधू उभे राहतात त्याला 'मामपाट' म्हणतात. हा पाट मुलीचा मामा उंबराच्या लाकडापासून बनवितो. वधूला हिरवी साडी आणि पोलका नवरदेवाकडून मिळतो तर नवरदेवाला शेला आणि पागोटे वधूकडून दिले जाते. भटजी ह्यानंतर दोघांच्याही डोक्यावरचे बाशिंग काढतात. नंतर ब्राह्मण भटजीला नारळ आणि ५० रुपयापर्यंत दक्षिणा दिली जाते.

विवाहानंतर 'सोनटक्के' नावाचा खेळ खेळला जातो. ह्यामध्ये भटजी एका ताटलीमध्ये अनेक नाणी घेतो. नवरदेवाला आपला एकच हात वापरून नाणी उचलता येतात तर वधूला दोनही हात वापरण्याची परवानगी असते. जर वधूने वरापेक्षा जास्त नाणी गोळा केली तर ती त्याच्यापेक्षा श्रेष्ठ समजली जाते. ह्यावरून तिची क्षमता ठविली जाते. नवरदेव आणि नववधूने जर महुआची मागणी केली तरच त्यांना ती पिण्यासाठी देतात. इतर सर्व उपस्थितांना महुआ दिली जाते. लग्नानंतरच्या जेवणामध्ये भात आणि बटाटा-वांग्याची भाजी असा बेत असतो. जेवणानंतर सगळे तरुण 'ढोल नृत्य' करतात. ह्या नृत्यामध्ये नवरदेव आणि वधू यांना खांद्यावर घेऊन नाचतात.

**तिसरा दिवस** : दोघांनाही सकाळच्या वेळी लग्नमंडपात आणले जाते. नववधूची बहिण किंवा वहिनी दोघांनाही ओवाळते. नवरा नवरीला आंघोळ घालतात. नवरदेवाला हळद तर नवरीला कुंकू लावतात. त्यानंतर नवऱ्या मुलीच्या भावाला आणि वहिनीलाही हळदीचा टिक्का कपाळावर लावतात आणि नंतर सर्वजण मिळून होळीपाशी जातात; पेटलेल्या होळीभोवती फेर मारतात.

पेटलेल्या होळीभोवती चार बांबू उभे केलेले असतात आणि त्यावर पांढरे कापड टाकलेले असते. सर्वांना भेटून झाल्यांनतर नवरी मुलगी सगळ्यांचा निरोप घेते आणि नवऱ्याच्या घरी जाते. दोघांनाही नवऱ्याच्या घरी खांद्यावर उचलून आणले जाते. गृहप्रवेश करण्याआधी दोघांनाही ओवाळतात आणि मुलीकडच्यांना जेवण घालतात. सायंकाळी सगळी तरुण मंडळी नाच करतात.

**चौथा दिवस** : सकाळी देवाची आरती केल्यानंतर, वधू-वराच्या डोक्यावरचे बाशिंग सोडतात आणि पळसाच्या पानांवर ठेवतात, नंतर नवरदेव वधूला कमरेवर घेऊन नाच करतो. पळसाच्या पानांवर सोडून ठेवलेले बाशिंग नवऱ्या मुलीच्या हातात दिले जाते. ती ते नवऱ्याच्या धाकट्या भावाला देते. घराच्या छपरावर बसलेला हा तिचा दीर बाशिंग घराच्या छपरामध्ये खोचून ठेवतो आणि 'घर' किंवा 'म्हैस' वगैरे गोष्टींची मागणी करतो.

नववधूला नागलीची भाकरी करायला सांगतात. जर भाकरी मोडली तर असे समजतात की हे दोघे एकत्र नांदू शकणार नाहीत. अशावेळी दोघेही मंडपात जातात आणि कोंबड्याचा नवस करतात. नवरी कोंबड्याला पायाकडून पकडून ठेवते आणि नवरा तो कापतो आणि शिजवितो. नवरीला गावकरी वैवाहिक जीवनाबद्दलचा सल्ला देतात. तिने केलेल्या नागलीच्या भाकरीवर कोंबड्याचे शिजविलेले पाय ठेवून, तशाच प्रकारे ते नवरदेवाला खाण्यासाठी दिले जाते. त्याने न खाल्लेला भाग वधू नंतर खाते. इतर सर्वांसाठी बकरा कापून, मेजवानी दिली जाते. नंतर दोघेही पुन्हा होळीजवळ जातात, आणि 'शिव' मोडण्याचा समारंभ होतो. म्हणजे - होळीभोवती उभ्या केलेल्या बांबूपैकी एका बांबूच्या भोवती पाच उंडे बांधलेले असतात. हा बांबू हवेत फेकला जातो. त्याच्याभोवती असलेले उंडे मोडतात आणि नवरदेवाला खाण्यासाठी देतात. शिल्लक राहिलेला भाग नवरी खाते. इतर उंडे गावकऱ्यांमध्ये वाटले जातात.

दुसऱ्या दिवशी नवरी माहेरी जाऊन पाच दिवस तेथेच राहते. पाचव्या दिवशी नवरा आपल्या बहिणीला घेऊन नवरीच्या घरी येतो. तिच्या घरी जाण्याआधी तो तिच्या गावातील सर्व मंडळींना भेटून येतो. त्यांना भेट म्हणून महुआ खरेदी करण्यासाठी पैसे देतो. नवरदेवासाठी कोंबड्याचा नवस बोलला जातो. नवरा आणि नवरी दोघांनाही हळद लावतात. त्यांना मंडपाखाली आणून नारळ आणि पाणी देतात. मुलगी आता नवऱ्याबरोबर जाणार असल्यामुळे तिचे सगळे नातेवाईक तिला भेटण्यासाठी येतात.

नवऱ्याच्या घरी आल्यावर पुन्हा त्यांना ओवाळतात. नवऱ्या मुलीला पडताळून पाडण्यासाठी परतल्यावर तिच्या रस्त्यामध्ये सुया, झाडू, खल यासारख्या वस्तू मुद्दामच टाकतात. तिने हे सगळे अडथळे पार केल्यानंतर दोघेही जण घरातील चुलीची आणि कुलदैवताची पूजा करतात. त्या दिवशी नवरी नवऱ्याच्या घरचे न जेवता, माहेरून आणलेले उंडेच फक्त खाते. नवऱ्याकडे पाच दिवस राहिल्यानंतर ती पुन्हा पाच दिवस आपल्या माहेरी येते. नंतर मात्र ती क्वचितच आपल्या माहेरी राहण्यासाठी जाते.

कोकणा, ठाकूर आणि वारली ह्या तीनही जमातींमध्ये विवाह सोहळा बहुतांशी सारखाच साजरा करतात. कोकणा आणि ठाकूरांमध्ये कोकणाला भटजी म्हणून लग्न लावण्यास बोलविले जाते. कोकणा लोक हिंदू ब्राम्हणालाही लग्न लावण्यासाठी बोलवितात. ठाकूर, कोकणा किंवा वारली मधील ज्या व्यक्तीला धार्मिक संग्रह वाचता येत असतील किंवा मंगलाष्टके येत असतील अशा व्यक्तीला यासाठी पाचारण करतात. त्यांच्या मते ज्या व्यक्तीला मंत्र येतात, ज्याला धार्मिक

संग्रह वाचता येतात, जी व्यक्ती जानवे घालते, दारू आणि मांस खांत नाही ती ब्राह्मण. परंतु ह्या सर्व गोष्टी 'ढोरकोळी' मधील कोणी व्यक्तीने प्राप्त केल्या तरी अशा व्यक्तीला लग्न लावण्यासाठी बोलविले जात नाही. पूर्वीच्या काळी अशा सर्व धार्मिक गोष्टी येणारी एक ठाकूर स्त्री लग्न लावत असे. परंतु आता गेल्या १२ वर्षात अख्ख्या साखरशेत मध्ये अशी कोणीही स्त्री नाही. पूर्वी लग्नसोहळ्यासाठी गावकऱ्यांना तंबाखू आणि सुपारी देऊन बोलविले जायचे मात्र आता छापिल पत्रिका दिल्या जातात. लग्नमुहूर्त भटजीच ठरवितात.

वावर गावातील वारलींमध्ये 'ढवळारीण' म्हणून ओळखली जाणारी स्त्री अशी धार्मिक कार्ये करते. अशा ३ ते ४ ढवळारीणी लग्नसमारंभासाठी लागतात. नवरदेव हातामध्ये उंबराचे रोपटे धरतो आणि नवरी मुलगी ते तोडते ह्यावेळी ढवळारीण लग्नसोहळ्याची गाणी म्हणते. गाण्यानंतर ढवळारीण टाळ्या वाजविते आणि लग्नासमारंभ पूर्ण होतो. वारलींनी सांगितल्याप्रमाणे विवाह लावण्यासाठी ब्राह्मणाला बोलावले जात नाही, असे केल्यास ढवळारीणीचा अपमान होतो. आणि त्या कमी पैसे घेतात. त्यांच्याच गावात रहात असल्यामुळे ढवळारीणीला कधीही पैसे दिले तरी चालतात. एवढेच काय, पण त्याबद्दल तिला काहीही दिले नाही तरी चालते. असे असले तरी सर्वसाधारपणे तिला ८ ते १० रुपये महुआची दारू खरेदी करण्यासाठी दिले जातात. नवरदेव आणि वधू यांना बाशिंग आणि मुंडावळ्या बांधण्याचा आणि सोडण्याचा अधिकार फक्त ढवळारीणीलाच असतो. वारली लोकांमध्ये ढवळारीण, सुईण, भगत आणि करवली, तेलवण करतात. ढवळारीण जरी विधवा, घटस्फोटित किंवा वांझ असली तरी तिला लग्न लावण्याचा अधिकार असतो. लग्न लावताना नवरदेवाकडूनही ढवळारीण उपस्थित असते. नवऱ्या मुलीच्या गावी जर त्यांची ढवळारीण नसेल तर अशा वेळी मुलाकडून आलेली ढवळारीण लग्न लावते.

## शरीरसंबंध, घटस्फोट आणि पुनर्विवाह

साखरपुडा झाल्यानंतर ते लग्न होईपर्यंतच्या काळात संभोग करण्यास परवानगी असते. अशा वेळी मूल जन्मले किंवा ती स्त्री गर्भवती राहिली तरी लग्न करण्यास गावकऱ्यांची संमती असते. अशा गर्भवती स्त्रीने बाळाला जन्म दिल्यानंतर जर तिच्या होणाऱ्या पतीचे निधन झाले, तर तिला दुसऱ्या मुलाबरोबर लग्न करण्यास परवानगी असते. अशा वेळी जर तिच्या बाळाला सांभाळण्यास ह्या मुलाने असंमती दर्शविली तर त्या स्त्रिचे आई-वडिल बाळाचा सांभाळ करतात. विधवा विवाह आणि घटस्फोट या प्रथा आदिवासींमध्ये अगदी प्रचलित आहेत; आणि या गोष्टीचा बाऊही त्यांच्यात केला जात नाही.

एखाद्या स्त्रीने जर दुसऱ्यांदा लग्न केले तर अशा विवाहाला 'पाट विवाह' असे म्हणतात आणि असा विवाह खऱ्या अर्थाने 'विवाह' म्हणून पाहिला जात नाही. अशा वेळी लग्नसमारंभातील 'हळदी' आणि 'तेलवण' हे समारंभ साजरे केले जात नाहीत. स्त्रिच्या दृष्टीने तिचे खऱ्या अर्थाने लग्न आयुष्यात फक्त एकदाच होऊ शकते. पुरुषाच्या बाबतीत मात्र असे नाही. पुरुष कितीही वेळा विवाह करू शकतो आणि प्रत्येक वेळी त्याचे 'हळदी' आणि 'तेलवण' हे समारंभ होतात. कोकणामध्ये अशा लग्नात नवरदेवाचे लग्न प्रत्यक्ष तलवारीशी लावले जाते. त्याची होणारी बायको उखळाजवळ बसते आणि पंचाला ओवाळते.

ठाकूर आणि वारलींमध्ये दुसऱ्यांदा लग्न करणाऱ्या पुरुषाचे लग्न रुईच्या झाडाबरोबर लावले जाते.

स्त्रीला एक हिरवी साडी, हिरवा पोलका डोक्यावर घेण्यासाठी कापड आणि दहा रुपयापर्यंत पैसे दिले जातात. पुरुषाने जर स्त्रीपासून घटस्फोट घेतला असेल तर भरपाई म्हणून पहिल्या पत्नीला ५०० रु. पर्यंत रक्कम द्यावी लागते. ही रक्कम सरपंच ठरवितात. घटस्फोटाची कारणे बहुधा 'मूल न होणे' किंवा 'परक्या पुरुषाशी शरीरसंबंध असणे' ही असतात. स्त्रीने जर आपल्या पतीपासून घटस्फोट घेतला तर वधूमूल्य म्हणून घेतलेली एक हजार रुपयांपर्यंतची रक्कम तिच्या पहिल्या नवऱ्याला परत द्यावी लागते.

### विवाह प्राधान्य

आत्ते-मामे भावंडामधील लग्न कोकणांमध्ये खूपच प्रचलित आहेत. चुलत भावंडांमध्ये किंवा मावस भावंडांमध्ये मात्र लग्न होत नाहीत.

बायकोच्या धाकट्या बहिणीशी लग्न करण्याची प्रथा कोकणांमध्ये आहे. ही प्रथा मात्र ठाकूर आणि वारली लोकांच्यात आढळत नाहीत.

## मृत्यू

गावातील एखाद्या व्यक्तीचा मृत्यू झाला की सगळे गावकरी सांत्वनासाठी त्या व्यक्तीच्या घरी जमतात. कोकणा आणि 'क' ठाकूर यांच्यामध्ये तिरडी तयार करण्याची पद्धत आहे. वारलींमध्ये मात्र मृत व्यक्तीला खांदा देण्यास कोणी नसेल तरच बांबूची तिरडी तयार करतात.

मृत व्यक्तीला स्नान घालून नवीन कपडे घालतात. नवीन कपडे घालण्याआधी ते काही भागात फाडले जातात. नवीन पांढऱ्या कापडामध्ये मृत व्यक्तीचे शरीर गुंडाळले जाते. या पांढऱ्या वस्त्राला 'कफन' असे म्हणतात. मृत व्यक्तीच्या डोक्याला खोबरेल तेल लावतात. मृत शरीरावर गुलाल आणि हळद पसरवितात. मृत व्यक्तीच्या सर्वांत जवळचे नातलग तिरडी उचलण्यासाठी खांदा देतात. पार्थिव शरिराचे दहन / दफन करण्यासाठी नेताना त्या व्यक्तीचे डोके त्याच्या घराच्या बाजूला करून ठेवतात. 'स्मशानभूमी' आणि मृत व्यक्तीचे घर याच्या बरोबर मध्यावर प्रेतयात्रा विसावा घेते.

विधवा झालेल्या स्त्रीचे दागिने आणि बांगड्या मृत व्यक्तीच्या हाताने काढून टाकल्या जातात. कपाळावरचे कुंकूही पुसून टाकले जाते. प्रेतयात्रेबरोबर गेलेल्या कुटुंबातील स्त्रिया आणि इतर स्त्रिया विसाव्यापासूनच माघारी फिरतात, त्याआधी जवळच असलेल्या पाण्याच्या ठिकाणी आंघोळ करतात. नियमाप्रमाणे स्त्रियांना स्मशानभूमीमध्ये जाण्यास प्रतिबंध असतो. असे असले तरी 'क' ठाकूरांमध्ये सुईण स्वतःच्या घरात शिजविलेला भात मृत व्यक्तीला अंत्यसंस्काराच्या आधी खाऊ घालते. तिच्यानंतर सरपंचही अशा प्रकारे मृत व्यक्तीला भात खाऊ घालतो. प्रेतयात्रा विसाव्याच्या ठिकाणी आली की मृत व्यक्तीचे शरीर स्मशानभूमीकडे फिरवून ठेवतात. विसाव्यानंतर मृत व्यक्ती आपले घर विसरते, असा याचा अर्थ.

सधन लोक मृत व्यक्तीचे दहन करतात. पैसा नसेल तर मात्र मृत व्यक्तीचे दफनच करतात. वारलींमध्ये जर आजारी असलेली व्यक्ती मरण पावली तर तिला गाडतात अन्यथा इतर वेळी दहन करतात.

दहन करण्यासाठी जंगलातील लाकूड आणि अंबाडीच्या काड्या यांची जरूरी असते. लाकूड ओले असेल तर एका प्रकारचे मीठ घालून ते पेटवितात. मृत व्यक्तीचे शरीर चितेवर ठेवल्यानंतर किंवा पुरल्यानंतर त्या व्यक्तीचा सगळ्यात मोठा मुलगा पाच वेळा त्या

भोवती प्रदक्षिणा घालतो आणि चितेला अग्नी देतो. मृत व्यक्तीला मुलगा नसेल तर तिच्या सगळ्यात जवळचा नातलग हे काम करतो. नंतर सगळी पुरुष मंडळी जवळच्या पाणवठ्यावर आंघोळ करून घरी परतात.

कोकणांमध्ये मृत व्यक्तीच्या घरी यानंतर दोन दिवस चूल पेटविली जात नाही; इतर गावकरी अन्न पुरवितात. गावातील सर्व ज्येष्ठ व्यक्ती रात्री ह्या व्यक्तीच्या घरी जमतात.

'क' ठाकूर आणि वारलींमध्ये त्याच दिवशी घरी अन्न शिजविले तरी चालते. मृत व्यक्तीचा देह ज्या ठिकाणी ठेवलेला असतो त्या ठिकाणी एक दिवा पेटविला जातो. एक भांडे भरून नागलीचे पीठ जमिनीवर ठेवले जाते. एका भांड्यात पाणी, एकात चहा आणि तिसऱ्यामध्ये दारू असे झाकून ठेवण्यात येते. रात्रभर जागरण केले जाते दुसऱ्या दिवशी सकाळी ज्यांना दारु प्यायची असेल ते दारू पितात, इतर जण चहा किंवा पाणी पितात. नागलीच्या पिठाचे नीट निरीक्षण केले जाते. त्यावर माणसाच्या हाताचा ठसा आहे, वाघाच्या पंजाचा ठसा आहे की मांजराच्या पायाचा ठसा आहे हे पाहिले जाते. ज्या प्रकारचा ठसा उमटला असेल त्या रुपाने ती व्यक्ती पुनर्जन्म घेते असे मानले जाते. जर कोणत्याही प्रकारचा ठसा उमटला नाही, तर त्या व्यक्तीचा पुनर्जन्म होत नाही.

कोकणांमध्ये 'दहावा' केला जातो. डाळ, भात आणि माशाचे कालवण बनविले जाते. सर्वात थोरल्या मुलाच्या डोक्यावरचे केस उतरविले जातात. त्यानंतर त्याला नदीवर नेतात. तो पाण्यामध्ये बसतो आणि त्याच्यावरून पाणी आणि दाणे उतरविले जातात. शिजवलेले अन्न कावळे असलेल्या ठिकाणी नेतात. कावळा अन्नाला शिवेपर्यंत सगळेजण तेथेच थांबतात आणि नंतर घरी जाऊन जेवतात. दहाव्याला स्त्रियाही उपस्थित असतात.

आर्थिक परिस्थिती चांगली असेल तर 'अवसर' केले जाते. ह्यामध्ये पितरांच्या प्रतिमा बनविल्या जातात. कुलदैवतांच्या मूर्ती देखील पुजेसाठी काढतात. डंका वाजविता येणाऱ्या भगताला निमंत्रित करतात. दोन पायांच्या मध्ये धरून डंका वाजविला जातो. रात्रभर हा कार्यक्रम चालतो. ह्यामध्ये ज्यांना डंका वाजविता येत असेल ते सर्वजण सहभागी होतात. ह्यादिवशी सर्व उपस्थितांना जेवण दिले जाते.

दुसऱ्या दिवशी दोन भगतांच्या अंगात येते. इतर लोक त्यांना भेटतात आणि रडतात / सांत्वन करतात. भगतांच्या अंगात आलेले उतरल्यानंतर बकरी किंवा कोंबडा कापतात. देवतांच्या जागी पितरांना प्रस्थापित करून त्यांना नैवेद्य दाखविला जातो, नंतर सर्वजण घरी जातात.

मृत व्यक्ती जर स्त्री असेल आणि ती अविवाहित असली तरी तिला नथ, कर्णफुले, बांगड्या, पैंजण इ. दागिने घातले जातात; आणि याच्या सकटच तिचे अंत्यसंस्कार केले जातात.

'क' ठाकूरांमध्ये इतर सर्व गोष्टी सारख्याच असतात, मात्र दुसऱ्या दिवशी सुईण मृत व्यक्तीच्या घरी येऊन अन्न शिजविते. ह्यामध्ये मासे, कोंबडी आणि डाळ-भात याचा समावेश असतो. हे अन्न नंतर स्मशानभूमीवर कावळ्यांसमोर ठेवले जाते. गावाचे पंच हे काम करतात. कावळा शिवेपर्यंत ते तेथे थांबत नाहीत. ह्यानंतर २ दिवसांचा काळ 'अशुद्ध' समजला जातो.

वारलींमध्ये घराच्या छपरावर अन्न ठेवून पितरांना बोलविले जाते. पाच दिवसाचा काळ अशुद्ध मानला जातो.

'क' ठाकूर आणि वारलींमध्ये दहावा किंवा अकरावा केला जात नाही. मात्र वर्ष श्राद्ध म्हणून दिवाळीनंतर फाल्गुन महिन्यापर्यंतच्या काळात 'काज' साजरा केला जातो. 'डोकी कापणे' हा ह्यामधील प्रमुख भाग असतो. हा समारंभ खर्चिक असल्यामुळे, आर्थिक परिस्थिती चांगली असलेली कोणीही व्यक्ती यामध्ये पुढाकार घेते. गावातील इतर सर्वजण यात सहभागी होतात. ज्या व्यक्तीच्या घरी हा समारंभ होतो त्याला 'मालक' असे म्हणतात. गावकरी आणि नातेवाईक यांना ह्या समारंभाची पूर्वकल्पना बरीच आधी दिलेली असते.

या प्रसंगी सहभागी होणाऱ्या सर्व व्यक्ती आपल्याबरोबर दोन टोपल्या भरून धान्य आणतात. मात्र त्यामध्ये नागलीचा समावेश नसतो. त्यापैकी एक टोपली ही आधी मरण पावलेल्या व्यक्तीसाठी असते तर दुसरी नुकतीच मरण पावलेल्या व्यक्तीसाठी. ढोल वाजवून या समारंभाची सुरुवात करतात. ह्यामुळे जवळपाच्या लोकांना समारंभ सुरु झाल्याचे समजते. २ ते ३ दिवस हा समारंभ चालतो.

'कामडी' किंवा 'काजवाला भगत' प्रत्यक्ष समारंभ करतो. तो आपल्या बरोबर सहाय्यकांना घेऊन यतो. बांबूपासून 'घाट मांडव' नावाचा छोटासा तंबू घरासमोरच्या अंगणात उभारला जातो. तंबूमधील जागा शेणाने सारवून त्यावर फुले पसरविली जातात. ह्यानंतर 'कामडी' मृतात्म्यांना आमंत्रित करतो. आपल्या सहाय्यकांसह कामडी रात्रभर गाणी म्हणतो. वारलींमध्ये, 'कामडीण' (स्त्री) सुद्धा कामडीबरोबर गाते. दुसऱ्या दिवशी 'डोकी कापणे' हा समारंभ होतो. 'क' ठाकूरांमध्ये 'डोकी कापणे' हा समारंभ बुधवारी तर वारल्यांमध्ये सोमवारी होतो. गाणी चालू असतानाच सगळ्या बायका मोठा आवाज काढून रडायला लागतात. भगतांपैकी दोघेजण (कामडी) स्वत:च्या कपाळावर ब्लेडने कापतात. असे मानले जाते की ह्या भगताच्या अंगात देव शिरतात आणि त्यांना स्वत:च्या कपाळावर ओरखाडा ओढल्यासारखे वाटून ते त्या ठिकाणी ब्लेडने कापून घेतात. एका मातीच्या भांड्यात रक्ताचे थोडे थेंब गोळे केले जातात आणि इतर दोन भगतांच्या / कामडींच्या कपाळावर कुंकू म्हणून लावतात. त्यामुळे मृत व्यक्तीचा आत्मा त्यांच्या शरीरात प्रवेश करतो.

हा संपूर्ण 'काज' समारंभ वेळखाऊ असल्यामुळे ह्याऐवजी 'दहावा' करावा असे काही लोकांचे मत होते. 'ह्या समारंभासाठी गेल्यानंतर आपल्या शेतीकडे गाई-गुरांकडे आणि मुलाबाळांकडे कोण लक्ष देणार, हाही एक प्रश्न त्यांना पडतो. 'काज' साजरा करावा की 'दहावा' ह्या बाबतीत मात्र लोकांमध्ये दुमत आढळले. एवढेच नाही, तर हा वाद न्यायालयाची मदत घेऊन सोडवावा लागला. न्यायालयाने दिलेल्या निकालाप्रमाणे - ज्या व्यक्तींना 'काज' करावयाचा असेल त्यांनी तो करावा आणि ज्यांना 'दहावा' करावयाचा असेलत त्यांनी दहावा करावा. पूर्वीच्या काळी डोके कापणीसाठी तलवारींचा वापर होत असे. मात्र आता सरपंचांनी ही प्रथा बंद करून तलवारीऐवजी ब्लेडचा वापर सुरु केला आहे.

• • •

# धार्मिक जीवन

## गावातील दैवते :

कुठल्याही गावात गेल्यास तेथे प्रामुख्याने चार प्रमुख देवीदेवता - गावदेव, गावदेवी, वाघदेवी, मरीआई आणि डोंगरात वास्तव्य करणारी डोंगरदेवी आढळून येतात.

### १) मखरा :

गावातील प्रत्येक पाड्यावर आढळणारी ही गावदेवी. या देवीची प्रतिमा एकमेकांना गवत आणि आंब्याच्या पानांनी बांधलेले लाकडी खांब या स्वरुपात असते. गावदेवी ही गावाचे, गुरांचे तसेच शेताचे संरक्षण करते. शेती आणि गुरांची भरभराट व्हावी म्हणून लोक या देवीची प्रार्थना करतात. पाच वर्षातून एकदा मार्गशीर्ष महिन्यात या देवीची पूजा केली जाते. पूजेच्या दिवशी पाड्यावरील सर्व स्त्रिया स्वयंपाक करण्यासाठी लागणारी सर्व साधने, भांडी, पातेली, डाव, चिमटे इत्यादी व थोडे तांदूळ आणि नागली घेऊन देवीच्या जवळ ठेवतात. या सर्व धार्मिक विधीचे पौराहित्य भगत करतो आणि सर्व स्त्रिया देवीची पूजा करतात. हळदी, कुंकू, गुलाल तसेच शेंदूराने खांब मढवले जातात. या प्रसंगी देवीला मेंढा, बकरी किंवा कोंबडीचा बळी द्यायची प्रथा आहे. त्यानंतर सर्व लोक जमून भोजन आणि दारू यांचा आस्वाद घेतात.

### २) मरीआई :

ही अजून एक गावदेवी. दर दिवाळी आधी पुरुष माणसे जमून तिची पूजा करतात. साथीच्या रोगांपासून ही देवी गावाचे संरक्षण करते अशी गावकऱ्यांची श्रद्धा आहे.

### ३) वाघदेव :

हा देव वाघांचा देव म्हणून सर्वत्र गणला जातो. वाघदेव सर्व गुरांचे संरक्षण करतो. प्रत्येक गावातून वाघदेवाची प्रतिमा एक उभा दगडी खांब या स्वरूपात झाडाखाली ठेवली जाते आणि दिवाळीपूर्वी 'वाघ-बारस' या दिवशी वाघदेवाच्या प्रतिमेचे पूजन केले जाते. या पूजेला 'शांत' असे म्हंटले जाते. या प्रसंगी कोंबडी व दारू वाघदेवाला वाहिली जाते. डाळ-भात शिजवला जातो आणि त्यानंतर सर्व पुरुष एकत्र येऊन जेवण करतात.

### ४) डोंगरदेवी :

डोंगरात राहणाऱ्या आणि दगडाच्या स्वरूपात असणाऱ्या डोंगरदेवीचे पूजन देखिल पाच वर्षातून एकदा पुरुष लोक करतात. यावेळी देवीच्या प्रतिमेवर शेंदूर व तेलाचा लेप देतात. देवीला नारळ अर्पण करुन, नंतर प्रसाद म्हणून वाटले जातात. आणि नंतर सर्वजण दारूचे सेवन करतात.

वावर गावी वरील देवांशिवाय आणखी दोन देवींचे पूजन केले जाते. उंबराई आणि शिताई देवी यांचे पूजन दरवर्षी मार्गशीर्षातल्या मंगळवारी केले जाते. वारली भगताकडून देवीची पूजा करविली जाते. हा भगत बुधर कुळातील असतो. काही ठराविक कुळांनाच या देवींची पूजा करण्याचा अधिकार देण्यात आला आहे. या दिवशी गुलाल आणि शेंदूराचा लेप देवीला लावण्यात येतो. देवीला नारळ फोडला जातो तसेच दरवर्षी कोंबडा व दर पाच वर्षांनी बकरीचा बळी देवीला दिला जातो. नंतर सर्व लोक एकत्र जमून भोजन आणि दारू यांचा आस्वाद घेतात.

साखरशेत आणि चालतवड या गावी हनुमानाचे एक छोटेसे देऊळ होते. हनुमान जयंतीच्या दिवशी यावर ध्वज फडकविला जातो, दिवे लावले जातात आणि हनुमानाची पूजा करतात.

**कुलदैवते :**

कोकणा, ठाकूर आणि वारली या तिन्ही जमाती हिरवा, चितोबा, मुंजोबा आणि हिमाई या देवतांचे पूजन करतात.

कुलदेवता या नेहमी एखाद्या कुटुंबात ठेवल्या जातात आणि ठराविक दिवशी कुटुंबातील सर्व लोक या देवतांचे पूजन करतात.

**१) हिरवा :**

ही देवता मोराच्या पिसांच्या स्वरूपात पुजली जाते. मोराची पिसे एका लाल कापडात गुंडाळून ठेवली जातात. हे लाल कापड शक्यतो बदलले जात नाही. केवळ भगताने परवानगी दिली तरच ते बदलले जाते. लग्नाच्या वेळी सर्व प्रथम या देवतेला लाल कापड वाहिले जाते आणि नंतरच द्यायच्या घ्यायच्या कपड्यांची खरेदी केली जाते. हिरवा ही देवता संपत्तीचे रक्षण करणारी तर आजाराचे निराकरण करणारी म्हणून ओळखली जाते. ही देवता आजारापासून कुळाचे रक्षण करते असे मानले जाते.

**२) हिमाई :**

ही देवी 'कणसरी माता' या नावानेही ओळखली जाते. कणसरी माता म्हणजे अन्नधान्य देणारी किंवा 'अन्नदात्री', प्रामुख्याने नागली देणारी म्हणून पूजली जाते.

या देवीची प्रतिमा अन्य काही देवीदेवतांसह एका मोठ्या कागदावर दर्शविली जाते. एका पोकळ बांबूमध्ये हा कागद ठेवला जातो. हिमाई हिरवा या देवतेची बहिण म्हणून ओळखली जाते.

चितोबा आणि मुंजोबा या कोणत्याही प्रतिमेने दर्शविल्या जात नाहीत. या देवता माळ्यावर ठेवल्या जातात. आणि दिवाळी, होळी, कवळी-भाजीचा सण, लग्न या प्रसंगी तसेच कोणाला एखादी इच्छा पूर्ण होण्यासाठी नवस बोलायचा असेल त्यावेळीच या देवता आपल्या जागेवरून हलविल्या जातात.

**३) नारायण देव :**

ही देवता एका लहानश्या दगडी गोट्याने अथवा शेंदूर लावलेल्या सुपारीच्या रुपात पूजली जाते.

**कोकणा :** वरील देवतांशिवाय खंडोबा, भैरोबा, शंकर आणि भवानीदेवीचे कुलदैवत म्हणून काही कोकणा लोक पूजन करतात.

**वारली :** हिरवा, चितोबा, मुंजोबा आणि हिमाई शिवाय नारायणदेव, खंडोबा आणि भैरोबा या देवतांचे पूजन वारली लोक करतात.

**ठाकूर :** ठाकूर लोक मात्र हिरवा, चितोबा, मुंजोबा आणि हिमाई या चार देवतांचेच पूजन करतात.

## धार्मिक सण समारंभ

**१) संक्रांत :** कोकणा आणि वारली जमातीत संक्रांतीच्या दिवशी तीळ कुटून गरम पाण्यात टाकले जातात आणि त्या पाण्यानेच आंघोळ केली जाते. तिळाच्या तेलात खुरासणी व हळद कालवून केसांना लावली जाते. त्यामागे पुढला जन्म गाढवाचा मिळू नये अशी भावना असते. तांदुळाच्या पिठात गूळ घालून थिरडी केली जातात त्यांना 'थिंडरी' असे म्हटले जाते. संक्रांतीच्या दिवशी तीळ आणि गूळ एकत्र करून भाजले जातात आणि कुलदेवतांना त्यांचा नैवेद्य दाखविला जातो. काही वेळा कोंबडाही देवी देवतांना बळी देतात. ठाकूर जमातीचे लोक संक्रांत साजरी करीत नाहीत.

**२) शिमगा :** हा सर्व आदिवासींचा मुख्य सण. हा सण दोन दिवस चालतो. पहिल्या दिवशी सर्व लोक रंग खेळतात. रंग आणि राखेचे पाणी करून एकमेकांवर उडविले जाते. होळीसाठी प्रत्येक घरटी किमान एक लाकूड वर्गणी म्हणून दिले जाते आणि गावाचा सरपंच किंवा कोतवालाच्या हस्ते होळी पेटविली जाते. या होळीच्या बाजूला बांबू उभारून त्यावर तांदूळ आणि नागलीचे पापड बांधले जातात. भगत होळीची पूजा करतो. काही लोक आपल्या मनोकामना पूर्ण व्हाव्यात म्हणून नवस बोलतात. जर मनोकामना पूर्ण झाली तर पुढच्या वर्षी कोंबड्याची पिसे होळीला वाहिली जातात.

याशिवाय तांदूळ, नारळ, कोंबडी इत्यादी होळीला अर्पण करतात. नंतर होळीतून काढून घेऊन या सर्वांचे प्रसाद म्हणून वाटप करतात. होळीला जर बकरा अर्पण करायचा असेल तर होळीमध्ये न टाकता होळीसमोर अथवा दुसरीकडे त्याचा बळी दिला जातो.

होळीच्या पुजेत पुरुष, बायका, तरुण मुले-मुली आणि लहान मुले असे सर्वजण सहभागी होतात. होळी पूजनानंतर पुरुष सोडून इतर सर्व जण घरी परततात. पुरुष मात्र एकमेकांच्या घरी भेटावयास जातात.

सकाळी कूलदैवतांचे पूजन केले जाते.

होळीच्या सुमारास मोहाला फूले येतात. त्यापासून दारू बनवून ती देवाला अर्पण केली जाते. त्यानंतर उपलब्ध असेपर्यंत मोहाच्या दारूचे सेवन केले जाते.

होळीच्या दुसऱ्या दिवशी तांदळाच्या पिठात गूळ घालून धिंडरी बनविली जातात.

या दिवशी काही मोठी माणसे फाटके कपडे घालून व मुखवटा घालून गावातील प्रत्येक घरात धान्य व पैसे मागतात. लहान मुलेही यात मागे नसतात. ती देखिल असा वेष करून घराघरात पैसे मागत फिरतात. लोक त्यांना मजेने 'खाटखंबा' उंबऱ्यात वाट बघतोय असे म्हणतात आणि त्यांना पैसे देतात. होळीच्या दोन्ही दिवशी लोक नाचतात आणि दारू पितात.

**३) गौरी - गणपती :** साखरशेत गावाच्या प्रत्येक पाड्यावर गणपतीची स्थापना केली जाते. जरी ठाकूर आणि ढोर कोळी वेगवेगळे गणपती बसवित असले तरी ते तो एकच आहे असे समजतात. आणि एकमेकांच्या गणपती बसवलेल्या जागेला (मांडवाला) भेट देतात. गणपतीची स्थापना व गणेश विसर्जन या दोन्ही वेळेला या दोन्ही जमाती एकत्र येतात आणि दोन्ही कार्यक्रम सामूहिकपणे पार पाडतात. गणपतीची प्रतिष्ठापना पुरुषाच्या हातून केली जाते आणि त्या दिवशी त्या माणसाला उपवास धरावा लागतो. सकाळी तो फक्त चहा आणि बटर खातो तर संध्याकाळी डाळ-भात खातो. या प्रसंगी तारपा नृत्य, ढोलनाच आणि गौरी किंवा गरबा नृत्य सादर केले जाते. गणपतीच्या दिवसात शेतीची कामे केली जात नाहीत.

**४) नागपंचमी :** कोकणा आणि वारली जमातीतील प्रत्येक घरात एक चौकोनी जागा साफ करून शेणाने सारवली जाते आणि राख वापरून त्यावर झाड, पक्षी आणि पाच नागांचे चित्र काढले जाते. संध्याकाळी या चित्राची पूजा केली जाते आणि नैवेद्य दाखविला जातो. पुरुष मंडळी या दिवशी उपवास करतात. पुजेची चौकोनी जागा बायका स्वच्छ करतात आणि त्या चित्रे देखिल काढतात. नागांची चित्रे मात्र पुरूष काढतात. शेतीची कामे करायची झाली तर नांगर वापरला जात नाही. नागपंचमीच्या दिवशी कोंबडा आणि दारू याची मात्र काही गरज नसते.

ठाकूर लोक नागपंचमीचा सण साजरा करीत नाहीत. यादिवशी ते नांगर वापरत नाहीत. तसेच बहुधा शेतीची कामे नागपंचमीच्या दिवशी करीतच नाहीत.

**५) पोळा :** या दिवशी सूर्योदयाच्या आधीच पुरुषमंडळी विहिरीवर जाऊन पाणी घेऊन येतात आणि या पाण्याचा वापर करूनच बैलांसाठी नैवेद्य तयार केला जातो जेणेकरून बैलांना रोगांची लागण होऊ नये. यादिवशी भातामध्ये मीठ घालत नाहीत आणि जेवणात (नैवेद्यात) देखिल मीठ घालत नाहीत.

यादिवशी बैलांना स्वच्छ धुतात, विविध रंगांनी सजवितात, त्यांच्या चेहऱ्याला व डोक्याला तांदूळ चिटकविले जातात. बैलांची नंतर गावातून मिरवणूक काढली जाते. या सणाला गूळ अथवा साखर वापरून तांदळाची खीर बनवली जाते, जर दूध उपलब्ध असेल तर दूधही वापरले जाते. डाळ-भाताचे जेवण लोक घेतात. या दिवशी भाकरी करीत नाहीत. संध्याकाळी लोक दारू पिऊन नृत्य करतात.

**६) पितरांचा सण :** ठाकूर जमातीत या प्रसंगी भोपळा, खेकडे आणि मासे यांचा स्वयंपाक केला जातो आणि पुरुषमंडळी त्यांच्या पूर्वजांसाठी घराच्या छपरावर नैवेद्य ठेवतात. हे पदार्थ ठेवताना पुरुषांच्या हाताला बायकादेखिल हात लावतात. या दिवसापासूनच वरील पदार्थ खाण्यास ठाकूर लोक सुरुवात करतात.

कोकणा आणि वारली जमातीत भात, भाकरी, आणि माशाची आमटी एका ताटात वाढली जाते आणि पुरुषमंडळी आपल्या पितरांसाठी हे ताट घराच्या छपरावर ठेवतात. नंतर हेच पदार्थ चुलीतही ठेवले जातात. चुलीला दारूही वाहिली जाते. याला लोक 'आगरी पाडणे' असे म्हणतात. पुरुष शक्यतो हे काम करतात, याप्रसंगी कोणतेही शेतीचे काम केले जात नाही. लोक नृत्य करतात व दारू पितात.

**७) कवळी भाजीचा सण :** पहिल्या पावसानंतर वाढलेल्या (तयार झालेल्या) भाज्या यादिवशी घरी आणतात. तूरडाळ त्यात मिसळवून भाजी तयार करतात. तयार झालेली भाजी तांदळाच्या पिठात कालवून मूद तयार करतात. नंतर पळसाच्या पानावर ती मूद ठेवून माळ्यावर ठेवलेल्या कुलदेवतांना हंगामातील पहिल्या भाजीचा नैवेद्य पति-पत्नी दाखवितात आणि या दिवसापासून पुढे भाजी खायला सुरुवात करतात.

**८) वसुबारस (बारशी) :** या सणाच्या दिवशी बांबूच्या काठ्या आणि लाकडी तलवार यांनी सज्ज होऊन सर्व लहान मुले व काही मुलीही गावा-गावांमधून नाचत आणि गात फिरतात. प्रत्येक घरापुढे उभे राहून ते सर्वजण ''भाल्या, भाल्या बाहेर हो, मला दूध-भात दे'' अशा घोषणा करतात आणि भात व दूध गोळा करतात. नंतर ही सर्व मुले गावात अथवा जंगलात जाऊन डाळ-भात बनवितात आणि खातात.

**९) दसरा :** यादिवशी सर्व आदिवासी जव्हारच्या राजवाड्याजवळ एकत्र जमतात आणि दिवसभर राजवाड्यासमोर नृत्य करत दारूचा आस्वाद घेतात. सुमारे १५-२० वर्षांपूर्वी सर्व आदिवासी जुन्या राजवाड्यात राजाच्या पालखी समोर असेच नाचायचे आता राजवाडा नविन बांधल्यापासून ते नविन राजवाड्यासमोर नाचतात.

**१०) दिवाळी :** आदिवासी भागात दिवाळी दोन दिवस साजरी केली जाते. मात्र ते दोन दिवस लक्ष्मीपूजन का पाडवा असे लोकांना सांगता आले नाही. काही प्रगत लोकांनी मात्र लक्ष्मी पूजन, पाडवा, भाऊबीज इ. नावे घेतली. दिवाळी विषयी आदिवासी लोकांना

दिनदर्शिकेमधून, मित्रांच्या, शेजाऱ्यांच्या, नातेवाईकांच्या आणि इतरांच्या बोलण्यामधूनच समजल्याचे आढळले.

वावर गावातील लोक दिवाळी सुरु होण्यापूर्वी ३-४ दिवस 'डोवा' हा सण साजरा करतात. आणि मजेने 'सरकारी दिवाळी' ही आमच्या दिवाळीनंतरच साजरी होते असे म्हणतात.

सगळ्या गावातील घरे दिवाळीच्या दिवशी झेंडूच्या फुलांनी सजविली जातात. बायकाही याच फुलांनी शृंगार करतात. लक्ष्मीपूजनाच्या दिवशी माळ्यावर ठेवलेली कुलदैवते - हिरवा, चितोबा, मुंजोबा, हिमाई खाली काढली जातात. शुद्ध पवित्र मोहाच्या दारूचा देव-देवतांना नैवेद्य दाखविला जातो.

तुरडाळ आणि भात, तांदळाच्या पिठापासून बनविलेले दिवे, तांदळाच्या पिठात काकडी घालून तयार केलेली भाकरी, साहूल्या यांचाही नैवेद्य देवी-देवतांना दाखविला जातो. त्या पदार्थामध्ये प्रामुख्याने त्या भागात आढळणाऱ्या स्थानिक प्रकारच्या पिकांचा आणि बियांचा समावेश होतो. कोणत्याही प्रकारच्या संकरित बियांचा उत्पादनांचा या पदार्थात समावेश नसतो.

कंदफळ नावाचे फळ यादिवशी खाण्यासाठी म्हणून जंगलातून आणले जाते.

कोंबड्याचा नैवेद्य 'हिरवा' देवतेला आणि कोंबडीचा नैवेद्य 'हिमाई' देवीला दाखविला जातो. संध्याकाळी चिबाडाचे दिवे सर्वत्र लावलेले आढळतात. चिबाड हे काकडी सारखे दिसणारे एक रानटी फळ आहे, ते वाळवून आणि व्यवस्थित कापून त्यात खुरासणीचे तेल भरतात आणि कापडाच्या चिंधीचा वात म्हणून उपयोग करतात.



या दिवशी संपूर्ण दिवसभर तरूण मुले व मुली तारपा नृत्य करतात आणि भरपूर दारू पितात.

कोकणा जमातीत भाऊबीजेच्या दिवशी बहिण आपल्या भावाच्या हातात काळा दोरा बांधते आणि हा दोरा पुढल्या भाऊबीजेलाच काढला जातो. बहिण नंतर भावाला ओवाळते. काही प्रगतीशील वर्गांमधील लोक लक्ष्मीपूजनाच्या दिवशी करंजीदेखिल करतात.

**११) आखातीचा सण :** शिमग्यानंतर हा सण येतो. प्रामुख्याने कोकणांचा म्हणून हा सण ओळखला जातो. वारली आणि ठाकूर जमातीत हा सण साजरा करण्याची प्रथा नाही. मात्र कोकणांच्या प्रभावामुळे वावर गावी वारली लोकही हा सण साजरा करताना आढळले. आखाती सणाच्या सात दिवस अगोदर ज्वारी, तांदूळ, नागली, उडीद इत्यादी स्थानिक धान्ये

ओली माती भरलेल्या पाटीत पेरली जातात आणि त्यांना ७ दिवस पाणी घातले जाते. याला 'गौरी पेरणे' असे म्हणतात. सातव्या दिवशी या धान्यांना कोंब फुटतात, हाच आखातीचा दिवस. या दिवशी पुरुषमंडळी तांदळाच्या भाकरीचा नैवेद्य या धान्यांना दाखवितात तर स्त्रिया या कोंब कुटलेल्या धान्याची पूजा करतात. त्यानंतर गावातील प्रत्येक घरातील बाई डोक्यावर या धान्यांची पाटी घेते. पुरुष मंडळी यावर धोतर धरतात की जेणे करून हे धान्याचे कोंब सूर्यकिरणांनी करपू नयेत. हे सर्व जण वाटेनी गात गात विहिरीवर जातात. विहिरीवर देखिल गाणी म्हणली जातात. सर्व स्त्रिया पाटी डोक्यावर घेऊन विहिरीला पाच प्रदक्षिणा घालतात आणि आलेल्या धान्याची छोटी रोपे उखडून कानावरती ठेवली जातात.

**१२) खडीचा देव :** नागली आणि भात पेरायच्या दिवशी सर्व गावकरी या देवतेची पूजा करतात, या देवतेची प्रतिमा दगडाच्या स्वरूपात असून त्यास शेंदूर लावलेला असतो. पेरणीच्या दिवशी देवतेला शेंदूर लावून कोंबडीचे पिल्लू अर्पण केले जाते.

काहीवेळा कोंबडा कापून त्याचे मांस घराघरात वाटले जाते. ही पूजा गावाबाहेर रात्री ७ ते ८ च्या सुमारास केली जाते. या पुजेला फक्त पुरुषमंडळी जातात आणि पूजा करतात. बायकांना तिथे जायची परवानगी नसते. नंतर पुरुषमंडळी तिथेच भोजन व दारू यांचा आस्वाद घेतात.

## धार्मिक कार्य करणाऱ्या व्यक्ती

**१) भगत** - भगत झाडपाल्याची औषधे देतो. पुजारी म्हणूनही तो काम करतो, जनांवरांवरही तोच उपचार करतो. भूतबाधा झालेली तोच ओळखतो, पंचमंडळी मध्ये तो येतो, अशा प्रकारे एक आदरणीय व्यक्ती म्हणून समाजात त्याला स्थान असते आणि वेगवेगळ्या प्रसंगी वेगवेगळ्या भूमिकांतून भगताला जावे लागते. कोणत्याही होतकरु, उत्साही आदिवासी तरुणास प्रशिक्षित करायची त्यास मुभा असते. मात्र भगताची विद्या कधीही स्त्रियांना दिली जात नाही.

**२) कामडी भगत** - हा भगतांचाच एक प्रकार आहे. काही कुळांनाच मृत्युनंतर करायच्या 'काज' या धार्मिक विधी करण्यासाठी मान मिळतो. कामडी भगत हे काम करतो. तो आजारांवर उपचार मात्र करत नाही. या भगताचा वारसा वंशपरंपरेने पुढे चालतो. वारली जमातीत महिला 'कामडीण' असतात. त्या काज चालू असताना पारंपारिक गाणी गातात.

**३) ढवळारीण** - वारली जमातीमध्ये, विवाह लावणाऱ्या महिलेला 'ढवळारीण' असे म्हटले जाते. ढवळारीणीचे काम वंशपरंपरेने चालत नाही, अशा कामाची आवड असलेली कोणीही महिला ढवळारीण होऊ शकते.

**४) सुईरीण / दाई** - सुईरीणीला आदिवासी समाजात मानाचे स्थान असते. एखाद्या महिलेच्या स्वप्नात देव येऊन तिला दाईचे काम करायला सांगतो. अशी महिला गावातील वयस्कर दाईच्या हाताखाली काम करता करता बाळंतपण करण्याचे कौशल्य हस्तगत करते.

● ● ●

# समाज जीवन व बदल

### राजकीय संस्था

चार, पाच पाड्यांनी मिळून बनलेल्या गावाचा कारभार गावातीलच पाच किंवा अधिक (आदिवासी) लोकांच्या परिषदेमार्फत नियंत्रित केला जातो. या पारंपारिक परिषदेला 'पंच' असे म्हणतात आणि त्याला गावकऱ्यांची मान्यता असते. गावातील बुजूर्ग व प्रतिष्ठित व्यक्ती पंच सदस्य असतात. त्यापैकी एक भगत असतो. सरपंच, पोलिस पाटील हे ग्रामपंचायतीचे सदस्य असले तरी ते पारंपारिक पंचायतीमध्ये देखील सदस्य म्हणून समाविष्ट असतात.

गावाची ही परिषद गावातील भांडणतंटे, वेगवेगळ्या जमातीच्या मुलामुलींची प्रेम प्रकरणे सोडविते. पंच मंडळी घटस्फोटाचा निर्णय देतात. पंचांच्या परवानगीनेच विवाहसोहळा केला जातो. भांडणे सोडवताना दोषी व्यक्तीला दंड केला जातो. हा दंड पैश्याच्या किंवा वस्तूच्या स्वरुपात असतो. दंड म्हणून दारु घेतली जाते.

तक्रार केल्यानंतर पंचमंडळी सभा बोलवतात. या सभेला सर्व गावकरी हजर असतात. घटस्फोटाच्या वेळेस, घटस्फोट मागणाऱ्या स्त्रीशिवाय इतर कोणीही स्त्रिया हजर नसतात. पंचांच्या सांगण्याप्रमाणे स्त्रियांना घटस्फोटामध्ये भाग घेण्याचे काहीही कारण नसते आणि त्यांनी इतरांच्या भानगडीत ढवळाढवळ करु नये.

सर्व गावांमध्ये सरपंच आदिवासीच आहे. ग्रामसेवक मात्र बिगर आदिवासी आहे. साखरशेत गावामध्ये भाजप, काँग्रेस, कम्युनिस्ट या पक्षांचे पाठीराखे आहेत. वावर गावात मात्र सर्वजण कम्युनिस्ट आहेत. राजकारणाबद्दल बोलताना वावर मधील एक कोकणा स्त्री म्हणाली ''मला या गावात रहायला आवडत नाही. गावातील सर्व वारली लोक लाल बावट्याला (कम्युनिस्ट पक्षाला) मत देत असल्याने आम्हालासुद्धा त्यालाच मत द्यावे लागते. इतर कुठल्याही पक्षाला मत देण्याची लोकांना परवानगी नाही.''

वावर गावातील लोकांनी सांगितले की गावचे सरपंच व उपसरपंच काहीही कामाचे नाहीत. त्यांना फक्त दारु कशी प्यायची हेच माहिती. साखरशेतला ठाकूर महिलेने सांगितले की आम्ही जो उमेदवार लायक असेल त्यालाच निवडून देतो. लायक कोणाला समजता ? असा प्रश्न विचारल्यावर तिने सांगितले की जो उमेदवार लोकांची मग ती कुठल्याही जमातीची असोत, कामे करतो व कमी दारु पितो तोच खरा लायक उमेदवार.

### आदिवासी जमातींचे संबंध

कोकणा, वारली, ठाकूर व ढोर कोळी या चार जमाती एकत्र रहातात. या जमातींमध्ये विविधता आढळते. प्रत्येक जमात कुळांमध्ये विभागली गेली आहे. मात्र या कुळांमध्ये उच्चनीच असा भेदभाव नसतो. सर्व कुळे समान असतात. एकाच कुळात विवाह होत नसल्याने विवाह संबंधातून ही कुळे एकमेकांशी जोडली जातात.

कोकणा लोक स्वत:ला कुणबी म्हणवून घेतात व आपण हिंदू असल्याचे सांगतात. कोकणांकडे जमीन थोडी (इतर जमातींच्या तुलनेत) जास्त आहे. त्यांच्या जमातीत शिक्षणाचे प्रमाण जास्त आहे. त्यांचा हिंदू धर्माच्या लोकांशी संबंध येतो त्यामुळे त्यांनी हिंदू संस्कृतीतल्या काही गोष्टी घेतल्या आहेत. कोकणा स्वत:ला अन्य जमातींपेक्षा उच्च मानतात. तसेच इतर जमातीसुद्धा वरील कारणांमुळेच कोकणांना उच्च

समजतात. ठाकूर आणि वारलींमध्ये, ठाकूर जमात स्वत:ला वारलीपेक्षा वरचढ समजते. ठाकूर लोक जास्त श्रीमंत असल्याने वारली लोक ठाकूर आपल्यापेक्षा उच्च असल्याचे मान्य करतात. कोकणा व ठाकूर वारल्यांना परंपरा पाळणारे मानतात.

असे असले तरी कोकणा, ठाकूर व वारली, ढोर कोळ्यांना मात्र खालच्या दर्जाचे मानतात कारण की ढोर कोळी मेलेली जनावरे व उंदीर खातात. या जमाती ढोर कोळ्यांकडे अन्न किंवा पाणी कधीच घेत नाहीत. ढोर कोळ्यांबरोबर सहभोजन केले तरी त्यांच्या हातून अन्न कधीच घेत नाहीत. या जमाती ढोर कोळ्यांकडच्या लग्नाला जातात, जेवत मात्र नाहीत. अडचणीच्या काळात ढोर कोळ्यांकडून धान्य मात्र घेतले जाऊ शकते. लग्नाला भटजी म्हणून ढोर कोळी माणसाला कधीही बोलावले जात नाही.

**संघर्षाचा मुद्दा** - आंतरजमातीय विवाहाचा कधीही स्विकार केला जात नाही. जर दोन भिन्न जमातीच्या मुलामुलीचे एकमेकांवर प्रेम असेल आणि त्यांचा विवाह झाला, तर त्या दोघांना घरातून बाहेर काढले जाते. कधीकधी त्यांना गावाबाहेर हाकलून दिले जाते.

**जमातींमधील सहकार्य** - सर्वसाधारणपणे सर्व जमाती गावामध्ये एकसंध समाज म्हणून रहाताना दिसतात. गावातील सर्व सणसमारंभ एकत्रितपणे साजरे केले जातात. होळीला प्रत्येक घरातून लाकूड दिले जाते व एकत्रितपणे होळी पेटवतात. पितरांच्या सणाच्या वेळेस सर्व जमाती एकत्र येऊन बैठक घेतात व सणाच्या कार्यक्रमाची आखणी करतात. गणेशोत्सवसुद्धा एकत्रच साजरा केला जातो. साखरशेत गावामध्ये प्रत्येक जमात वेगवेगळा गणपती बसवते. विसर्जन मिरवणूक मात्र संयुक्तपणे काढतात.

सणसमारंभांमध्ये सर्वजण एकत्र येऊन दारू पितात व नाच करतात. घरबांधणीच्या वेळी एकमेकांना मदत केली जाते. ढोर कोळी लोक लग्न लावण्यासाठी कोकणा भटजीला बोलावतात. आजारपणामध्ये कोकणा भगतालादेखील उपचार करण्यासाठी बोलावले जाते. एकमेकांशी येत असलेल्या संबंधामुळे प्रत्येक जमातीने इतर जमातीतील संस्कृतीच्या काही गोष्टी आत्मसात केल्या आहेत.

धान्य तुटवडा, आजार, मृत्यू यांसारख्या अडीअडचणीच्या काळात एकमेकांना मदत केली जाते. गावामध्ये सावकार नाही त्यामुळे अडचणीच्या काळात गावातील लोकांकडून मदत घेतली जाते. त्यामध्ये जातीजमातीचा विचार होत नाही. भगतदेखील जो इच्छूक असेल त्याला ज्ञान देण्यास तयार असतो.

अशा प्रकारे गावामध्ये रहाणाऱ्या जमातींमध्ये संघर्षापेक्षा सहकार्य व सामंजस्य असल्याचे दिसते.

### सामाजिक व सांस्कृतिक बदल

इतर संस्कृतींशी संबंध आल्याने आदिवासींच्या जीवनातील अनेकविध गोष्टींमध्ये बदल होताना दिसतो.

### सामाजिक बदल

**१. सांस्कृतिकीकरण** - हिंदू जातीव्यवस्थेच्या प्रभावामुळे कोकणा लोक स्वत:ला कुणबी म्हणून घेतात. कोकणा जमातीच्या लोकांनी हिंदूंच्या अनेक चालीरीती घेतल्या आहेत, ते स्वत: 'हिंदू कोकणा' असल्याचे सांगतात. इतर जमातीदेखील कोकणांना कुणबी मानतात.

२. **विवाह प्रथा** - गेल्या दहा बारा वर्षांपासून साखरशेतच्या कोकणा व ठाकूरांची लग्नं ब्राह्मणाकडून - हिंदू ब्राह्मण अथवा कोकणा, लावली जातात. ज्याला लग्नाचे विधी करता येतात, मंत्र म्हणता येतात, जो मांस मटण खात नाही, दारू पित नाही असा ब्राह्मण लग्न लावतो.

पूर्वी तंबाखू देऊन लग्नाचे आमंत्रण दिले जात असे आता लग्नपत्रिका छापल्या जातात. लग्नाच्या वेळी आता ध्वनिवर्धकाचा (लाऊडस्पीकरचा) वापर होऊ लागला आहे.

पूर्वी पतीचे निधन झाले तर त्याच्या भावाशी अथवा पत्नीचे निधन झाल्यास तिच्या बहिणीशी लग्न करण्याची प्रथा होती. आता क-ठाकूर व वारलींमध्ये ही प्रथा पाळली जात नाही.

३. **कौटुंबिक संबंध** - पूर्वी आईवडिलांच्या शब्दाला मान दिला जायचा, त्यांचा आदर केला जायचा आता मुलं उलट उत्तर देतात आणि कधीकधी घरकाम करण्यास देखील नकार देतात. अशी तक्रार एका आदिवासी महिलेने केली.

सासू-सून यांच्यामधले संबंधसुद्धा अत्यंत तणावपूर्ण असतात. प्रत्येक सून आपली वेगळी चूल मांडायला बघते, सासूने आपल्यावर हुकूमत गाजवू नये असे तिला वाटते. कुटुंबातील संघर्षामुळे एकत्र कुटुंब पद्धतीकडून विभक्त कुटुंब पद्धतीकडे वाटचाल होत आहे.

साखरशेतच्या कोकणांमध्ये, पूर्वी सुनेचे पहिले बाळंतपणदेखील सासरीच व्हायचे. आता पहिले बाळंतपण सुनेच्या माहेरी होते.

४. **गोंदवणे** - शरीर सुशोभनासाठी कपाळावर व हातावर गोंदवून घेणे ही प्रथा स्त्रियांमध्ये सामान्यपणे आढळते. मुलगी तीन-चार वर्षांची झाली की तिच्या अंगावर गोंदवले जाते. वावर येथे काही वृद्ध पुरुषांच्या अंगावर देखील गोंदवलेले आढळले. त्यांनी सांगितले की पोलिस या खुणांचा उपयोग ओळखण्यासाठी करत असल्याने आता कोणी पुरुष गोंदवून घेत नाहीत.

५. **भजनी मंडळ** - साखरशेतमध्ये बिगर आदिवासी माणसाने भजनी मंडळ सुरू केले असले तरी या मंडळाचे सर्व सदस्य आदिवासीच आहेत. भजने म्हणण्याबरोबरच सामाजिक विषयांवर आधारित कार्यक्रम मंडळातर्फे सादर केले जातात. या भजनी मंडळातर्फे दारूचे दुष्परिणाम, स्वच्छतेबाबत आरोग्य शिक्षण, अंधश्रद्धा, शिक्षण अशा वेगवेगळ्या विषयांवर पथनाट्ये सादर करून लोकांना संदेश दिला जातो.

आदिवासींतर्फे भजनी मंडळ चालवले जाणे हा एक महत्वाचा बदल आहे. या मंडळामार्फत लोकांची मानसिकता बदलण्याचा प्रयत्न केला जात आहे. आदिवासी लोकच आदिवासींच्या शिक्षणासाठी पुढे आले आहेत.

पुरूष व स्त्रिया अन्न-धान्याच्या तुडवड्याच्या काळात (ऑक्टोबर ते मे महिन्यापर्यंत) शहर व उपनगरात रोजगार मिळवण्यासाठी जातात. या लोकांचा शहरी संस्कृतीशी संबंध येत असल्याने त्यांना आधुनिक गोष्टींची, विचारांची माहिती मिळते. गावाकडे गेल्यानंतर हे लोक समाजामध्ये बदल घडवण्यात महत्वाची भूमिका बजावतात.

६. **दागिने** - स्त्रियांना आता सर, गाठी, गोठ, वेढणी या पारंपारिक दागिन्यांपेक्षा नविन दागिने जास्त आवडू लागले आहेत. प्लॅस्टिकच्या किंवा काचेच्या बांगड्या, रंगीबेरंगी कानातली, डोक्याचे चाप व इतर आभूषणांकडे

वाढता कल आहे, ही आभूषणे पारंपारिक दागिन्यांपेक्षा स्वस्त असतात व त्यामध्ये विविधताही भरपूर असते.

पारंपारिक आभुषणे घातलेली म्हातारी म्हणाली "आजकाल बायका (पारंपारिक) दागिने न घालताच हिंडत असतात. बाईच्या जातीला हे शोभा देत नाही."

आठवडे बाजारात सोनारामुळे दागिन्यांची परंपरेत बदल झालेला आहे. त्याच्याकडे दागिन्यांची विविधता असते.

**७. करमणूक** - शहरी भागात काम करून लोकांना रोख रक्कम मिळते. पूर्वी या पैशाचा वापर अन्नधान्य, घरबांधणी, शेती यासाठी केली जायचा. हल्ली लोकांना चित्रपट, नविन कपडे, बिस्किटे, शेव, चिवडा, गोड खादयपदार्थ अशा गोष्टींबद्दल आकर्षण निर्माण झाले आहे. आदिवासी लोक आता गावातच व्हिडिओवरून दाखवल्या जाणाऱ्या चित्रपटांवर खर्च करताना दिसतात. साखरशेतमध्ये सर्व तरूणांना नविन चित्रपटातील गाणी माहिती होती.

पूर्वी ढोल, तारपा या वाद्यांचा वापर सणासमारंभातून होत असे. आता त्याची जागा बँजो पार्टीने घेतली आहे. येथील लोकांना नाच दाखवा असे सांगितले असता त्यांनी बँजोच्या तालावर डिस्को नाच करण्यास सुरूवात केली. या नाचामध्ये लहान मुले, तरूण, तरूणी तसेच पुरूष, स्त्रिया देखील सहभागी झाल्या होत्या. या भागात असलेली तारपा नाचाची परंपरा हळूहळू लोप पावत आहे. त्याऐवजी बुलबुल तरंग, बँड, ध्वनिवर्धक या साधनांच्या सहाय्याने चित्रपटाच्या गाण्याच्या तालावर नाच केले जातात.

**८. केशभूषा** - पूर्वीच्या काळी लोक घरीच केस कापत असत अथवा पारंपारिक न्हावी गावात आल्यावर केस कापून घेत. शहराच्या वाढत्या संपर्कामुळे आता केशभूषेत बदल होत आहे. तरूण मुले न्हाव्याच्या दुकानात जाऊन चित्रपटातील नायकाप्रमाणे नवनविन केशरचना करताना, सतत विंचरताना दिसतात.

**९. भगतावरचा विश्वास** - चालतवड येथील वारली जमातीचे वाघ गुरूजी, वय ६५ वर्ष, निवृत्त आश्रम शाळा शिक्षक. वाघ गुरूजींनी आपल्या लहानपणीची घटना सांगितली "मी ज्यावेळेस १०-१२ वर्षाचा होतो त्यावेळची गोष्ट. माझी आजी बरेच दिवस आजारी होती. म्हणून भगताला बोलावले गेले. आजार बरा करण्यासाठी त्याने जागरण केले पण आजी काही वाचली नाही. आणि जागरणाच्याच दिवशी मेली. तेव्हापासून माझा भगत व जागरणावरचा विश्वास उडाला. भगत जी वनौषधी देतो ती प्रभावी असतात मात्र जागरणासारखे धार्मिक विधी वगैरे सगळं खोटं आहे." हेमंत भोये हा महाविदयालयीन युवक आपला अनुभव सांगताना म्हणाला "मी ज्या वेळेस बारा वर्षाचा होतो त्यावेळेस मला अन्नातून विषबाधा झाली आईवडिलांनी भगताला बोलावणे पाठवले. पण भगत स्वत:च अन्नाच्या विषबाधेमुळेच आजारी होता. तेव्हापासून भगतावरचा माझा विश्वास उडाला."

वरील दोन लोकांच्या कथनातून असे दिसते की लोकांचा भगताबद्दल असलेला आदर, विश्वास हळुहळू उडत चालला आहे.

## धार्मिक बदल

**१. मृत्यूनंतरचे धार्मिक विधी** - कोकणांमध्ये मृत्यूनंतर दहाव्या दिवशी 'दिवस' करण्याची पद्धत आहे. कावळ्याला पिंडदान केले जाते. ही पद्धत हिंदूशी साधर्म्य दाखवणारी आहे. ठाकूर आणि वारलींमध्ये 'काज' केले जाते. या धार्मिक विधीमध्ये डोक्याला चिरा पाडून रक्त काढले जाते. या विधीला अत्यंत महत्व आहे. 'काज' या धार्मिक विधीला वेळ बराच

लागत असल्याने, ठाकूरांचा कलसुद्धा दिवस करण्याकडे वाढत चालला आहे. वारलींमध्ये काही जण 'काज' करतात तर काही जण 'दिवस' करतात. 'दिवस' करण्याची ही प्रथा कोकणांशी संबंध आल्याने रूढ होऊ लागली आहे.

**२. गणेशोत्सव** - जवळजवळ सर्व गावांच्या पाड्यातून आता गणपती बसवला जातो. एका बिगर आदिवासी माणसाने ही प्रथा या भागात सुरू केली.

**३. माळकरी** - साखरशेत व आसपासच्या भागामध्ये अनेक जण 'माळकरी' झाले आहेत. हे माळकरी रुद्राक्षाची माळ गळ्यात घालतात आणि मांसमटण खात नाहीत, दारू पण पित नाहीत. आदिवासी लोक नाशिक जिल्ह्यातील त्र्यंबकेश्वरला जाऊन रूद्राक्षाची माळ घेऊन येतात व माळकरी बनतात. हिंदू संस्कृतीच्या प्रभावामुळे (माळकरी झाल्यामुळे) त्यांच्या आहाराच्या सवयीतही फरक पडला आहे. कारण आदिवासी संस्कृतीमध्ये मटण व दारूचा नैवद्य देवदेवतांना दाखवला जात असल्याने या गोष्टींचा त्याग करणे अत्यंत अवघड गोष्ट आहे. महाराष्ट्रातील संत कवींच्या वारकरी संप्रदायाचा हा परिणाम आहे.

**४. देवदेवता** - महादेव, खंडोबा, भैरोबा, भवानी आणि हनुमान यासारख्या देवदेवतांची पण आपण पूजा करतो असे आदिवासींनी सांगितले. वास्तविक पहाता या देवदेवता बिगर आदिवासींच्या आहेत. महादेवाची पूजा महाराष्ट्रातील व मध्यप्रदेशातील काही भागातील आदिवासी तसेच हिंदू धर्मातील लोकही करताना आढळतात.

**वाडी प्रकल्पामुळे होत असलेले बदल**

भारतीय कृषी औद्योगिक प्रतिष्ठानने (बायफ) या भागात आदिवासी शेतकऱ्यांसाठी वाडी प्रकल्प सुरू केला आहे. या प्रकल्पात सहभागी होणाऱ्या शेतकऱ्यांना त्यांच्याकडे असलेल्या जमिनीपैकी एक एकर जमिनीवर चाळीस आंब्याची झाडे लावण्यासाठी मदत केली जाते. त्यासाठी लागणारी सर्व आर्थिक मदत, मार्गदर्शन बायफच्या कर्मचारी वर्गाकडून केले जाते. पाच-सहा वर्षानंतर आंबे येऊ लागल्यानंतर त्यापासून मिळणाऱ्या उत्पन्नामुळे आदिवासी आर्थिक परिस्थिती बदलेल व इतरही बदल घडतील अशी अपेक्षा आहे.

वावर गावचा उपसरंपच वाडी बद्दल बोलताना म्हणाला, "नेहमीची घरकामे व शेतातील कामे यांच्या जोडीलाच वाडीकडे बघण्यासाठी मला अधिक माणसांची गरज आहे. त्यामुळेच मी माझ्या मुलाचे लग्न ठरवले आहे. येणारी सून घरातील तसेच शेतातील कामे सुद्धा करू शकेल. त्यामुळे वाडीकडे बघायला वेळ मिळेल."

जी लोक आंब्याची झाडं लावायला तयार नव्हती त्यांनी आता आंब्याच्या झाडांकडे रात्रीसुद्धा लक्ष देता यावे म्हणून वाडीजवळच झोपड्या बांधल्या आहेत.

वाडीमुळे मुक्तपणे जीवन जगणाऱ्या आदिवासींवर आता बंधने आली आहेत. त्यांना आता वाडी सोडून जंगलाकडे शिकार व अन्य कामासाठी कधीही जाता येत नाही. त्यांच्या करमणुकीवर सुद्धा परिणाम झाला नाही. वाडीकडे लक्ष द्यावे लागत असल्याने तारपा नाचात सहभागी होता येत नाही. अशा प्रकारे लोक वाडीमुळे कामात अधिकच गुंतले आहेत.

# स्त्रियांचा सामाजिक दर्जा

स्त्रियांचे समाजातील स्थान, हा विषय विकासासाठी आखल्या जाणाऱ्या योजनांमध्ये प्रामुख्याने आढळून येतो. असे दिसून येते की विकासाच्या साधनांची उपलब्धता किंवा त्यापासून होणारा फायदा पुरुषांच्या तुलनेत महिलांना कमी होत प्रमाणात असतो. कधी कधी विकासाच्या योजना बायकांना अपायकारकही ठरू शकतात. तसेच स्त्रियांच्या सहभागाच्या अभावामुळे अनेक विकास योजना अयशस्वी होत असल्याचे दिसून येते. ही वस्तुस्थिती आता स्पष्ट होत चालली आहे. असा एक विचार आहे की या स्थितीला स्त्रियांचे समाजातील खालावलेले स्थान कारणीभूत आहे. या खालावलेल्या स्थानामुळे स्त्रिया विकासाच्या प्रक्रियेत प्रभावीपणे सहभागी होऊ शकत नाहीत. ही स्थिती तातडीने बदलण्याची गरज आहे. त्यासाठी पुरुष व स्त्रियांच्या समाजातील स्थानासंबंधी असलेल्या लोकांच्या कल्पनांमध्ये बदल घडवून आणण्याची गरज आहे. परंतु अशा प्रकारचा बदल घडवून आणण्याआधी त्या समाजात होणाऱ्या घडामोडींचा स्त्रियांच्या समाजातील स्थानावर काय परिणाम होतो याचा पूर्णपणे अभ्यास करण्याची गरज असते.

भारतीय कृषी औद्योगिक प्रतिष्ठान (बायफ) या संस्थेने ठाणे जिल्ह्यातील जव्हार तालुक्यात काही आदिवासी भागांमध्ये वाडी प्रकल्प अंमलात आणण्याचे ठरवले. त्या संदर्भात, त्या समाजात स्त्रियांचे काय स्थान आहे याचा सर्वांगीण दृष्टीने अभ्यास केला गेला. त्यामध्ये दिवसभरात स्त्री व पुरुष कुठली कामे करतात, दैनंदिन आयुष्यात कुठल्या प्रकारच्या जबाबदाऱ्या त्यांच्यावर असतात यासंबंधीची माहिती गोळा करण्यात आली. या माहितीचा उपयोग, निर्णय घेण्याचा अधिकार, पुरुष-स्त्रियांचे परस्परांमधील संबंध व त्यांची समाजाबाहेरील व्यक्तींशी वागणूक, आणि बाहेरील जगाशी त्यांच्या असलेल्या संबंधाचा अभ्यास, करण्यासाठी केला गेला. या सर्व अभ्यास प्रयासाचा उपयोग विकासाच्या योजना आखण्यासाठी करता येऊ शकेल.

**स्त्रिया व प्रगती :**

जगभरात स्त्रियांना पुरुषांच्या तुलनेत नेहमीच खालचा दर्जा दिला गेला आहे. भारतात सुद्धा पुराणकालापासून साधारण हीच परिस्थिती होती. वैदिक काळानंतरच्या काळात स्त्रियांची शूद्रांबरोबर तुलना केली गेली आहे. काही सामाजिक समजुतींमुळे मासिक पाळीच्या संदर्भातील काही विचारांमुळे स्त्रियांना नेहमीच दुय्यम स्थान दिले गेले आहे. त्यांना कुठलेच अधिकार व संधी दिली गेली नाही. स्त्रियांचे स्वतःचे असे वेगळे असित्वच नव्हते.

इंग्रजांच्या काळात भारतातील व परदेशातील समाजसुधारकांनी समाजातील कुप्रथा नष्ट करण्याचा व स्त्रियांना प्राथमिक शिक्षण देऊन त्यांचे आयुष्य अधिक सुखकर करण्याचा कसून प्रयत्न केला. त्या काळातील परिस्थिती बदलण्यासाठी अर्थात या सामाजिक सुधारणा पुरेशा नव्हत्या, परंतु त्यांचा उद्देश कुप्रवृत्तींवर मूलभूत उपाय करण्याचा होता.

परदेशाप्रमाणेच भारतात सुद्धा औद्योगिक क्रांती, तांत्रिक बदल व आधुनिकीकरण यामुळे पूर्वीच्या राजकीय व आर्थिक रचनेत स्थित्यंतरे घडली. शिवाय औपचारिक शालेय शिक्षण, जनसंपर्क साधनांचा प्रभाव

आणि नियोजित व अनियोजित बदलांचा लोकजीवनावर सखोल परिणाम झाला. आधुनिकीकरणाबरोबरच येणाऱ्या ताण-तणावांमुळे लोकांना जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात तडजोड करावी लागली. आता पुरुषच नव्हे तर स्त्रियाही नवनवीन क्षेत्रे शोधताना दिसतात आणि त्यांची क्षितिजे अधिक रुंदावत चालली आहेत.

पण या सर्वाचा स्त्रियांचा जीवनस्तर वाढविण्यासाठी फारसा उपयोग झाला नाही असे म्हणावे लागेल. कारण स्त्रियांचे सामाजिक स्थान हे समाजातील पुरुष व स्त्रियांच्या भूमिकेशी निगडित आहे. एक नविन विवेकबुद्धी, एक नविन संवेदनशीलता जाणवते ज्यालाच स्त्रीमुक्ती चळवळ म्हणतात. आता स्त्रिया स्वतःच्या हक्क व जीवनस्तराबद्दल सजग आहेत व सामाजिक, राजकीय आर्थिक न्यायाची व पुरुषांच्या बरोबरीच्या स्तराची मागणी करीत आहोत.

नियोजित प्रगतीच्या संदर्भातही स्त्रियांच्या स्तराचा प्रश्न मुख्यत्वे करून विचार केला जात आहे. विकास उपाय योजनांचा स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने उपयोग होत नाही व या योजना यशस्वी होण्यासाठी स्त्रियांचा सक्रीय सहभाग आवश्यक आहे याची वाढती जाणीव समाजामध्ये दिसून येते. एकूण लोकसंख्येच्या अर्धा भाग असलेल्या स्त्रियांना, प्रगतीच्या उपाययोजनांचा पुरेपुर लाभ घेता येत नसल्यामुळे व त्यांच्या प्रश्नांचा विचार न केल्यामुळे विकास योजनांना चालना मिळत नसल्याची जाणीव १९७० च्या आसपास होऊ लागली. ज्या स्त्री-पुरुषांचा समानतेवर विश्वास आहे त्यांना नियोजित व अनियोजित विकासाचा विपरित परिणाम स्त्रियांवर होत आहे या सत्याची जाणीव होऊ लागली आहे. आज आपण जीवनाच्या दर्जाचा गांभीर्याने विचार करू लागलो आहोत. आणि हा दर्जा सुधारावा म्हणून प्रामाणिक प्रयत्न करीत आहोत. यासाठी अपयश टाळण्यासाठी व त्यांच्यावरील विपरित परिणामांची तीव्रता कमी करण्यासाठी स्त्रियांच्या सहभागाचा विचार करणे आवश्यक आहे. स्त्रिया व त्यांची प्रगती या संदर्भात पहिले पाऊल म्हणजे प्रगती करण्याच्या विविध क्षेत्रांचे आग्रमान व प्रगतीची साधने बदलणे. त्याचाच परिपाक म्हणून जागतिक राष्ट्रसंघटनेने १९७६-८५ हे स्त्रियांच्या विकासाचे दशक म्हणून जाहीर केले. त्यामध्ये स्त्रियांचे प्रश्न वाजवी असून त्यांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर सर्वाधिक प्राधान्य दिले जाईल असे धोरण ठरवण्यात आले.

सर्वात प्रथम १९७५ मध्ये मेक्सिको शहरात 'स्त्रियांचा विकास' या विषयावर मोठी परिषद भरवली गेली. त्याचा उद्देश होता विकास कार्यक्रम स्त्रियांपर्यंत पोचण्यात व स्त्रियांना फायदेशीर ठरण्यास पुन:पुन: येत असलेल्या अपयशाची मूळ कारणे शोधून काढणे. यात स्त्रियांच्या आर्थिक व सामाजिक प्रगतीतील सहभागाकडे दुर्लक्ष केल्यामुळे जो मानवी क्षमतेचा व्यय होतो त्यावरही भर देण्यात आला होता. शिवाय मानवी क्षमतेचा पुरेपूर उपयोग कसा होऊ शकेल यावर उपाय शोधून काढले गेले. मानवी जनसंख्येचा अर्धा हिस्सा असलेल्या स्त्रियांनाही स्वत:च्या क्षमतेचा उपयोग झाला पाहिजे, यासाठी प्रयत्न केले गेले. जीवनाचा दर्जा हा स्त्रियांसहित सर्वांना आशादायी व अर्थपूर्ण असला पाहिजे. यासाठी

स्त्रियांच्या मते त्यांचे स्वत:चे व समाजाचे भले कशात आहे हे जाणून घेणे आवश्यक आहे. एकंदर, विकासाच्या प्रक्रियेत स्त्रियांचा बरोबरीचा सहभाग असणे आवश्यक आहे.

**स्त्रियांचा समाजातील दर्जा व भूमिका या संदर्भातील संकल्पना :**

एखादया समाजात एका व्यक्तीला अनेक पदे मिळतात व ती व्यक्ती त्या पदाला अनुसरून येणारी कर्तव्ये पार पाडत असते. ही पदे विविध असतात. उदा. उदयोगपती, शिक्षक, न्यायाधीश इत्यादी. व्यक्ती जी कर्तव्ये पिता किंवा न्यायाधीश म्हणून पार पाडते त्याला भूमिका म्हणता येईल. समाजाच्या नीती-नियमांना अनुसरून एखादया व्यक्तिला आपल्या पदाची भूमिका पार पाडावी लागते. पुष्कळशी पदे ही व्यक्तिच्या वयावर व लिंगावर अवलंबून असतात. उदा. एखादया जमातीचा प्रमुख हा पुरुषच असे किंवा ग्रामपंचायतीच्या पंचांचे पद ही एखादा पुरुषच भूषवित असे. सामाजिक पदे ही कमावलेली किंवा परंपरागत असू शकतात. एखादी व्यक्ती अशा मिळवलेल्या किंवा परंपरागत विविध जबाबदाऱ्या एकाच वेळी पार पाडत असते. समाजातील पद व समाजातील दर्जा हे शब्द प्रयोग एकमेकांसाठी वापरले जातात. तरीही 'दर्जा' सांगताना त्यात क्रमवारी व वर्गीकरण हा अर्थ असतोच. दर्जा व्यक्तीची किंमत ठरवतो. त्यामुळे हे स्पष्ट केले जाते की हे पद दिलेल्या सामाजिक संदर्भात उच्च किंवा दुय्यम आहे. शेवटी प्रत्येक सामाजिक पद व दर्जा समान हक्क, सुविधा, अधिकार व सत्तेशी निगडित असतातच.

या दृष्टीने सामाजिक स्थान किंवा पद हा शब्दप्रयोग अधिक उचित वाटतो कारण त्याचा उद्देश आदिवासी स्त्रियांच्या दर्जाप्रमाणे त्यांच्या भूमिकेचे वर्णन करणे व तिचे खरे स्वरूप जगापुढे मांडणे हा असतो. आदिवासी लोकांचा एकमेकांतील संबंध व त्यांच्यात निर्णय क्षमतेचा अधिकार कोणाला असतो याचा अभ्यास केल्यामुळे विकास योजनांची आखणी करून स्त्रियांच्या सहभागाची अपेक्षा करणे शक्य आहे.

**स्त्रियांचा दर्जा :**

भारतीय स्त्रियांबद्दल बोलताना एकदा गांधीजी म्हणाले होते, ''स्त्रिया या पुरुषांच्या समान मानसिक क्षमता असलेल्या जोडीदार आहेत. त्यांना पुरुषांच्या प्रत्येक कार्यातील प्रत्येक क्षणाच्या सहभागाचा हक्क आहे. पुरुषांप्रमाणे त्यांनाही स्वातंत्र्य व मोकळीक मिळण्याचा हक्क आहे.''

आदिवासींचा सर्वांगीण विकास होण्यासाठी प्रथम त्यांच्या स्त्रियांचा विकास होणे अत्यंत आवश्यक आहे. यासाठी स्त्रियांच्या आजच्या दर्जाचा आढावा घेणे आवश्यक आहे. यासंदर्भात राल्फ लिंटनची दर्जा विषयक कल्पना विचारात घेण्यासारखी आहे. ''एखादया व्यक्तीचा दर्जा म्हणजे विशिष्ट वातावरणातील समाजात त्या व्यक्तीला मिळालेल्या विविध प्रकारच्या दर्जाची गोळा बेरीज होय. उदा. त्याचे सामाजिक संबंध, रीतीरिवाज, श्रद्धा, व्यक्तीच्या जन्मापासून मृत्युपर्यंत निभावाव्या लागणाऱ्या विविध भूमिका, प्रत्येक स्थितीत

स्त्रीला घरात व समाजात वेगवेगळ्या जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात. तिचे हक्क व तिच्याबद्दलचा आदरच तिला दर्जा प्राप्त करून देतो. हा दर्जा स्वाभाविकपणे मिळालेला किंवा कमवलेला असू शकतो.

दर्जा हा नेहमीच दुसऱ्याच्या तुलनेत एखादी व्यक्ती सामाजिक नैतिक रिंगणात जी भूमिका पार पाडत असते त्याच्याशी निगडीत असतो. दर्जाची परिमिती निश्चित केल्याशिवाय स्त्रीचा दर्जा निश्चित करणे अशक्य आहे. आज आदिवासी स्त्रियांच्या आयुष्यात पारंपारिक व आधुनिक कल्पना एकत्र आलेल्या आढळतात. अशा गुंतागुंतीच्या परिस्थितीत स्त्रीच्या शारीरिक व सामाजिक विकासप्रक्रियेत ती ज्या विविध भूमिका पार पाडते त्याचं व्यवस्थित विवेचन करणे सोयीचे ठरेल.

प्रत्येक संस्कृतीचे तिच्या घटकांभोवती एक विशिष्ट वलय असते. शारीरिक अस्तित्व हे समाजाच्या आर्थिक व्यवहारांवर अवलंबून असते. अशा अस्तित्वासाठी स्त्रीला ज्या भूमिका कराव्या लागतात त्यांचा विचार येथे केला आहे.

आर्थिक अस्तित्वासाठी रोजचे कामकाजसुद्धा महत्त्वपूर्ण असते. येथे आदिवासी जमातीतील स्त्रीच्या रोजच्या कामकाजाचा आढावा घेतला आहे. ही चौकट वारली, कोकणा व ठाकूर स्त्रियांसाठी सारखीच आहे.

### घरगुती कामकाज

घरची स्त्री विशेषत: सून ही सर्वात आधी उठते. लगेच कामांची मालिकाच सुरू होते. जात्यावर धान्य दळणे, विहिरीवरून पाणी भरणे, घराची साफसफाई, न्याहारी तयार करणे, मुलांना व नवऱ्याला वाढणे इत्यादी. न्याहारी केल्यावर ती शेतावर जाते व दुपारी परत येते. आल्यावर दुपारचे जेवण बनवते. भांडी घासते, चूल सारवते जेवून ती पुन्हा शेतावर जाते. साधारणत: स्त्री सूर्यास्तापूर्वी घरी परत येते व पुन्हा एकदा पाणी भरून ठेवते, रात्रीचे जेवण शिजवून सर्वांना वाढते. बहुतेक कुटुंबात रात्रीच्या जेवणासाठी घरातील सर्व लोक एकत्र जेवायला बसतात.

झोपण्यापूर्वी अन्नाची झाकपाक करून तिला भांडी घासावी लागतात. कधीकधी झोपण्यापूर्वी ती थोडी दारू पिते. सर्वांचे आटोपल्यावर ती सर्वात शेवटी झोपते. ऋतुमानाप्रमाणे या दिनक्रमात फारसा बदल होत नाही. फक्त लावणीच्या हंगामात नवरा-बायको दोघेही सकाळी लवकर घर सोडतात व रात्री उशीरा जोडीनेच परत येतात.

### घराबाहेरील कामे

आदिवासी जमातीतील लोकांचा मुख्य व्यवसाय शेती. ज्यांची स्वत:ची शेती आहे ते आपल्या शेतात काम करतात. बाकीचे शेतमजूर म्हणून दुसऱ्यांच्या शेतावर राबतात. लग्नापूर्वी मुलगी वडील किंवा भावाबरोबर कामाला जाते. लग्नानंतर नवऱ्याबरोबर व म्हातारपणात मुलांबरोबर काम करते. शेतावर पेरणी करणे, गवत कापणे, तण काढणे, जळणासाठी लाकूड गोळा करणे, कंदमुळे व फळे गोळा करणे, राबणी करणे यासारख्या कामांमध्ये स्त्रिया पुरुषांना मदत करतात. स्त्रिया बाजारात जातात या व्यतिरिक्त त्या दुसऱ्यांना शेतीच्या कामातही मदत करतात.

अन्नधान्याच्या तुटवड्याच्या काळात म्हणजे सप्टेंबर, ऑक्टोबर या महिन्यांमध्ये व उन्हाळ्यात त्या शेतमजूर म्हणून काम करतात. गावात त्यांना दरदिवशी १४ रुपये मिळतात तर गावाबाहेर त्या दरदिवशी ३० रुपये कमावतात. याशिवाय त्यांना बाहेर जेवण, दारू व तंबाखूही मिळते.

या घरगुती व बाहेरच्या कामाव्यतिरिक्त आपल्या आयुष्यात स्त्री इतर अनेक जबाबदाऱ्या व कामे पार पाडते.

**विशेष काम** - गर्भधारणा व मुलांचे संगोपन करणे यामुळे स्त्रीला समाजात खास मानाचे स्थान मिळते. पुरूष क्वचितच मुलांची काळजी घेतात. मूल आजारी असेल तर नेहमी स्त्रीच त्याची काळजी घेण्यासाठी घरी रहाते.

**मानाची कामे** - 'दाई' आईसमान मानली जाते. लग्नकार्यात व मृत्युसमयी तिला खास महत्त्व असते. पाचवीची पूजा फक्त 'दाई'च करते. बाळंतपणाच्या वेळी स्त्रीची व बाळाची पूर्ण जबाबदारी तिच्यावरच असते.

**दर्जा खालावणारी कामे** - मुलीला आपला पती निवडण्याचे स्वातंत्र्य असते पण एखाद्या पुरूषाशी अनैतिक संबंध ठेवल्यास तिला हीन लेखले जाते. एखादी स्त्री पंचायत चालू असताना बोलली किंवा काडीमोडाचा खटला पहायला आली तर तिला इतरांकडून वाळीत टाकले जाते. कायद्याने स्त्रीला जरी समान दर्जा दिला असला तरी सामाजिक दृष्टीने तो अमलात येत नाही.

**निषिद्ध कामे** - प्राचीन काळापासून स्त्रीने खळ्यात प्रवेश करायचा नाही असा रिवाज आहे. विशेषतः १३ ते ४५ वयातील स्त्रियांसाठी हा नियम पाळला जातो. कारण या वयात स्त्रीला ऋतुकाळ येतो. याबाबत अशी समजूत आहे की ऋतुकाळ चालू असलेल्या स्त्रीने जर खळ्यात प्रवेश केला व धान्याला स्पर्श केला तर पुढच्या वर्षी पीक कमी येते.

नांगरणी करणे हे कष्टाचे व अवघड काम समजले जाते त्यामुळे स्त्रियांना कधीही नांगरणी करू दिली जात नाही.

ऋतुकाळ चालू असताना स्त्री स्वयंपाक करू शकत नाही व त्या ४-५ दिवसांपुरते तिला एका कोपऱ्यात इतरांपासून वेगळे बसावे लागते. स्त्रियांना कोंबडी किंवा बकरे कापू दिले जात नाही.

स्त्री व पुरुषांची आयुष्यभराची कामे व जबाबदाऱ्या यांची तुलना करून पाहिली तर असे म्हणावे लागेल पुरूष घराबाहेरची अवजड कामे करतात पण त्यांचा घरगुती कामातील सहभाग फारच कमी असतो.

**पुरूषांची रोजची कामे** - बायको काही वेळ उपलब्ध नसेल तर किंवा दुसरे काही काम करत असेल तर मुलांना सांभाळणे, शेतात नांगरणे, पेरणी, मळणी, कापणी करणे, लाकडे तोडणे व ओंडके वाहणे, वाळलेल्या पालापाचाळ्या पासून व कचऱ्यापासून खत बनविणे, तयार पिकाची रात्री राखण करणे, पावसाळ्यात मासे पकडणे इत्यादी कामे पुरूष करतात.

**विशेष कामे** - नांगरणी व मळणी फक्त पुरुषच करतात.

**मानाची कामे** - भगताला कोणत्याही सण समारंभ व धार्मिक कार्यामध्ये मानाचे व महत्वाचे स्थान असते.

**दर्जा खालावणारी कामे** - आळशी व बेरोजगार पुरूषांना समाजात मानाचे स्थान नसते. लग्नबाह्य अनैतिक संबंध ठेवणाऱ्यांना समाजात नावे ठेवली जातात.

**निषिद्ध कामे** - पुरूष बाळंतपण करू शकत नाहीत किंवा बाळंतपण पाहूही शकत नाहीत. बाळंतपणाच्या वेळी करावी लागणारी कामे पुरूष करूच शकणार नाहीत असे म्हटले जाते. भगताला मात्र बोलावले जाते.

**कामाचे स्वरूप** - लहान मुलगा व मुली यांच्या कामाच्या स्वरूपात फारसा फरक नसतो. जी शाळेत जातात ती मुले-मुली थोडे कमी काम करतात. जे घरी रहातात ते न्याहारीनंतर काही वेळ बरोबरीच्या मुलांबरोबर खेळतात. काही घरच्या मोठ्या माणसांबरोबर गुरे चारायला जातात. मुली आईला घराची साफसफाई करणे, भांडी घासणे इ. घरगुती कामात मदत करतात.

**युवावस्था** - वयात आल्यानंतर मुला-मुलींना अजिबात एकत्र खेळू दिले जात नाही. साधारणत: मुलींना शाळेत घातले जात नाही. वयात आलेल्या मुलींना स्वयंपाक करणे, पाणी भरणे, शेतात काम करणे, गुरे चरायला नेणे इत्यादि कामे करायला लागतात. गुरे चरायला नेण्याचे काम तरूण मुलेही करतात. तरूण मुले घरच्यांना शेतीच्या कामात मदत करतात. जर त्यांना शिक्षणात रस असेल तर ते त्यांचे शिक्षण चालू ठेवतात व सुट्टीत शेतीच्या कामात मदत करतात. मुले-मुली वयात आली की त्यांच्यासाठी जोडीदार शोधायला सुरवात होते साधारणत: मुलाकडची लोकं मुलीच्या घरी मागणी घालायला जातात.

**म्हातारपणातील कामाचे स्वरुप** - जोपर्यंत अंगात काम करण्याची ताकद आहे तोवर लोक काम करत रहातात. जे घरी बसतात ते दोर वळणे, लहान मुलांकडे लक्ष देणे, घरकामात मदत करणे अशा स्वरूपाची छोटी कामे करतात.

## स्त्रिया व बाजार

तलासरी हे आठवडे बाजाराचे एक ठिकाण आहे. ते उंच पठारावर वसले असून साखरशेतपासून ३ कि.मी. अंतरावर आहे. या बाजारात वारली स्त्रिया जास्त करून खरेदीसाठी येतात तर ठाकूर स्त्रिया वडोलीच्या बाजारात जातात.



**विक्रेता म्हणून स्त्रियांचे स्थान :** बाजारात स्त्री-विक्रेत्या फारच कमी आढळतात. त्यापैकी बऱ्याच स्त्रियांनी मासे विकायला आणले होते. या स्त्रिया मांगली जातीच्या होत्या. त्या जव्हारच्या बाजारातून मासे विकत घेतात व वेगवेगळ्या ठिकाणी आठवडे बाजारात जाऊन पुन्हा विकतात. त्यांना साधारणत: दिवसाला २५ रु. फायदा होतो. कुणीही आदिवासी स्त्री कोणतीही वस्तू विकताना दिसली नाही. कारणमीमांसा करताना खालील गोष्टी लक्षात आल्या.

१) लोकांकडे उत्पादनक्षमता नाही. ज्यांना पैशाची गरज आहे ते लोक वरई, तांदूळ, खुरासणी बाजारात विकतात. या गोष्टी आदिवासी विकास महामंडळाला विकतात व त्याबदल्यात त्यांना पैसा मिळतो. त्यामुळे या भागात स्त्री विक्रेत्या दिसत नाहीत.

२) आदिवासी जमातीतील लोक जंगलातून रिठे, डिंक, आंबाडीच्या बिया गोळा करतात. या लोकांमध्ये वस्तूंची अदलाबदल केली जाते. येथील स्त्रिया मोबदल्यात बटाटे, कांदे, मिरच्या, लसूण इत्यादी गोष्टी घेतात. उदा. १ किलो रिठ्याच्या किंवा अंबाडीच्या मोबदल्यात स्त्रियांना २५० ग्रॅम बटाटे किंवा मिरच्या मिळतात. डिंकाच्या मोबदल्यात मात्र तेवढ्याच वजनाची दुसरी गोष्ट मिळते. डिंक पुन्हा विकला जाऊ शकतो. त्यामुळे कदाचित त्याची किंमत अशाप्रकारे केली जात असेल.

बाजारात दागिन्यांची व कपड्यांची प्रत्येकी १०-१२ दुकाने आढळली. स्त्रिया बहुदा समुहाने साड्या, फडके (डोक्याला बांधण्याचे) व दागिन्यांच्या खरेदीसाठी येतात. त्या आपापसात रंग, टिकाऊपणा, कपड्यांचे नक्षीकाम याबाबतीत चर्चा करताना आढळल्या. फारच क्वचित नवरा आपल्या बायकोबरोबर बाजारात खरेदीला जातो. त्याच्या स्वत:ची कपड्यांची खरेदीसुध्दा तो बायको, आई किंवा बहिणीला करायला सांगतो. मजुरी करून मिळवलेल्या पैशातून अशा बाजारातील खर्च केला जातो. कधी-कधी कुटुंबप्रमुखाकडूनही पैसे घेतले जातात.

## आर्थिक निर्णय

कुटुंबाला मुख्यत: मजुरी करून किंवा वरई, तांदूळ, खुरासणी, सारखी शेती उत्पादने विकून पैसा मिळतो. खर्चाचा निर्णय इतर घटकांच्या सल्ल्याने कुटुंबप्रमुख घेतो. पण घरातील स्त्री मात्र या निर्णयात ढवळाढवळ करत नाही. वडिलांच्या मृत्युनंतर मोठा मुलगा कुटुंबप्रमुख बनतो व त्या नात्याने आर्थिक निर्णय घेतो. स्त्रियांनी कमावलेला पैसा त्या स्वत:साठी ठेवतात. या पैशातून कुटुंबासाठी काही खाण्याच्या गोष्टी, गोडधोड, मुलांसाठी एखादे खेळणे किंवा शर्ट खरेदी करते. विधवा स्त्री सगळ्यात शेवटी स्वत:साठी काही खरेदी करते. विधवा स्त्रिया स्वत:च्या कमाईचा मार्ग व खर्च स्वत: स्वतंत्रपणे निश्चित करू शकते याबाबतीत तिला तिचे शेजारी सल्ला देतात.

## वारसा हक्क व मिळकतीचा हक्क

पुरूषप्रधान संस्कृती असल्यामुळे जमीनजुमला, घर व गुरेढोरे ही सर्व संपत्ती मुलाला मिळते. जर मुलगा नसेल तर जवळच्या नातेवाईकातील मुलाला वारस मानले जाते. पूर्वी घराण्याची मिळकत कधीही विधवेला, मुलीला किंवा कोणत्याही स्त्रीला दिली जायची नाही. पण हल्ली मुलगा नसेल तर मुलीला वारस मानले जाते. त्या मुलीच्या नवऱ्याचा मात्र त्यावर काहीही अधिकार नसतो. विधवेने पुन्हा लग्न करेपर्यंतच तिचा त्या मिळकतीवर हक्क असतो. तिने लग्न केल्यावर तिच्या मुलाला किंवा मुलीला ती मिळकत मिळते. बहुतेक वेळा स्त्री आपल्या मुलाला सासरी ठेवते त्यामुळे सासरच्या संपत्तीवर व घरावर त्याचा हक्क रहातो. या स्त्रियांच्या दृष्टीने असे करणे फायदेशीर असते. कारण दुसरा नवरा या पहिल्या मुलाला त्याच्या संपत्तीचा वारस मानेलच असे नाही.

## दागिने

लग्नात मुलीला गळ्यातले दागिने, नथ व कानातले मिळतात. पूर्वी हे सर्व दागिने चांदीचे बनवत. हल्ली मात्र सर्वजण बनावटी दागिने घालतात. या दागिन्यांवर फक्त स्त्रीचा अधिकार असतो. तिच्या मृत्यूनंतर तिच्या दागिन्यांसह सर्व वस्तू पुरली जाते किंवा जाळली जाते त्यामुळे ते दागिने कोणाला देण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही.

**कर्ज :** लग्नासाठी, घर बांधण्यासाठी, शेतीसाठी जर पैसा कमी पडला तर शेजारी नातेवाईक व क्वचित प्रसंगी गावातील सावकाराकडून कर्ज घेतले जाते. याबाबतीत कुटुंबप्रमुख आपल्या बायकोच्या सल्ल्याने निर्णय घेतो. कर्ज घेताना किंवा फेडताना नवरा-बायको बरोबर जातात. यात दोन फायदे असतात. पहिला फायदा म्हणजे फसवणूकीचा धोका कमी होतो. दुसरे म्हणजे जर नवरा-बायको पैकी कोणाही एकाचा मृत्यू झाला तर दुसऱ्याला या आर्थिक व्यवहाराची माहिती रहाते. आर्थिक चणचणीच्या काळात धान्य विकले जाते. यात वरई, तांदूळ व सर्वात शेवटी नागली विकली जाते. धान्य विकण्याचा निर्णय जसा एकत्र घेतला जातो तसेच किती धान्य विकायचे हे सुद्धा आई किंवा बायकोच्या सल्ल्यानेच ठरवले जाते.

**मुलांवरचा हक्क : मुलांच्या शिक्षणासंबंधीचे सर्व महत्त्वाचे निर्णय बहुतेक वेळा कुटुंबप्रमुख घेतो. पण याबाबतीत** घरातील परिस्थिती व मुलांच्या आवडीप्रमाणे **बदल होतात.**

मुलीसाठी किंवा मुलासाठी जोडीदार शोधताना नवरा-बायको चर्चा करून मुलांच्या सल्ल्याने निर्णय घेतात. पण वधूमूल्य देताना मात्र कुटुंबप्रमुख फक्त जमातीतील लोकांचा सल्ला घेतो. याबाबतीत स्त्रियांचा सल्ला मुळीच घेतला जात नाही. ही रक्कम ५०० ते १००० रु.च्या दरम्यान असते.

## सामाजिक वर्तुळ

समाजात मिळणारे हक्क, कर्तव्य, बंधने व सवलती यावरच स्त्रियांचा सामाजिक दर्जा अवलंबून असतो. त्यांच्या विशिष्ट समाजात जन्मापासून मृत्यूपर्यंत स्त्री कोणकोणत्या भूमिका करते हे पाहिले ते त्यांच्या सामाजिक दर्जाची कल्पना येते.

मुलीच्या किंवा मुलाच्या जन्मानंतर आनंदोत्सव साजरा केला जातो. मुलाच्या किंवा मुलीच्या जन्मानंतर दाईला दिल्या जाणाऱ्या पैशात काहीही भेद केला जात नाही. तरीही मुलगा व्हावा अशी इच्छा असते. कारण तो म्हातारपणीचा आधार मानला जातो. या सगळ्या जमातीतील स्त्रियांना कमीत कमी चार अपत्ये हवी असतात त्यापैकी २ किंवा ३ मुले व १ किंवा २ मुली असाव्यात अशी इच्छा असते. या सर्व जमाती पुरूषप्रधान असल्यामुळे स्त्रीची सर्व बाळंतपणे सासरीच केली जातात. वयाच्या ५-६ वर्षापर्यंत मुला-मुलीत फरक केला जात नाही. दोघेही एकत्र खेळतात, लहान भावंडाना सांभाळतात, कधीकधी आईला घर झाडणे वगैरे घरकामात मदत करतात. त्यानंतर मुलींना शिकवले जाते व त्यांना दळणे, पाणी आणणे, भात शिजवणे (भाकऱ्या करणे इत्यादी घरगुती कामे) अशी कामे करायला सांगितली जातात. त्या वयात आल्यावर स्त्रियांना करावी लागणारी कामे सर्व त्या करतात.

मुलगी १० वर्षाची झाली की जशी जरूर पडेल त्याप्रमाणे तिला शेतावर कामासाठी नेले जाते मासिक पाळी सुरू झाली की ती प्रजोत्पदनासाठी लायक समजली जाते व त्यामुळे ती लग्नालाही योग्य समजली जाते.

**लग्न :** काळाप्रमाणे लग्नाच्या वयात बदल बदू शकतो. सध्या मुलींचे सरासरी १४ व्या वर्षी व मुलांचे १६ ते १८ व्या वर्षी लग्न करतात. वावर या गावी ७-८ वर्षाच्या मुलींची वयात येण्यापूर्वीच लग्ने झालेली आढळली.

**लग्न जमवणे :** साधारणत: मुलाकडून मुलीला मागणी घातली जाते. पुढची बोलणी सुरू करण्यापूर्वी

मुलीचे मत विचारले जाते. याबाबतीत मुलींना स्वातंत्र्य असते. पहिल्याच किंवा फार तर दुसऱ्या मागणीचा मुलीकडून व तिच्या आई वडिलांकडून स्वीकार केला जातो. जर का स्थळ नाकारले तर पुढे मुलीला स्थळ येणार नाही अशी त्यांना भीती असते. मुलीने एकदा होकार दिला की हुंडा किंवा देण्या-घेण्याची बोलणी करताना घरच्या स्त्रियांचा अजिबात सल्ला घेतला जात नाही. हा निर्णय घरचा कर्ता पुरुषच घेतो. कामाला अधिक मनुष्यबळ मिळावे म्हणून किंवा मुलगा व्हावा म्हणून पुरुष दुसरी पत्नी आणतो. या समाजात बहुपत्नीत्वाची प्रथा आहे. पहिली पत्नी गेल्यानंतर तिच्या मोठ्या किंवा धाकट्या बहिणीशी लग्न केल्याची उदाहरणे देखील पहायला मिळाली.

गुलाब शंकर कावा ही स्त्री २५ वर्षाची आहे. तिला दोन मुली आहेत व ती आपल्या दुसऱ्या नवऱ्याकडे अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत रहात आहे. प्रथम तिचा विवाह तिच्या मोठ्या बहिणीच्या नवऱ्याशी झाला एक वर्षानंतर दोन बहिणींमध्ये भांडणे झाली. त्यांच्या आईवडिलांनी गुलाबला परत आणायचे ठरवले कारण दुसऱ्या बहिणीला ५ मुले होती त्यामुळे तिला नवऱ्याबरोबर रहाण्याचा अधिकार होता. गुलाब फारच दुःखी होती व पुढील ४ वर्षे ती भावाबरोबर राहिली. त्यांच्या ओळखीचे एक कुटुंब होते त्यातील स्त्रीने एक दिवस गुलाबला ५ रु. दिले व तिला आपल्या मुलाबरोबर म्हणजे शंकरबरोबर रहायला सांगितले शंकरने याआधी ३ लग्ने केली होती. पण तो त्या बायकांबरोबर संसार करू शकला नाही. आपल्याला मुलगा असवा अशी शंकरची तीव्र इच्छा होती. गुलाबला पहिल्या नवऱ्यापासून झालेली मुलगी होती. शंकर व गुलाबचा संसार सुरू झाला. गुलाब दुसऱ्यांदा गरोदर राहिली व लवकरच तिने एका सुदृढ मुलीला जन्म दिला. अचानक शंकर गुलाबला त्रास देऊ लागला. व तिला घर सोडून निघून जायला सांगू लागला. गुलाबला त्याच्या वागण्यामुळे धक्काच बसला. खूप शारीरिक व मानसिक त्रास होत असूनही गुलाब शंकर जवळच राहिली.

**काडीमोड :** तिन्ही आदिवासी जमातीत काडीमोड सर्रास घेतला जातो. कायदेशीर घटस्फोटापेक्षा सोडचिठ्ठीचे प्रमाण अधिक आढळते. १०% पुरूषांनी आपल्या बायकांना सोडले आहे. उलट स्त्रियांनी आपल्या नवऱ्यांना सोडण्याचे प्रमाण ५०% आहे. जर नवऱ्याने काडीमोड मागितला तर त्याने मुलीला दिलेले पैसे त्याला परत मिळत नाही. म्हणून साधारणपणे पुरूष स्त्रियांनाच काडीमोड मागायला किंवा सोडून जायला प्रवृत्त करतात. अशा परिस्थितीत त्याला त्याच्या बायकोच्या दुसऱ्या नवऱ्याकडून 'देज' परत मिळतो नवऱ्याला काडीमोड मागण्यासाठी खालील कारणे असतात - आळशी बायको, वांझपणा, अनैतिक संबंध, मुलगा न होणे, सासू-सासऱ्यांशी न पटणे इत्यादी. बायकोला काडीमोड मागायला खालील कारणे असतात. नवऱ्याची आर्थिक स्थिती वाईट असणे, दारू पिणे, मारझोड करणे, नपुंसकत्व.

**मुलांचा ताबा :** काडीमोड झाल्यावर बायकोचा नवऱ्याच्या मालमत्तेवर काहीच अधिकार उरत नाही. तिला संतती असेल तर साधारणपणे ती मुलीला आपल्याबरोबर नेते व मुलाला त्याच घरी सोडून जाते. याचे एक कारण म्हणजे तिचा दुसरा नवरा तिच्या सर्व मुलांचा सांभाळ करायला तयार नसण्याची शक्यता असते. दुसरे म्हणजे मुलाचा आपल्या पित्याच्या संपत्तीवर वारसा हक्क असतो. त्यामुळे मुलाच्या संगोपनाचा प्रश्न सुटतो. मोठा झाल्यावर त्याला धन व जमीन आपोआपच मिळते.

नवरा नपुंसक असल्याची तक्रार जर बायकोने केली असेल तर ती त्याला सोडून दुसऱ्या पुरुषाबरोबर राहू शकते, व मुलाला जन्मही देऊ शकते.

**विधवाविवाह :** नवरा जर दुसऱ्यांदा तिसऱ्यांदा किंवा दहाव्यांदा लग्न करत असला तरी त्याचा विवाहसोहळा थाटामाटाने साजरा केला जातो पण विधवेचा दुसरा विवाह सुद्धा कधीही साजरा केला जात नाही. त्याला 'पाट लावणे' म्हटले जाते. बहुतेक सर्व विधवांचे विवाह होतात. काही वेळा एखादा पुरुष विधवेचा लग्न न करता तसाच स्वीकार करतो व त्याला समाज मान्यताही देतो. कोकणा विधवा स्त्रीला पुनर्विवाहानंतरही धार्मिक कार्यात सहभागी व्हायची परवानगी नसते. पण वारली व ठाकूर लोकांत मात्र असा भेदभाव केला जात नाही. त्यांना पूर्ण आयुष्य उपभोगता येते.

**वंध्यत्व :** काडीमोड घेण्याचे हे एक कारण असू शकते. 'दाव देऊन वंध्यत्व दूर करता येते' असा या लोकांचा विश्वास असतो. भगत दाव देण्याचे काम करतो पण धार्मिक कार्यात सहभागी होण्यासाठी 'वंध्यत्व' हा अडथळा नसतो. तिला समाजात समान दर्जा असतो.

पुरूषाच्या नपुंसकतेवर काही उपाय केले जात नाहीत. त्याला दुसरी बायको मिळते कारण आपली पहिली बायकोच वांझ होती असे तो ठामपणे सांगतो. म्हणून त्याचा विवाह होतो व तो दुसऱ्या बायकोसाठी वेगळे घर करतो.

**वेश्या व्यवसाय :** या लोकांना विवाह व शरीर संबंधांमध्ये इतके स्वातंत्र्य असते की वेश्याव्यवसाय सुरू व्हायला काही कारण नाही. उंबारविहिरला दोन वेश्या आढळल्या पण त्या बाहेरून आलेल्या होत्या.

**अविवाहिता :** जर एखाद्या मुलीला लग्नाची मागणी आली नाही तर तिला अविवाहितच रहावे लागते. ती आपल्या आई-वडिलांजवळ किंवा भावाजवळ रहाते. घर व जमिनीत तिला वाटा मिळत नाही. जर ती आपल्या भावाशी किंवा भावजयीशी भांडली तर तिला वेगळे रहावे लागते व मजुरी करून पोट भरावे लागते या ठिकाणी एकही अविवाहित पुरूष आढळला नाही. त्यांना कशी का होईना नवरी मिळतेच. अविवाहितांना समाजात हीनतेने वागवले जात नाही. सर्व धार्मिक व सामाजिक समारंभात त्यांना भाग घेता येतो.

कौटुंबिक जीवनाचा विचार केल्याशिवाय कोणतीही सामाजिक चर्चा पूर्ण होऊ शकत नाही स्त्रियांच्या दर्जाचा विचार करताना तर हा विचार थोडा विस्तारानेच करावा लागेल.

**कुटुंब :** या लोकात कुटुंब म्हणजे पतीच्या घरी जाऊन राहणे होय. काही ठिकाणी संयुक्त तर काही ठिकाणी विभक्त कुटुंबपद्धती दिसते. घर-जावई होण्याचे प्रमाण फारच थोडे आहे. कुटुंब चालवण्यासाठी स्त्रियांना वेगवेगळ्या भूमिका पार पाडाव्या लागतात.

## स्त्रीचे कुटुंबातील स्थान

बायको म्हणून स्त्रिला महत्वाचे स्थान असते योग्य मोबदला देऊन मिळवलेली एक मौल्यवान मिळकत म्हणून तिला वागवले जाते. स्त्री आपल्या पतीला अग्रमान देते. ती त्याच्यासाठी स्वयंपाक करते, काम करते, पतीसाठी ती काहीही करायला तयार असते.

**सुनेचे कुटुंबातील स्थान :** स्त्रिने आपल्या सासू-सासऱ्यांच्या अपेक्षा पूर्ण करायलाच हव्यातच असे मानले जाते. सुनेने त्यांची आज्ञा मानलीच पाहिजे व त्यांच्यासाठी काम केले पाहिजे असे मानले जाते. फारच क्वचित तिला सासुरवास भोगावा लागतो.



**आईचे कुटुंबातील स्थान :** मातृत्वामुळे स्त्रीला समाजात व कुटुंबात मानाचे स्थान मिळते. तिची जबाबदारीही वाढते. तिच्या कामात भर पडते, पण मुलाच्या भवितव्याविषयी कोणताही निर्णय घेण्याचे तिला स्वातंत्र्य नसते. असे महत्त्वाचे निर्णय घरातला कर्ता पुरूषच घेतो.

**सासूचे कुटुंबातील स्थान :** सुनेकडून तिला मान दिला जातो. घरकामात ती सुनेला मदत करते एकंदर घरातील कारभारावर ती देखरेख करते.

**आजीचे कुटुंबातील स्थान :** आजी म्हणून आपल्या नातवंडांवर योग्य संस्कार करणे त्यांचे समाजीकरण करणे हे तिचे कर्तव्य असते.

अशाप्रकारे कुटुंब हे उत्पादन, उपभोग, वाटप व शिक्षणाचे केंद्र बनते. आणि स्त्री आपल्या पूर्ण शक्तिनिशी त्याचे नियोजन व संयोजन करते.

**शिक्षण :** आधुनिक काळात स्त्रियांच्या औपचारिक शिक्षणाला महत्त्व प्राप्त झाले आहे. येथील शिक्षकांशी आम्ही चर्चा केली. हे शिक्षक या जमातीच्या लोकांबरोबरच रहातात. मुलांना गोळा करणे, पालकांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देणे, संस्कार वर्ग घेऊन त्यांना योग्य सवयी लावणे व त्याचबरोबर क्रमिक अभ्यासक्रम शिकवणे अशा विविध स्तरांवर हे शिक्षक कार्य करताना आढळले. मुलांबरोबर मुलींनाही शिक्षण देण्याबाबत येथील लोक अधिक जागरूक झालेले दिसले. कोकणा स्वत:ला सामाजिक दृष्टीने सर्वात श्रेष्ठ समजतात व आपले श्रेष्ठत्व शिक्षणाच्या बाबतीतही सिद्ध करण्यासाठी ते आपल्या मुलींनाही शिक्षण देतात आणि आपण सर्वच क्षेत्रात पुढारलेले आहोत हे इतरांना दाखवून देतात. वारली लोकांमध्ये सामाजिक व आर्थिक कुवत नसल्याने ते आपल्या मुलांना शाळेत पाठवायला तितकेसे उत्सुक नसतात. त्यामुळे त्यांना मुलांच्या मिळकतीवर बंधने येतात. मुलांना आर्थिक स्वातंत्र्य मिळावे असे त्यांना वाटते. पण मुलींना शिक्षण दिल्याचा फारसा उपयोग होत नाही असे त्यांना वाटते. ठाकूर लोकांबाबतही थोडीफार अशीच अवस्था आहे पण ठाकूर लोक वारल्यांपेक्षा अधिक संपन्न आहेत. त्यामुळे मुलांची किंवा मुलींची इच्छा असेल तर त्याला शाळेत पाठवले जाते. काही ठाकूर लोकांनी मुलांना शाळेत पाठवण्याचे कारण सांगितले की त्यामुळे त्यांना

पोटापाण्यासाठी बाहेरगावी गेल्यानंतर समाजात कसे वागावे बोलावे याचे शिक्षण मिळते.

वावर जवळ एक आश्रम शाळा आहे. तेथे मुलींना रोज १ रु. भत्ता मिळतो पण मुलांना काहीच मिळत नाही. हा पैसा मुलीच्या पालकांना दर ३ महिन्यांनी मिळतो. यामुळे मुलींना शाळेत पाठवण्याला प्रोत्साहन मिळाले आहे. पण मुलांना शाळेतून काढून टाकले जाते.

या लोकांना जगण्यासाठी परिस्थितीशी झगडावे लागते त्यामुळे शिक्षणाला सर्वात कमी महत्त्व दिले जाते.

## राजकीय वर्तुळ

स्त्रियांच्या दर्जाचा विचार करताना राजकीय परिमिताचाही विचार करावा लागतो. जी माहिती गोळा केली गेली त्यावरून स्त्रियांवरची बंधने, सवलती व राजकीय जागरूकतेची कल्पना येते.

पूर्वीच्या व आधुनिक राजकीय क्षेत्रात स्त्रियांच्या सहभागावरून स्त्रियांच्या राजकीय वर्तुळातील स्थानाचे विश्लेषण करता येईल.

पूर्वापार चालत आलेली पंचायत अजून या भागात कार्यरत आहे. गावातील ५ बुजूर्ग व आदरणीय व्यक्ती पंच असतात. ते बहुदा सर्व तंटेबखेडे समज देऊन किंवा आर्थिक दंड देऊन सोडवतात. पंचायतीचा निर्णय चालू असताना स्त्रिया बाहेर जाऊन सुनावणी ऐकू किंवा पाहू शकत नव्हत्या. असे केल्यास त्याच्यांवर कडक टीका होत असे. फक्त काडीमोड घेताना स्त्री भाऊ किंवा वडिलांबरोबर पंचांकडे जाऊ शकत असे. त्यावेळी तिला बोलाचयी परवानगी असे, अन्यथा नाही. आधुनिक काळात मात्र स्त्रियांना आधिक हक्क देऊन त्यांची स्थिती सुधारण्याचा प्रयत्न केला जात आहे.

आम्ही ग्रामपंचायतीच्या नवशी गोतरणा या स्त्री सदस्येला भेटलो. ती ३५ वर्षाची ढोर कोळी जमातीची आहे. कै. सोनू पाटील या काँग्रेसच्या पुढाऱ्याने तिचे नाव सुचवले. नवशीला तिच्या सदस्य म्हणून निवड झाल्याबद्दल विचारले असता तिने फारच मनोरंजक गोष्ट सांगितली. तिच्या कुटुंबाचे समाजात कुणाशीही मतभेद नव्हते. तिचा स्वत:च्या कर्तृत्वावर विश्वास होता पण सुरवातीला तिला राजकीय डावपेचांची काहीच कल्पना नव्हती. स्वत: निरक्षर असल्यामुळे आपल्याला यातले काहीच कळणार नाही अशी तिला भीती वाटत होती. तिच्या नवऱ्याने संमती दिल्यावर तिची उमेदवार म्हणून निवड झाली. थोडे दिवसांनी तिथे जनता दलाची लोकं आली. सुरवातीला त्यांनी नवशीच्या कुटुंबियांना धमकावून, लाच देऊन फुटवण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर तिला कोरतडला सोनू पाटलाच्या घरी नेण्यात आले. सोनू पाटील व त्यांच्या अनुयायांनी नवशीचा प्रचार केला. त्याच सुमारास नवशीला स्त्रियांसाठीच्या राखीव जागांची माहिती मिळाली. मतदानाच्या दिवशी ती गावात परतली. शेजारी, नातेवाईक व गावकऱ्यांच्यात प्रसिद्ध असल्याने व काँग्रेसची उमेदवार असल्याने तिची निवड झाली.

नवशी स्वत: लिहू वाचू शकत नाही. म्हणून ग्रामपंचायतीच्या सभांमध्ये ती आपल्या लोकांच्या समस्या व मागण्यांबद्दल फक्त बोलते. आतापर्यंत तिने दुकानांना परवाना देणे, कौलांची मागणी, गुरेढोरे व वीजपुरवठा यासंबंधीच्या समस्या सोडवल्या आहेत. लोकांच्या सर्व मागण्या ती पुऱ्या करू शकली नाही यामुळे लोक त्रासले आहेत व तिलाच दोष देत आहेत पुढच्या निवडणुकीला आपण उभे रहाणार नाही असेही तिने सांगितले. यावरून तिला किती त्रास होत आहे हे दिसते. ती म्हणाली ''मी जेव्हा सभेला जाते तेव्हा

माझा पूर्ण दिवस वाया जातो. मला तेथे फक्त चहा दिला जातो पण खायला काहीच मिळत नाही. सभेसाठी खूपच लवकर निघावे लागते त्यामुळे मला माझ्या मुलांसाठी फारसे काही करून ठेवता येत नाही. पूर्ण दिवस घराबाहेर राहिल्याने माझी मजुरी बुडते. त्यात ही सभा जर हंगामाच्या दिवसात असेल तर खूपच नुकसान होते. पैसे तर कमी मिळतातच पण उलट लोकांची बोलणी खावी लागतात. गेल्या वेळी आम्ही त्यांना वचन दिले होते पण आता आम्ही स्वतंत्र आहोत म्हणून पुढची निवडणुक लढणार नाही.''

याच वर्गातील नवसू मोर्घा यांच्याशी आम्ही स्त्रियांच्या राखीव जागा व गावातली आजची राजकीय स्थिती याबद्दल विचारले. भाजपाच्या श्रेष्ठत्वावर त्यांचा गाढा विश्वास होता. ते फारच आक्रमक स्वभावाचे होते. त्याच्या मते ''पुरूषच घरचा स्वामी असतो आमच्या बायका आम्ही सांगू ते करायला तयार असतात. स्त्रियांसाठी राखीव जागा असल्याने आम्ही त्यांना निवडून आणतो आणि त्यांच्यातर्फे कमीत कमी पाच वर्षे सत्ता उपभोगतो. स्त्री एकदा निवडून आली की ती पुरूषाच्या बरोबरीची समजली जाते. ती जर हुशार असेल तर स्त्री व पुरूष यांच्या तफावत केली जात नाही.'' अशाप्रकारे जुन्या विचारांत अनुकूल बदल घडून येत आहे.

वावर सारख्या गावात लोक साम्यवादाचे पुरस्कर्ते आहेत. तेथे जीवनात प्रत्येक छोट्या गोष्टीत लोक साम्यवादी व समानतेचे तत्त्व आचरणात आणताना दिसतात.

आम्ही ५० वर्षाच्या अशिक्षित सोनी बुध्या चौधरी या कोकणा जामातीच्या ग्रामपंचायतीच्या स्त्री सदस्येला भेटलो. सोनीची मनोरंजक कथा अशी - गावातील सरपंच, उपसरपंच व गावाबाहेरील काही मोठ्या लोकांनी एका तरूण स्त्री उमेदवाराला निवडले होते. ती स्त्री या सर्व पुरुष सदस्यांबरोबर गावात हिंडत असे. ती स्त्री तरूण सुंदर व आकर्षक असल्याने सरपंच तिच्याकडे आकर्षित झाला. सरपंचाच्या बायकोला वाटले की सरपंचाचा त्या स्त्रीशी विवाहबाह्य संबंध असावा. तिने सर्व गावकऱ्यांसमोर इतर पुरूषांचा पाणउतारा केला. म्हणून या लोकांनी दुसरी स्त्री सदस्य निवडायची ठरवली व ते सर्व वयाने बऱ्याच मोठ्या सोनीकडे आले. सोनीला राजकारणात अजिबात रस नव्हता. ती म्हणाली ग्रामसेवक व इतर सदस्य आवश्यक असेल तेथे तिचा अंगठा घेत असत. पुढच्या वेळी ती निवडणुक लढवणार नाही. ग्रामपंचायतीची लोक घरी येईपर्यंत तिला स्त्रियांच्या राखीव जागांची कल्पनाही नव्हती.

स्त्री व पुरुष गावकऱ्यांना अनेक वेळा नाशिक, पालघर अशा वेगवेगळ्या ठिकाणी कम्युनिस्ट पक्षाच्या सभांना नेले जाते.

## धार्मिक वर्तुळ

स्त्रियांच्या धार्मिक कार्यातील सहभाग, त्यांच्यावरील बंधने, त्यांना मिळणाऱ्या सोयी व हक्क आणि त्यांचे समाजातील स्थान यांचा विचार करावा लागेल.

आधीच्या काही प्रकरणांमध्ये आदिवासी जमातींमधील धार्मिक विधी, त्यातील स्त्रियांचा सहभाग याचे वर्णन आलेच आहे. स्त्रियांना त्यामध्ये दुय्यम भूमिका असते. त्या स्वत: एकट्या कोणतेही धार्मिक कार्य करू शकत नाहीत पण पतीबरोबर सहभागी होऊ शकतात. नैवेद्य तयार करणे व देवाला अर्पण करणे अशी कामे त्या करतात. गावाबाहेर एक लाकडाची मूर्ती बनवलेली असते. त्याला 'मखरा' म्हणतात. स्त्रिया ५ वर्षातून एकदा मखराची पूजा करता. भगताच्या

सांगण्यानुसार ही पूजा केली जाते. गुराढोरांचे पिकाचे व गावाचे संरक्षण व समृद्धीसाठी मखराची पूजा केली जाते. बळी देण्याची स्त्रियांना परवानगी नसते. स्त्रिया कधीही कोंबडे वा बकरे कापू शकत नाहीत. कोकणांमध्ये विधवांना कोणत्याही धार्मिक कार्यात सहभागी होता येत नाहीत. पण इतर दोन जमातीत मात्र असे बंधन नाही.

स्त्रिया म्हाताऱ्या होईपर्यंत म्हणजे मासिकपाळी संपेपर्यंत धर्मप्रमुख, किंवा भगत होऊ शकत नाहीत. त्यानंतरच त्यांना भगत म्हणून तयार केले जाते. म्हणून भगतीणी खूपच कमी असतात. पण या भागात एक मध्यमवयाची भगतीण सापडली.

मृत्यूनंतर 'काज' करण्याचा प्रघात आहे. तिन्ही जमातीत हा संस्कार करण्याचा अधिकार काही वारली स्त्रियांना आहे, त्यांना 'कामडीण' म्हणतात. त्या यावेळी विशिष्ट गाणी म्हणतात.

ढवळारिणीला लग्नाच्या वेळेचे काही विधी करण्याचा अधिकार असतो. ती लग्नाचे वर्णन करणारी गाणी गाते. त्यातून ती देवाला नवरा-नवरीला सुखरूप ठेवण्याची विनंती करते. हा रिवाज फक्त वारली जमातीत आहे. ही भूमिका वंशपरंपरेने चालत नाही. जिला यात रस असेल तिला हा विधी शिकवला जातो.

**दाईची भूमिका** - दाईला आईसारखाच मान दिला जातो. तिला 'सुइरीण माता' म्हटले जाते. तिला मुलाच्या जन्माच्या वेळी, लग्नाच्या वेळी व मृत्युनंतरच्या विधीत सहभागी होता येते. उंबरविहिरला आम्ही ५५ वर्षाच्या दाईला भेटलो. काही वर्षापूर्वी तिने ठाण्याला दाईचे औपचारिक शिक्षण घेतले आहे. ती जेव्हा तरूण होती तेव्हा देवाने स्वप्नात येऊन तिला दाईचे पवित्र कार्य करायला सांगितले. त्यानंतर ती मोठ्या दाईच्या हाताखाली काम करू लागली व तिने बाळंतपणाची कला हस्तगत केली. आता ती मुख्य दाई आहे. व ३-४ स्त्रियांना बाळंतपणाचे शिक्षण देत आहे. तिने शंभर हून अधिक बाळंतपणे केली आहेत. या कामाचा तिला अभिमान आहे. इतर वेळी बाकीच्या बायकांप्रमाणे तीही घरकाम व शेतावरील कामे करते.

## माता व बालकांचे आरोग्य

स्त्रिला जन्मापासूनच प्रतिकूल परिस्थितीला तोंड द्यावे लागते. लहानपणापासूनच लिंगभेदाला सुरूवात होते. आधुनिक जगात विकसनशील देशात असे दिसून आले आहे की नवजात व लहान बालकांच्या मृत्यूचे प्रमाण जास्त आहे. दर हजार पुरुषांमागील स्त्रियांचे प्रमाण कमी होत चालले आहे.

म्हणून माता व बालकांच्या आरोग्यासंदर्भात खालीलप्रमाणे माहिती गोळा केली गेली.

१) स्त्रीचे प्रजोत्पदान चक्र

अ) मासिक पाळी

ब) गर्भारपण - आहार व कामाचे स्वरूप

क) दाईची भूमिका

ड) बाळंतिणीची काळजी - आहार व कामाचे स्वरूप

२) बाळाचे आरोग्य -

अ) बाळाची काळजी

ब) आहार

क) लसीकरण

ड) आजार व मृत्यू विषयक माहिती

कोकणा, ठाकूर, वारली या तिनही जमातीत मुलाचा जन्म व्हावा अशी इच्छा असली तरी सर्व साधारण लोकांच्या मते दोन मुले व दोन मुली असाव्या अशी अपेक्षा असते. मुलाच्या जन्मानंतर जितका आनंद व्यक्त केला जातो तितकाच मुलीच्या जन्मानंतरही केला जातो.

**गर्भधारणा :** ज्या मुलीची मासिक पाळी सुरू झाली आहे ती लग्नानंतर पुरूषाशी लैंगिक संबंध आल्यावर गर्भवती होते. मुलाचा जन्म ही देवाची कृपा मानली जाते. गर्भ म्हणजे प्रथम मांसाचा गोळा असतो. नंतर त्याला हात वा पाय येतात. गर्भ नऊ महिने नऊ दिवस वाढल्याशिवाय सशक्त बाळ जन्माला येत नाही.

**गर्भधारणेची क्षमता :** तेराव्या-चौदाव्या वर्षी मुलीची मासिक पाळी सुरू झाली की ती प्रजोत्पादनास योग्य होते. याला कोकणा धानफूल, ठाकूर-धान व वारली पालवी म्हणतात. जेव्हा मुलीची मासिक पाळी सुरू होते तेव्हा तिला एक लाकडी ओंडका छताचा आधार घेऊन हातात धरायला सांगितले जाते असे केल्याने मासिक पाळीच्या वेळेस रक्तस्राव जास्त होत नाही असा त्यांचा विश्वास असतो. यावेळी कोणताही सोहळा केला जात नाही मुली जेव्हा आपल्या मैत्रिणींबरोबर जंगलात, शेतात किंवा अंघोळीला जातात तेव्हा त्यांना मासिक पाळीची माहिती होते. कधीकधी मोठ्या बायकांच्या चर्चेतून किंवा निरीक्षणामुळेही त्यांना माहिती होते पाळीच्या वेळी कोणतेही खास कपडे वापरले जात नाहीत. पण हल्ली काही स्त्रिया वेगळे कपडे वापरू लागल्या आहेत. ते कपडे ते रोज धुवून परत वापरतात. त्या रोज आंघोळ करतात. पाळी चालू असताना त्या बाजूला बसतात.

मासिक पाळी सुरू होईपर्यंत मुलीला आपल्या सामाजिक भूमिकेची जाणीव झालेली असते. म्हणून हे वय लग्नाला योग्य समजले जाते. त्यावेळी मुलगी १४-१५ वर्षाची असते. पहिली गर्भधारणाही अठरा वर्षाच्या आत होते. आम्ही ज्या स्त्रियांच्या मुलाखती घेतल्या त्यातील बहुतेकांना गर्भपात व मृत मूल जन्माला येण्याचा इतिहास आहे. स्त्रीला जर तीन-चार महिने मासिक पाळी आली नाही तर ती गर्भवती आहे असे समजले जाते. दाईकडून तपासून गर्भारपणाची खात्री केली जाते. हल्ली तिला प्रत्येक प्रसूतीला २५ रु. व पाच बाटल्या दारू दिली जाते.

**दाईची भूमिका - कर्तव्य व जबाबदाऱ्या**

१) ज्या स्त्रीच्या स्वप्नात देवी येऊन तिला सुईणीचे काम करायला सांगते ती स्त्री हे काम करायला सुरवात करते व मोठ्या अनुभवी दाईकडून काम शिकते.

२) पोट तपासून दाई गर्भधारणेची खात्री करते व प्रसूतीची तारीख सांगते.

३) प्रसूतीपूर्वी पोटात दुखू लागल्यास दाईचा सल्ला घेतला जातो.

४) दाई प्रसूती पार पाडते.

५) बाळंतपण झाल्यावर आईची व मुलाची पहिले पाच दिवस काळजी घेते.

६) पाचवीची पूजा करते.

**बाळंतपणापूर्वीची काळजी -**

गर्भवती स्त्री सर्व घरची व शेतीची कामे करते. दाईच्या मते तिने अशी सर्व कामे करावीत त्यात काळजी करण्यासारखे काहीच नाही. नऊ महिने पूर्ण झाल्यावर स्त्री कामासाठी फार लांब जात नाही. ही स्त्री कुठेही तपासणीसाठी जात नाहीत. जर नर्स गावात आलीच तर ती या स्त्रियांना गोळ्या व इंजक्शने देते. (या गावातील ज्या गर्भवती स्त्रियांच्या मुलाखती घेतल्या त्या सर्वांनी

धनुर्वाताचे इंजेक्शन घेतलेले होते.) बाळाला इजा पोहोचू नये म्हणून गर्भारपणाच्या शेवटच्या काही महिन्यात संभोग टाळला जातो.

**बाळंतपण (प्रसूती) -**

प्रसूतीवेदना सुरू होताच दाईला बोलावले जाते, बाळंतपण घरातच होते. घरातही बाळंतपणासाठी खास खोली नसते. साधारणपणे गोठ्या जवळची खोली वापरली जाते. ३ दाई बोलावल्या जातात. एक पोट धरण्यासाठी, एक बाळाला बाहेर काढण्यासाठी व एक नाळ कापण्यासाठी. एकटी दाई पण पूर्ण बाळंतपण करू शकते. गर्भवती स्त्री प्रसूतीच्यावेळी आडवी झोपते किंवा बसते.

साधारणतः दाई प्रसूतीला सुरूवात करण्यापूर्वी दारू पिते. कारण ते काम फारसे आनंदायक नसते. नाळेचा उरलेला भाग काढून टाकला जात नाही. तो नंतर आपोआपच गळून पडतो. हा भाग जर गळून पडला नाही तर तो वर सरकतो व तेथेच चिकटून बसतो त्यामुळे स्त्रीचा मृत्यूही होतो. असे दाईने सांगितले.

**बाळंतपणानंतरची काळजी -**

प्रसूतीनंतर बाळ व बाळंतिणीला आंघोळ घातली जाते. त्यानंतर लगेचच आई बाळाला स्तनपान करते. बाळंतिणीला पहिले पाच दिवस वरईची पेज दिली जाते. काही घरात तांदळाची पेजही दिली जाते. हे अन्न स्तनपान करणाऱ्या मातांसाठी पचायला हलके व पौष्टिक मानले जाते.

पहिले पाच दिवस बाळ-बाळंतिणीला दाईच आंघोळ घालते. त्यानंतर घरातली अनुभवी वृद्ध स्त्री पुढचे पाच महिने अंघोळ घालते. पहिले पाच दिवस बाळ-बाळंतिणीच्या आरोग्याची काळजी घेण्याची जबाबदारी दाईचीच असते.

बाळंतपणानंतर बारा दिवस सोयराचे दिवस मानले जातात. बारा दिवसानंतर पूजा करून स्त्री घरातली कामे करायला लागते. फक्त कोकणा स्त्री महिनाभराच्या विश्रांतीनंतरच काम करायला लागते.

**प्रसूती नंतरचा आहार व इतर बंधने -**

प्रसूतीनंतर एक महिना आहाराचे बंधन असते.

**आहार बंधने :**

१) उडीद डाळ, नागलीची भाकरी, मसालेदार पदार्थ, गूळ यासारखे पदार्थ मर्यादित प्रमाणातच खाल्ले जातात. जास्त खाल्ल्यास बाळाचे पोट बिघडते.

२) कांदा, लसूण, तेलकट पदार्थ, मांस व अंडी कमी प्रमाणात खाल्ले जातात. या पदार्थांमुळे दुधाचा दर्जा कमी होतो व दूध कमी येते.

प्रसूतीनंतर लगेच स्तनपानाला सुरवात होते ते पुढच्या गर्भारपणापर्यंत चालू रहाते. स्त्री बहुदा दोन वर्षांनंतर परत गर्भवती होते. कारण मासिक पाळीचे चक्र पुन्हा सुरु होईपर्यंत एक ते दीड वर्ष लागते. प्रसूतीनंतर दोन महिने संभोग टाळला जातो. त्याआधी संभोग केल्यास स्त्रीचा मृत्यू होतो असा त्यांचा समज आहे.

दुधाचा दर्जा वाढवण्यासाठी जंगली बियांची पांढरी मुळे दिली जातात. गर्भारपणाच्या शेवटच्या काही महिन्यात संभोग केल्याने मृत मूल जन्माला येते असा समज आहे.

**वंध्यत्व :** पुरुषाला वंध्यत्व येत नाही पण मासिक पाळी गेल्यानेही स्त्रीला मूल होऊ शकत नाही. देवाचा कोप किंवा एखाद्याची वाईट नजर हे वंध्यत्वाचे कारण

सांगितले जाते. यासाठी 'शिडवा' हा या सर्वावरील उपाय केला जातो. (वांझपणा, गर्भपात, मृत बाळ जन्माला येणे, अकाली मृत्यु)

**बाळाचे आरोग्य :** बाळ जन्मल्याबरोबर त्याला तेल लावून अंघोळ घातली जाते व दूध पिण्यासाठी लगेच आईकडे दिले जाते. पाचव्या दिवशी पाचवीची पूजा केली जाते. दाई त्याच्या गळ्यात काळा दोरा म्हणजे ताईत बांधते. त्यामुळे मुलाचे वाईटापासून संरक्षण होते असा विश्वास आहे.

कोकणा लोकात एक वर्षानंतर बाळाला मऊ अन्न दिले जाते. तर वारली व ठाकूर जमातीमध्ये मऊ पदार्थ व घट्ट अन्न बरोबरच सुरू केले जाते.

**जमातीनुसार मुलाचा आहार**

| जमात | आहार |
|---|---|
| कोकणा | एक ते दीड वर्ष मऊ अन्न देतात यामध्ये तांदूळ, नागली, गूळ यांचा समावेश असतो. एक वर्षानंतर हळूहळू घट्ट पदार्थ देतात. |
| वारली | वर्षानंतर एकदमच मऊ व घट्ट पदार्थ दिले जातात. |
| ठाकूर | दोन वर्षानंतर एकदमच मऊ व घट्ट पदार्थ दिले जातात. |

सर्व जमातींमध्ये जन्मानंतर लगेचच स्तनपान दिले जाते. मुलाला एक ते दिड वर्षापर्यंत स्तनपान केले जाते.

कोकणा स्त्रियांशिवाय कोणीच स्तनपानासाठी ठराविक वेळ पाळत नाही. दिवसातून ३ वेळा बाळाला अन्न दिले जाते. वारल्यांमध्ये जेव्हा मुलाला भूक लागेल तेव्हा लगेच त्याला खायला दिले जाते.

**लसीकरण -**

नर्सच्या सांगण्यानुसार गावातील सर्व मुलांना अंगणवाडीत गोळा करून लसीकरण केले जाते. मातांच्या मुलाखती घेताना बहुतेक सर्वांना आपल्या मुलांना किती इंजेक्शन्स दिली ते आठवले पण त्याचा उद्देश सांगता आला नाही. गेल्या वर्षी बावर गावात पाच वर्षाखालील बेचाळीस मुलांचा मृत्यु झाला. त्यामुळे यावर्षी लस टोचण्याचे प्रमाण १००% होते. इतर गावातही ८५% लोकांनी लस टोचून घेतली.

**बालमृत्यू -**

१९९३ च्या पहाणीमध्ये चोवीस बालमृत्यू झाल्याचे आढळले याचे मुख्य कारण जुलाब व त्यानंतर येणारा ताप हे होते याबाबतची सविस्तर माहिती आरोग्य विषयक प्रकरणात आली आहे.

जेव्हा कोकणा स्त्रियांना त्यांच्या बाळाला दिल्या जाणाऱ्या अन्नासंबंधी विचारले गेले तेव्हा काहींनी आपण सहा महिने तर काहींनी दीड वर्षानंतर आपण अन्न द्यायला सुरवात करतो असे सांगितले. त्यात ते दुधाची पावडर, चहा, तांदळाची किंवा नागलीची पेज देतात. वारली स्त्रिया सात महिने ते एक वर्ष या दरम्यान बाळाला अन्न द्यायला सुरवात करतात. साधारणतः दोन वर्षापर्यंत आंबील देतात.

या जमातीत मुख्यतः असे फरक आढळतात - कोकणा स्त्रिया वारल्यांपेक्षा जास्त स्वच्छ असतात. त्या अधिक सुधारलेल्या असतात. त्या दूध पावडर, बिस्किटे यासारखे पदार्थ वापरतात यावरून त्यांच्या आर्थिक स्थितीचा कल्पना येते. वारली मात्र मुलांना फक्त आंबील देतात.

● ● ●

# आरोग्य संस्कृती

आरोग्य संस्कृतीमध्ये शरीराबद्दलच्या संकल्पना, स्वच्छता, आरोग्य तसेच आजारविषयक संकल्पना, आजाराची कारणे, त्यावरचे उपाय वगैरे गोष्टींचा अंतर्भाव होतो.

आरोग्य विषयक माहिती गोळा करण्यासाठी मुलाखत प्रश्नावली व मार्गदर्शिकेचा उपयोग केला. मिळवलेल्या माहितीचे पुढीलप्रमाणे वर्गीकरण करता येईल.

१. आरोग्यरक्षणासाठी पर्यावरणाचा उपयोग

२. आरोग्य : संकल्पना आणि वस्तुस्थिती

३. स्वच्छता : संकल्पना आणि वस्तुस्थिती

४. आजार : संकल्पना आणि होणारे मुख्य आजार व त्याबद्दलची माहिती

**आरोग्य रक्षणासाठी पर्यावरणाचा उपयोग -**

मानवाने विविध प्रकारच्या पर्यावरणाशी जुळवून घेतले आहे. निसर्गाची उत्पादनक्षमता आणि त्याचा उपयोग करून घेण्याची मानवाची क्षमता परंतु एक मात्र खरे की आदिवासी व शहरी लोकांच्या आहार व पोषणमुल्यांमध्ये फरक असल्याने त्याचा त्यांच्या स्वास्थ्यावरही परिणाम झालेला दिसतो.

आरोग्य संस्कृतीचा अभ्यास खरोंदा, उंबरविहिर व वावर या तीन आदिवासी गावातून केला गेला. पश्चिम घाटाच्या दुय्यम रांगांमध्ये वसलेल्या या खेड्यांमध्ये वर्षभरात सरासरी १०० इंच पाऊस होतो. पर्जन्यमान भात लागवडीसाठी योग्य असले तरी डोंगर उतारामुळे सलग सपाट जमीन नसल्याने भाताचे उत्पादन कमी होते. 'नागली' हे धार्मिक महत्व असलेले एक महत्त्वाचे पीक आहे. वरई, ज्वारी, खुरासणी (कारळे), भुईमूग, उडीद, तूर यासारखी इतर पिके देखील घेतली जातात. पाण्याअभावी भाजीपाला लावला जात नाही. परसबागेमध्ये केळी, पेरू, शेवगा, रामफळ, आंबा यासारखी फळझाडे असतात, मात्र ही झाडे कधीच सुनियोजितपणे लावली जात नाहीत. या फळझाडांपासूनचे उत्पादन अगदीच नगण्य असते.

येथील आदिवासी आता शिकार तसेच जंगल उत्पादन गोळा करताना दिसत नाहीत. कधी कधी जंगलातील फळे, शेंगा, कंद इ. पदार्थ मुले खाताना आढळतात. जंगलातील 'कडूकंद' हा अन्नाचे दुर्भिक्ष्य असेल तेव्हा सर्वात शेवटचा उपाय म्हणून खाल्ला जातो. जंगलातून कडूकंद आणून सोलून, त्याचे काप करून पाण्यामध्ये रात्रभर भिजवत ठेवतात, त्यामुळे त्याचा कडूपणा कमी होतो. दुसऱ्या दिवशी हे काप शिजवून खातात. काही अत्यंत गरीब वारली कुटुंब घरात काही खायला नसेल तेव्हा कडूकंदाचा वापर करतात.

कधीकधी तित्तर, ससा यांची शिकार अथवा मासेमारी, मोडग्याच्या दिवशी (शेतीच्या कामांना सुट्टी असलेल्या दिवशी) केली जाते. शिकारीतून पोट भरण्यापेक्षा त्यामध्ये करमणूक व खेळाचाच भाग अधिक असतो. शिकार सामूहिकपणे केली जाते व मिळालेल्या शिकारीचा वाटा सर्वांमध्ये विभागून घेतला जातो. या भागातील जंगल कमी होत असल्याने आता शिकारीचे प्रमाणही कमी झाले आहे. उंबरविहिर या गावाच्या आसपासचे जंगल नष्ट झाल्याने शिकार तर सोडाच पण साधे जळणासाठी लाकूड मिळणेही अवघड होऊन

बसले आहे.

या आदिवासी भागामध्ये पशुधन मुबलक प्रमाणात आढळते मात्र या पशुधनाचा उपयोग मुख्य आहार काय पूरक आहार मिळण्यासाठीदेखील होत नाही. येथील बहुतांशी गायी भाकड असतात आणि जरी दूध मिळालेच तरी ते साऱ्या कुटुंबासाठी पुरसे नसते. या आदिवासींचा असा समज आहे की, ''गायीचे दूध वासरासाठी असते, माणसासाठी नव्हे.'' त्यामुळे बहुतेक वेळा कोरा चहाच पिला जातो. कोंबडी अथवा बकरीच्या मटणाचा अंतर्भाव केवळ सण समारंभ, उत्सव अथवा पाहुणचाराच्या वेळेसच केला जातो.

आदिवासींच्या आहारामध्ये मुख्यत्वेकरून नागली व भात तसेच तूर व उडीद इ. धान्यांचाच समावेश असतो. त्यामुळे आहारात लोह, प्रथिने, खनिजे व जीवनसत्वाची कमतरता असते.

गावामध्ये भाजीपाल्याचे उत्पादन होतच नाही. पावसाळ्यात नैसर्गिकपणे येणाऱ्या भाज्यांचा समावेश आहारात केला जातो. जानू गवत्या या उंबरविहीरच्या माणसाच्या सांगण्यानुसार ''आठवड्यातून एखाद दुसऱ्या वेळेसच भाजी खाल्ली जाते. आम्ही जेव्हा जव्हारला जाऊ तेव्हाच भाजी आणतो ; आणि जव्हार तसे बरेच लांब आहे. तसेच आणलेल्या भाज्या टिकण्याचाही प्रश्न आहेच.'' चांभारशेत येथील शेतकऱ्याने पाणी उपलब्ध असल्याने भाजीपाला लावला. मात्र इतरांची जनावरे शेतात घुसल्याने नुकसान झाले. आर्थिक परिस्थितीमुळे शेताला कुंपणे घालणेही शक्य नाही. त्यामुळे त्याला इच्छा असूनही शेतकऱ्यांना भाजीपाला करता येत नाही.

या भागामध्ये शेवग्याची अनेक झाडे आहेत व त्याला शेंगाही भरपूर लागतात. मात्र येथील लोक शेवग्याच्या शेंगांचा आहारात वापर करताना आढळत नाहीत. अन्न-धान्याची कमतरता हे या भागाचे जणू वैशिष्ट्यच आहे. त्यावर मात करण्यासाठी लोक इतर पर्यायी अन्नाचे स्रोत शोधण्याऐवजी धान्य उसने घेणेच पसंत करतात.

आहारात पोषणमूल्यांची कमतरता जरी असली तरी त्याच्या परिणामस्वरूप होणारे आजार मोठ्या माणसांमध्ये आढळून येत नाहीत, मात्र त्यांच्या सडपातळ बांध्यामुळे त्यांच्यात प्रथिनांची कमी आहे हे स्पष्टपणे दिसते. रोख पैशाअभावी बाजारातून कधीतरी मासे अथवा मटण आणले जाते, उंबरविहीरच्या शंकर झिपर मोर्घा यांच्या बोलण्यातून हे स्पष्टपणे जाणवते, ''आम्ही ताजा 'मोरवा' (एक प्रकारचा मासा) आणून खाल्ला तर आमचे पोट बिघडते कारण आम्हाला असं कधी खायची सवयच नाही.'' याउलट चित्रही पहायला मिळाले. एका गावाच्या सरपंचाचे व्यवस्थित बांधलेले घर, स्वत:च्या मालकीची गिरणी, दुकान, स्वत: ठेकेदारीचे काम करतो परंतु त्याचा मुलगा वरण, आमटी अथवा इतर कालवणाशिवाय केवळ नुसताच भात खाताना आढळला.

या लोकांच्या, रक्त निर्माण करणारे पदार्थ, शरीराची ताकद वाढवणारे पदार्थ अशा कोणत्याही समजूती नाहीत. ''जे काही शेतात पिकते तेच आम्ही खातो'' असं त्यांचं म्हणणं. काही लोक कडधान्यांना मोड आणून उसळ करून खातात पण इतरांना ते माहित नाही. इथली लोकं जेवणं आणि न्याहारी यामध्ये काहीही भेदभाव करत नाहीत. अन्नधान्य जेव्हा मुबलक उपलब्ध असते त्यावेळेस ३ वेळा खातात. सकाळी शेतावर जायच्या आधी न्याहारी व दुपारी जेवण. यामध्ये नाचणीची भाकरी, चटणी व उडदाची आमटी या पदार्थांचा समावेश असतो. रात्री भात व डाळ (आमटी) असे जेवण असते. कुटुंबातील सर्वजण एकत्र बसून

जेवतात.

या लोकांची जेवणाची संकल्पना आपल्यापेक्षा अत्यंत वेगळी आहे. ''तुम्ही किती वेळा जेवता ?'' असे विचारले की ''फक्त रात्रीच.'' असे उत्तर येत असे. अधिक चौकशी केली असता समजले की जेव्हा आपण भात खातो ते खरे 'जेवण' असते. सकाळी व दुपारी केवळ भाकरी खात असल्याने त्यावेळच्या खाण्याचा जेवणात अंतर्भाव केला जात नाही.

**शरीराबद्दलच्या संकल्पना -**

शरीर कसे तयार होते ? ते कोण बनवतं ? कशापासून तयार होतं ? यासारख्या प्रश्नांची उत्तरे लोकांना देता आली नाहीत. काही लोकांनी मात्र अतिशय चांगली उत्तरं दिली-

गर्भ मातेच्या शरीराबाहेर केव्हा येतो ? या प्रश्नाचे उत्तर देताना शंकर मोर्घा म्हणाला ''गर्भाची संपूर्णपणे वाढ झालेली असली पाहिजे. अपुरी वाढ झालेला गर्भ कसा बाहेर येऊ शकेल ?'' बाळाला श्वास घ्यायला हवा कोठून मिळते ? या प्रश्नावर सांगितले. ''देवानं नक्कीच काहीतरी 'आयडिया' केली असली पाहिजे. त्यामुळेच बाळाला आईचा श्वास मिळत असेल.''

मृत्युनंतर माणसाचे काय होते हे सांगताना शंकर म्हणाला ''मृत्युनंतर पुनर्जन्म असतो. मृत्युनंतर मेलेला पुरुष किंवा स्त्री देवाकडे जाते आणि चेहरा व आवाज बदलून पुन्हा जन्म घेते.''

उंबरविहिरच्या यशवंतने स्त्रियांच्या मासिक पाळीच्या वेळी होणाऱ्या रक्तस्त्रावाबद्दल सांगितले ''पाळीच्या वेळी येणारे रक्त हे नेहमीच्या रक्तासारखेच असले तरी त्यामध्ये थोडा फरक असतो.''

जेव्हा मुलीला पाळी सुरु होते त्यावेळेस ती वयात आली असे समजले जाते.

स्त्री गर्भवती कशी रहाते हे सांगताना तो म्हणाला, ''जेव्हा पुरुष व स्त्री एकत्र येतात त्यावेळेस स्त्रीला पुरुषाकडून वीर्य मिळते व गर्भ जन्माला (अस्तित्वात) येतो. वीर्य हे पाण्यापासून बनलेले असते.

झाडाची वाढ चांगली होण्यासाठी जशी पाण्याची गरज असते. त्याचप्रमाणे शरीर निरोगी रहाण्यासाठी मातेला अन्नाची गरज असते. आपण खाल्लेल्या अन्नाचे केवळ मळात (घाणीत) रूपांतर होते.''

स्तनपानाबद्दल यशवंत म्हणाला, ''आम्ही मूल जन्मल्या जन्मल्या बाळाला आईचे दूध पाजतो. पण नुकताच मी जव्हारच्या कुटिर रुग्णालयात गेलो होतो. तेथे मी पाहिले की डॉक्टर लोक बाळाला दिवसभर आईचे दूध पाजू देत नाहीत आणि मला असे वाटते की आम्ही जे काही करत आहोत ते चुकीचे आहे. कारण डॉक्टर लोकं शिकलेली आहेत आणि आम्ही अडाणी.'' डॉक्टर लोक असं का करत असतील ? या प्रश्नावर तो उत्तरला ''दिवसभराच्या विश्रांतीमुळे बाळाची पचनक्रिया स्थिरावण्यास मदत होत असेल.''

शरीराच्या बाहेर मूल तयार करणे शक्य आहे का? या प्रश्नावर त्याने सांगितले ''मला तसं काही माहित नाही. मात्र सरकार काहीतरी असे 'मशिन' शोधून काढेल की ज्यामुळे शरीराच्या बाहेर मूल तयार करणेसुद्धा शक्य होईल.''

**लैगिंक ज्ञान**

बहुतेक मुलींना विवाहापूर्वी शरीरसंबंधांबद्दल माहिती नसते. मुलांना मात्र याबाबत बरेच ज्ञान अवगत असते व त्यासंबंधीची चर्चा मित्रपरिवारामध्ये होते; अनुभव सांगितले जातात. हल्लीच्या काळात मुलींनाही

थोडी थोडी माहिती विवाहापूर्वी असते.

विवाहानंतर लगेचच शरीरसंबंध येत नाही. विवाहानंतरचा एक महिना नवरा नवरी एकमेकांना समजून घेण्याचा प्रयत्न करतात. बरेच वेळा पतीने जर का पत्नीच्या संमतीशिवाय संभोग करण्याचा विवाहानंतर लगेच प्रयत्न केला तर पत्नी आपल्या माहेरी पळून जाते. सर्वसाधारणपणे आठवड्यातून २-३ वेळेला संभोग केला जातो. प्रसूतीनंतर एक ते दोन महिने शरीरसंबंध ठेवण्यास परवानगी नसते. पाळी चालू असताना संभोग केला जात नाही. संभोगाची मागणी पतीप्रमाणेच पत्नीकडूनही केली जाते.

मुलामुलींना शरीर संबंधाबद्दलचे ज्ञान मित्रमैत्रिणींकडूनच मिळते. क्वचितच पालकांकडून याबाबतीत मार्गदर्शन केले जाते. उंबरविहिरच्या तरूणांनी मित्र परिवाराबरोबर चित्रपटांमुळेही आपल्याला याबाबतीत ज्ञान मिळाल्याचे सांगितले.

महिला आणि वृद्ध लोक या नाजूक विषयावर बोलायला तयार नव्हते. एका म्हाताऱ्याची प्रतिक्रिया फार बोलकी आहे. ''या असल्या गोष्टींचे ज्ञान मुलांना कशाला द्यायला पाहिजे? देवाने प्रत्येकाला बुद्धी दिली आहे आणि जो तो आपल्या कुवतीप्रमाणे याबाबतीत ज्ञान मिळवतोच.''

**आरोग्याची संकल्पना**

'आरोग्य' ही एक सापेक्ष संकल्पना आहे. निरोगी शरीर असणे आणि स्वत:ला निरोगी आहोत असे वाटणे या दोन कल्पना प्रत्येकवेळी जुळतीलच असे नाही. वैद्यकशास्त्राच्या शारीरिक मोजमापांच्या मानदंडानुसार जव्हार भागातील आदिवासी कमी वजन असलेल्यांच्या गटात मोडत असतीलही परंतु त्यांच्या आरोग्याचा दर्जा खालावलेला आहे असे म्हणता येणार नाही. सडपातळ बांधा, कातडीखालील चरबीचा अभाव, कमी वयातच म्हातारपणाच्या खुणा दिसणे या सर्व गोष्टी आहारामध्ये जीवनसत्व व खनिजांची कमतरता दर्शवतात. या आदिवासींमध्ये घेतला जाणारा आहार व केले जाणारे काम यांचे समीकरण जवळजवळ जुळते. वैद्यकशास्त्रानुसार ही परिस्थिती धोकादायक असली तरी एकूण सामाजिक व सांस्कृतिक बाबींचा विचार करता सभोवातलच्या पर्यावरणाशी जुळवून घेण्याच्या प्रक्रियेमधून आदिवासींच्या शरीराची ठेवण तयार झाली असावी.

डार्विनच्या उत्क्रांतीवादाचा आदिवासींच्या आरोग्याशी संबध लावता येऊ शकेल. तरूण व पाच वर्षाखालील मुलांच्या आरोग्याची तुलना केली असता असे आढळून येते की पाच वर्षाच्या आतील मुलांना जुलाब, ताप व अन्य आजार होण्याचे प्रमाण खूप आहे. या उलट तरूण व वृद्ध लोकांमध्ये हेच प्रमाण अत्यल्प आहे. आदिवासींमध्ये, ज्या लोकाच्यांत अनुवांशिकतेने प्रतिकारशक्ती व कणखरपणा आलेला असतो अशीच मुले तारूण्यात प्रवेश करतात तर इतर त्याआधीच मृत्युमुखी पडतात. यामुळे विशिष्ट अशी जीवनपद्धती जगण्यासाठी त्यांचे शरीर तयार झालेले असते.

अठरा ते पस्तीस वर्षाच्या तरूणांमध्ये स्नायू मजबूत असल्याने पिळदार देहयष्टी तयार झाल्याचे दिसते.

या लोकांमध्ये देखील आरोग्याची संकल्पना काम करण्याच्या क्षमतेवर अवलंबून असल्याचे दिसले. जो काम करू शकत नाही तो आजारी असल्याचे समजले जाते. मात्र ही संकल्पना केवळ पुरुषांच्या बाबतीत लागू पडते.

महिलांच्या आरोग्याबाबत स्पष्ट संकल्पना असल्याचे

आढळले नाही. उंबरविहिर येथे प्रशिक्षित दाईच्या सांगण्यानुसार सतत लागोपाठ मुले होत गेली तर त्या स्त्रीच्या दृष्टीने हे घातक असते व त्या स्त्रीच्या आरोग्यावर परिणाम होऊन तिची प्रकृती खालावत जाते.

निरोगी मुलाबद्दलची संकल्पना - जेव्हा मूल व्यवस्थितपणे खात असते, हसत खेळत असते, त्याला आजार नसतो असे मूल निरोगी असते व त्याची वाढ योग्य प्रकारे होत आहे असे समजावे. अशा मुलाबद्दल काळजी करण्याचे काहीही कारण नसते.

**स्वच्छता**

स्वच्छतेचा विचार मुख्यत्वेकरून तीन पातळींवर केला पाहिजे.

१. गावपातळीवरील स्वच्छता

२. घरातील स्वच्छता

३. वैयक्तिक स्वच्छता

## १. गावपताळीवरील स्वच्छता

आजार व साथीचे रोग आणि स्वच्छता यांचा परस्पर थेट संबंध आहे. आणि हा संबंध तपासून पाहण्यासाठी पाण्याचा स्त्रोत व त्याच्या आजूबाजूच्या परिसराची स्वच्छता या गोष्टींचा विचार केला पाहिजे.

खरोंदा गावामध्ये पाण्यासाठी विहीर व हातपंप असे दोन स्त्रोत आहेत. पिण्याच्या पाण्यासाठी विहिरीचाच वापर केला जातो. विहिरीचे पाणी आटल्यावरच हातपंपाचा वापर केला जातो. हातपंप जरी गावाच्या जवळ असला तरी त्याचा वापर नाईलाजाने केला जातो. लोकांच्या म्हणण्यानुसार पंपाला गंज चढला असल्याने गढूळ पाणी येते.

उंबरविहिर गावामध्ये दोन बांधलेल्या विहिरी आहेत.

दोन्ही गावांमध्ये विहिरीमधील पाण्याची शुद्धता करण्यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्राने स्थानिक माणसांवर जबाबदारी सोपविली आहे. त्यांच्याकडे टीसीएल पावडरचा साठाही देण्यात आला आहे. त्यांनी रोजच्या रोज विहिरीमध्ये टीसीएल पावडरीची ठराविक मात्रा वापरून पाण्याची शुद्धता करणे अपेक्षित आहे. मात्र पाण्याची शुद्धता तपासली असता. पाण्यात टीसीएल टाकल्याचे आढळले नाही.

विहिरीतील पाणी शुद्ध करण्याकरता टीसीएल पावडरचा वापर केला जातो हे सर्व लोकांना माहिती आहे.

वावर गावात पाण्यासाठी बांधलेली विहीर नाही तर चांभारशेत गावातील लोक उन्हाळ्यामध्ये नदीच्या पात्रात खड्डा खणून पाणी पिण्यासाठी वापरतात.

या गावामधील एकंदरीत स्वच्छता नजरेत भरण्यासारखी आहे. ग्रामीण भागातील खेडेगावांपेक्षा आदिवासी भागातील खेडी अत्यंत स्वच्छ असतात. माणसांची अथवा जनावरांची विष्ठा कोठेही आढळून येत नाही. नीट निरीक्षण केले असता केवळ जुलाबाने आजारी असलेली अथवा गावाबाहेर, शेतात जाण्यास तयार नसलेल्या मुलांचीच विष्ठा गावात आढळली.

खरोंदा गावातील स्वच्छता वाखाणण्यासारखी होती. घराभोवती कुठेही केरकचरा आढळला नाही. केरकचरा ठराविक ठिकाणीच गावाच्या बाहेर टाकला जातो. जैविक कचऱ्याचा वापर खत तयार करण्यासाठी केला जातो. सांडपाण्याचा निचराही व्यवस्थितपणे केला जातो. केवळ एका घराभोवती सांडपाणी साचून शेवाळ साठल्याचे दिसले. ते घर बिगर आदिवासी दुकानदाराचे होते.

उंबरविहिर गाव बाहेरच्या जगाच्या संपर्कात आल्याने तसेच योग्य नियोजनाअभावी घडत असलेल्या अनियंत्रित बदलांमुळे तेथे गावपातळीवर अस्वच्छता दिसू लागली आहे. प्रत्येकजण आपआपले अंगण स्वच्छ ठेवत असला तरी केरकचरा मात्र रस्त्यावरच टाकला जातो.

वावर या गावामध्येदेखील लोकांच्या उदासीनतेमुळे तसेच प्रभावी राजकीय नेतृत्वाअभावी अस्वच्छता आढळली.

आदिवासी जमातींमध्येदेखील परिसर स्वच्छतेच्या बाबतीत फरक असल्याचे आढळले. कोकणा जमातीतले लोक वारली व ठाकूर लोकांपेक्षा स्वच्छतेबाबत अधिक जागरूक असल्याचे दिसले. कोकणा लोकांचे प्राबल्य असलेल्या खरोंदा गावाची वावर या वारली जमातीच्या गावाशी तुलना केली असता हा फरक ठळकपणे दिसून येतो. गावपातळीवरील स्वच्छता ही प्रामुख्याने लोकांचे गावाबद्दल असलेले प्रेम, जागरूकता, जाणीव तसेच विकास प्रक्रियेच्या ओघात होणारे काही सामाजिक बदल यांच्याशी निगडीत आहे.

प्राथमिक आरोग्य केंद्रातल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांची आदिवासी व त्यांच्या स्वच्छतेसंदर्भातील प्रतिक्रिया आपल्याला सरकारी सेवकांचा आदिवासींकडे बघण्याचा दृष्टीकोन कसा असतो हे दर्शविते. ''ही लोकं अत्यंत निष्काळजी आहेत. कुठंही खातात कुठंही पितात आणि आजारी पडलं की मग आम्हाला त्रास द्यायला (प्राथमिक आरोग्य केंद्रात) येतात.''

## २. घरातील स्वच्छता

येथील बहुतेक सर्व घरांची रचना सारखीच असते. घराच्या भिंती कारवीच्या असतात व त्यावर चिखल व शेणाने लिंपण केलेले असते. जमीन मातीचीच असून दर आठवड्याला शेणाने सारवतात. घराला खिडक्या अजिबात नसतात. घराच्या आतल्या बाजूलाच कारवीच्या भिंती घालून स्वयंपाक घर तयार केलेले असते. सूर्यप्रकाश घरात येण्यासाठी छपरावरची दोन तीन कौले काढलेली असतात.

घरामध्ये जनावरे बांधली जातात. दररोज शेण उचलले जाते तर जनावरांच्या मूत्राचा निचरा जमिनीला उतार देऊन भिंतीला असलेल्या भोकातून वाट देऊन घराबाहेर केला जातो. घराला दोन दारे असतात. एक माणसांसाठी तर दुसरे गोठ्याच्या बाजूला जनावरांसाठी. जनावरे घरातच बांधण्याच्या पद्धतीबद्दल विचारले असता श्री. महाले यांनी संगितले की ''ही आमची पाळीव जनावरे आहेत. आपल्या सारखीच त्यांनाही थंडी वाजते, पावसाळ्यात पावसापासून संरक्षण होते, त्यांना शेकोटीची ऊब देखील मिळते. ही जनावरं आमच्या कुटुंबाचाच एक भाग आहेत त्यांना घरात ठेवल्याने सुरक्षित रहातात. त्यांना घरात ठेवल्याने आम्हाला घाण वाटत नाही. ही गायीगुरं केवळ गवत व अन्य झाडपाला खात असल्याने त्याचं शेण वाईट नसतं.''

गायीगुरं घरामध्ये ठेवणे हा या आदिवासींच्या जीवन संस्कृतीचाच एक भाग बनला आहे. त्यामुळे ही सवय बदलणे कठीण आहे. उंबरविहिर येथील यशवंत घराबाहेर जनावरं ठेवत असल्याने अन्य लोक त्याच्यावर नाराज आहेत. त्याबद्दल बोलताना लासू डोके म्हणाला ''जनावरं ही आपल्यासारखीच असतात. त्यामुळे आपण जसं रहातो तसंच त्यांनाही ठेवलं पाहिजे. यशवंतानं गायीगुरांना (घराबाहेर ठेवून) दुखावलं आहे त्यामुळे त्याला जेव्हा बैलांची गरज लागेल तेव्हा

गावातील कोणीही बैल देणार नाही.''

घरांमध्ये कोंबड्या मात्र मुक्तपणे हिंडताना दिसल्या. अपुऱ्या उजेडामुळे कोंबड्यांची विष्ठा दिवसासुध्दा दिसू शकत नाही.

लोकांनी सांगितले की माश्या कुठंही घाणीत बसतात व नंतर त्याच माश्या अन्नपदार्थांवरही बसतात. आपण असे अन्न खाल्ले तर आपल्याला ''झाडावांत्या'' होतात. म्हणून आम्ही अन्नपदार्थावर माश्या बसणार नाहीत याची काळजी घेतो.

या भागातील लोकांना घरामध्ये कुठेही थुंकण्याची सवय असल्याचे आढळून आले. मात्र येथील महिला घरात पडलेली कुठलीही घाण, केरकचरा उचलण्याच्या बाबतीत तत्पर व जागरुक असल्याचे दिसले.

एकंदरीत पहाता घरामध्ये स्वच्छता राखली जात असली तरी लोकांमध्ये निष्काळजीपणा असल्याचे दिसून आले.

पिण्याच्या पाण्याची साठवण करताना मात्र काळजी घेतली जाते. माठ, पितळयाच्या किंवा स्टीलच्या हंड्यामध्ये पाणी भरुन त्यावर झाकण ठेवतात. हंड्यातून पाणी काढण्यासाठी व पिण्यासाठी वेगवेगळी भांडी असतात. पाण्यामध्ये धूळ, घाण, केरकचरा, कीटक पडून पाणी दूषित होऊ नये यासाठी काळजी घेतली जाते. दूषित पाणी पिल्यास ''झाडावांत्या'' होऊ शकतात किंवा इतर आजार उद्‌भवतात अशी माहिती लोकांनी सांगितली. पिण्यासाठी अयोग्य पाणी कुठले? या प्रश्नाला उत्तर देताना सांगितले की ज्या पाण्यामध्ये घाण पडली आहे, घाण वास येत आहे, त्याचा रंग बदलला आहे असे पाणी पिण्यास अयोग्य असते.

लोकांना पाणी उकळणे, फडक्यातून पाणी गाळून घेणे या पाणी शुद्‌धीकरणाच्या पद्‌धती माहिती आहेत. तरी प्रत्यक्षात आम्ही केवळ डॉक्टरांच्या सांगण्यावरुनच पावसाळ्यात पाणी उकळून पितो असे प्रांजळ मत लोकांनी व्यक्त केले.

स्वयंपाकघरातील पाणी घराबाहेरच सोडले जाते, काही घरातून मात्र या पाण्याचा वापर परसबागेसाठी केल्याचे दिसले.

## ३. वैयक्तिक स्वच्छता

सर्वसाधारणपणे वैयक्तिक स्वच्छता पाळली जात नसल्याचे आढळले. ही गोष्ट लहान मुलांच्या बाबतीत प्रकर्षाने जाणवली. काही लोक रोज नियमितपणे तर बरेचसे लोक २-३ दिवसांनी आंघोळ करतात. आंघोळीसाठी साबणापासून दगडापर्यंत विविध साधनांचा वापर केला जातो. चांभारशेतच्या वांगणपाड्यामध्ये मुलीला आंघोळ घालताना चिकणमातीचा वापर केल्याचे आढळले. लहान मुलांना दिवसातून दोन वेळा कोमट पाण्याने आंघोळ घातली जाते. मुलं व मुली आंघोळीसाठी नदीवर जातात. पुरुष मंडळी शेतावरुन काम करुन आल्यावर संध्याकाळी आंघोळ करतात. खाण्यापूर्वी मुले हात धुताना आढळली नाहीत.

''नखं नियमितपणे कापली नाहीत तर त्यात मळ साचून खाताना पोटात गेल्यास त्यापासून आजार होऊ शकतात. त्यामुळे आम्ही दर ८-१० दिवसांणी खुरप्याने नखं कापतो'' असे नवसू मोर्घाने सांगितले. लोकांना डोक्यात होणाऱ्या ऊवांबद्दल माहिती आहे व त्यांना मारण्यासाठी वनौषधी वापरतात.

येथील लोक दात घासण्याकरता मिश्री, चुलीतली राख अथवा दोन्हीच्या मिश्रणाचा वापर करतात. कधीकधी आंब्याच्या काड्यांचादेखील उपयोग केला जातो.

गावातील लोक प्रात:र्विधीसाठी गावाबाहेर

असलेल्या टेकड्यांवर अथवा जंगलामध्ये जातात. स्वच्छतेसाठी झाडाचे पान किंवा दगडाचा वापर करतात. काही मोजकेच लोक परत आल्यावर हात पाण्याने अथवा साबण लावून धुतात. मजुरीसाठी शहराशी संपर्क येत असल्याने लोकांना संडास माहिती आहेत. संडास बांधून दिले तर वापरणार का ? असा प्रश्न विचारला असता लोकांमध्ये मतभिन्नता आढळली. वावरचा लहानू म्हणाला ''या इथं एवढी जागा आहे, आम्ही कशाला संडास वापरु ? शहरातल्या लोकांना अशी मोकळी जागाच नसते त्यामुळे त्यांना संडासाचा वापर करावा लागतो.'' दुसरा तरुण म्हणाला ''पुरुष जेथे प्रातर्विधी करतात त्याच जागेवर स्त्रियांना जायला आवडत नाही. मात्र संडास बांधले गेले तर बरं होईल. आमच्या घरापाशीच सोय होईल आणि आम्हाला एवढ्या लांब जंगलात जावे लागायचे नाही.''

जंतांबद्दल या भागामध्ये माहिती असल्याचे दिसले. जेव्हा केव्हा शौचामध्ये जंत दिसतात तेव्हा डॉक्टरकडे जाऊन लगेच उपचार घेतले जातात कारण त्यांना जंत आरोग्यास हानीकारक असून व त्यामुळे आजार उद्‌भवतात हे माहिती आहे.

स्त्रियांची मासिक पाळी चालू असताना त्यांना सणसमारंभातून भाग घ्यायला मज्जाव करण्याचा आणि स्वच्छतेच्या संकल्पनेचा संबंध आहे की नाही हे सांगणे कठिण आहे. उंबरविहिरचा यशवंत म्हणाला ''स्त्रीची मासिक पाळी चालू असताना आम्ही शरीरसंबंध ठेवत नाही कारण त्यामुळे पुरुषांना आजार / रोग होऊ शकतो'' यावरुन असे दिसते की मासिक रक्तस्त्राव आणि अस्वच्छता यांचा संबंध असल्याचे लोकांना वाटते.

**व्यसने** - दारु, तंबाखू व विडी या सवयी लोकांना असल्याचे दिसते. यापैकी दारुचे उत्पादन स्थानिक पातळीवरच होते तर विडीसाठी लागणारी आपट्याची पाने जंगलातून मिळतात. तंबाखू मात्र विकत घ्यावी लागते.

पुरुष आणि स्त्रियादेखील दारू पितात. उंबरविहिरपेक्षा वावर गावामध्ये दारू पिणाऱ्या स्त्रियांची संख्या जास्त आहे. काळा गूळ आणि नवसागरापासून दारू गावातच बनविली जाते. दारू तयार करणे हा येथील लोकांचा एक नित्यक्रमच होऊन बसला आहे.

या सर्व सवयी वाईट असल्याचे लोकांना माहित असले तरीही या सवयी सोडणे अवघड असल्याचे लोक सांगतात. तंबाखू तसेच विडी सतत ओढल्याने सतत खोकला येऊ शकतो. श्वसनमार्गाचे आजार होऊ शकतात किंवा टी. बी. पण होऊ शकतो. दारू जास्त पिली तर शरीराची शक्ती कमी होते आतड्याचे आजार होऊ शकतात व माणसाची प्रकृतीच खालावते. अशी माहिती लोकांनी सांगितली.

या पदार्थांच्या सवयीमुळे शरीरावर होणाऱ्या दुष्परिणामाची कल्पना लोकांना अजिबातच नाही. दारूमुळे होणारे मानसिक व सामाजिक आरोग्यावरचे परिणाम मात्र त्यांना माहित आहेत. व्यसनांबद्दल बोलताना शंकर म्हणाला '' जेव्हा मी विडी पित नाही त्यावेळेस माझे पोट घट्ट होते. दर तासा दोन तासाने विडी पिली तर काहीच त्रास होत नाही'' दारु बद्दल त्याने सांगितले ''जे लोक दारु पितात ती मोठ्या माणसांबरोबर, बायकोबरोबर भांडतात, रागाच्या भरात दगड घालून दुसऱ्याचा खूनही करु शकतात. अशी लोक बऱ्याच भानगडी करतात आणि शेवटी आत्महत्या करतात'' मग माणसं दारु का पितात ? यावर तो उत्तरला ''जेव्हा तुम्ही पिता त्यावेळेस बऱ्याच गोष्टी तुमच्या लक्षात रहातात दारु शिवाय जगणं कठिण आहे.

दारु ही जरी वाईट असली तरी शरीरावर त्याचे काहीच दुष्परिणाम होत नाहीत. एका वेळेला ४-५ बाटल्या दारु पिणे पुरेसे आहे. आता तर लोक तालुक्याहून बियर सुद्धा आणायला लागले आहेत. ही दारु नेहमीपेक्षा दुपटीने कडक आहे.''

वारली लोकांचे प्राबल्य असलेल्या बेहेडपाडा- वावर येथे तर दारुच्या समस्येने उग्र रुप धारण केले आहे. दिवसा रात्री कधीही लोक दारुच्या अंमलाखाली असल्याचे दिसते. दारुचे उत्पादन आणि सेवन अखंडपणे चालू असते. या लोकांना स्वत: घरी दारु तयार करण्याची परवानगी असल्याने समस्या अधिक तीव्र बनली आहे.

येथील शिक्षकांच्या सांगण्याप्रमाणे कुटुंबाची गरिबी हे देखील दारु पिण्याचे महत्त्वाचे कारण आहे. घरात काही खायला नसले की दारु पिऊन भूक मारायची. नवरा बायको स्वत: तर दारु प्यायचेच पण मुलांनाही पाजायचे. २-३ वर्षापूर्वीपर्यंत मुलं शाळेत दारु पिऊन यायची. पण आता हळूहळू परिस्थिती बदलत आहे.

**आजार विषयक संकल्पना**

लोकांच्या आजार विषयक संकल्पनांमध्ये खूप मतभिन्नता आढळून आली. उंबरविहिरच्या शंकरच्या मते ''रोग कुठल्याही प्रकारचा असू शकतो. कधीकधी त्यातून गंभीर परिणाम उद्भवू शकतात. एकदा माझ्या मोठ्या भावाने कंत्राटदाराने दिलेले कलिंगड खाल्ले आणि त्याचे पोट फुगले. आम्ही नानाविध उपचार केले परंतु त्याचा मृत्यु झाला. बायकांशी अनैतिक संबंध ठेवल्यामुळे झालेल्या रोगामुळे काहींनी आत्महत्या सुद्धा केली आहे. पिण्याच्या पाण्याबद्दल बोलायचे झाले तर ग्रामपंचायतीचा शिपाई किंवा पोलिस पाटील विहिरीमध्ये औषधे टाकतात. जर तुम्ही अशुद्ध पाणी पिलेत तर त्यामुळे केवळ जुलाबच होऊ शकतात. जुलाबावर योग्य वेळी डॉक्टरकडे जाऊन उपचार न घेतल्यास मरणसुद्धा ओढावू शकते.'' त्याने पुढे सांगितले ''पाण्यामध्ये जंतू असतात. जंतू म्हणजे अगदी छोटे प्राणी जे आपल्या उघड्या डोळ्यांनीही दिसू शकत नाहीत. अगदी सरकारला सुद्धा दिसू शकत नाहीत. पण सरकारने जंतू शोधून काढण्यासाठी व त्यांना मारण्यासाठी काहीतरी युक्ती शोधून काढली असली पाहिजे. म्हणून मी भगताकडून उपचार करून न घेता डॉक्टरकडे जातो.''

बुध्या जीवा चिबडे आजाराबाबत बोलताना म्हणाला, ''आमचा डॉक्टरबद्दलचा अनुभव चांगला आहे. कॉलऱ्यामुळे जुलाब होतात. अशा वेळेस रक्ताचे पाण्यात रुपांतर होते. आणि शरीर थंड पडते. जर संध्याकाळी जुलाब सुरू झाले तर दुसऱ्या दिवशी सकाळपर्यंत माणूस खलास होतो. डॉक्टर रक्तामधून सलाईन देतो. त्यामुळे आजाऱ्याला वाचवता येते.'' यावरून असे दिसून येते की बुधा चिबडेच्या आजारविषयक संकल्पना वैद्यकशास्त्राशी मिळत्या जुळत्या आहेत.

जीवा नवश्याने मात्र वेगळेच मत व्यक्त केले. त्याच्या सांगण्यानुसार आजारी व्यक्ती २-३ दिवस काहीही न खाता काम करत राहिली तर त्याच्या घरच्यांना काळजी वाटते. यावरुन आजारामुळे काम करण्यात कोणतीही बाधा येत नाही असे प्रतित होते.

नवसू मोर्घाने सांगितले ''नखात अडकलेला मळ पोटात गेला तर आजार होतो. कधी कधी लोकांच्या अंगावर चट्टे, डाग उठतात पण हा आजार नसतो. आजार हा 'पित्ती' या रोगासारखा असतो. आपण जर का ताज्या भाज्या खाल्ल्या नाहीत तर जुलाब व ताप यासारखे आजार उद्भवतात. माश्यांमुळे देखील आजार फैलावतात.''

लासू डोके, उंबरविहिर याने कॅन्सरबद्दल माहिती

दिली, ''कॅन्सर या आजारात गाठ तयार होते. सुरूवातीला अतिशय लहान गाठ असल्याने अजिबात दुखत नाही. जेव्हा ही गाठ मांसापसून वाढत जाऊन हाडापर्यंत पोहोचते तेव्हा डॉक्टरसुद्धा काही करू शकत नाहीत. बहुतेक वेळा शरीरातील पोकळीमध्ये ही गाठ तयार होते.''

बेहेडपाड्याच्या बारकू या वारली भगताच्या सांगण्यानुसार, स्वत:चा धर्म न पाळल्याने देवाचे न ऐकल्याने तसेच कधीकधी भूतपिशाच्च्यांच्या इच्छा पूर्ण न केल्याने आजार होतात. आजारी माणूस बारीक दिसतो तसेच सामान्य माणसापेक्षा हळू चालतो.

याशिवाय लोकांनी आजार होण्याची इतर अनेक कारणे सांगितली.

१. रक्तामध्ये काही बदल अगर दोष निर्माण झाला तर

२. दरवर्षी देवाची पूजा केली नाही. दारू व कोबडं दिलं नाही तर कुटुंबातील व्यक्तीला आजार होतो.

३. एखाद्या माणच्या शरीरात देव किंवा भूताने प्रवेश केला तर तो माणूस आजारी पडतो.

४. हवा किंवा दूषित पाण्यामुळेदेखील आजार होतो.

विविध आजार त्यांची कारणे व उपाय याबाबत लोकांच्या वेगवेगळ्या संकल्पना असल्याचे आढळून आले. या आदिवासी भागामध्ये साथीच्या रोगांचे प्रमाण अधिक आहे. ताप, सर्दी खोकला व जुलाब या आजारांचे प्रमाण जास्त असल्याचे दिसले. लहान मुलांमध्ये खरुजेचे प्रमाणही बरेच आहे. लोक खरुजेवर उपचार म्हणून पारंपारिक वनौषधी लावताना आढळले.

जानू गवत्या या उंबरविहिरच्या माहितगार म्हाताऱ्याकडून आजाराबद्दल अत्यंत महत्वाची संकल्पना ऐकायला मिळाली, ''हल्ली, साथीच्या रोगांचे प्रमाण वाढले आहे व असे आजार वरचेवर होत असतात. मला आठवते की जेव्हा मी लहान होतो त्यावेळेस मला सर्दी खोकला यासारखे किरकोळ आजारच व्हायचे पण जुलाब कधी माहित नव्हता. शहरासारखे रस्ते दवाखाने जेव्हा आले, जसजशी शहरी संस्कृती आली तेव्हापासून आजार वाढले आहेत. आमच्या खाण्यापिण्याच्या सवयीत देखील बदल झाला असल्याने नव्या पिढीत जास्त आजार दिसतात.''

तीन पिढ्या पाहिलेल्या जानूचे हे मत रास्तच वाटते. उंबरविहिर सारख्या गावाच्या आजूबाजूचे जंगल काळाच्या ओघात पारच नष्ट झाले आहे. बाहेरच्या लोकांनी लादलेल्या विकासामुळे लोकांच्या जीवनाची घडीच विस्कटली आहे त्याचा परिणाम त्यांच्या आरोग्यावरही झाला आहे हेच जानूच्या बोलण्यातून दिसते. विकासाचे नियोजन करणाऱ्या योजनाकारांसाठी ही प्रतिक्रिया मार्गदर्शक ठरावी.

**लसीकरण** - क्षयरोग, पोलिओ, गोवर, घटसर्प डांग्या खोकला व धनुर्वात या सहा सांसर्गिक रोगांपासून बाळाचे संरक्षण करण्यासाठी बाळाला लसी दिल्या जातात. लोकांचे लसीकरणाबाबत काय मत आहे. त्यांना कितपत माहिती आहे याबाबत प्रश्न विचारण्यात आले होते. त्यातून पुढील गोष्टी समोर आल्या.

उंबरविहिर गावामध्ये जवळच्या साखरशेत (१ किमी) प्रा. आ. केंद्रातील नर्स येऊन लहान मुलांना लस टोचते तर वावर येथे गावातीलच प्राथमिक आरोग्य पथकामार्फत लसीकरण केले जाते.

लोकांना लसीकरणाबाबत विशेष माहिती नव्हती केवळ नर्सबाई येऊन लहान मुलांना दर महिन्याला इंजक्शन देऊन जाते एवढंच सांगता आले.

उंबरविहिरच्या कमलीने मात्र सांगितले. "या खास इंजक्शनमुळे मुलांना काही आजारांपासून संरक्षण मिळते. गर्भवती स्त्रियांनासुद्धा इंजक्शन दिले जाते. जन्माला येणारी बालके सुदृढ व आजारापासून मुक्त रहातात. ही इंजेक्शन नर्सबाई देते. तिच्याजवळच्या पांढऱ्या पेटीत ती ठेवलेली असतात व सुया उकळून घेऊन मगच दिली जातात."

उंबरविहिर हे गाव बाहेरच्या जगाच्या संपर्कात असल्याने तेथील लोक वावरमधील लोकांपेक्षा जागरूक असल्याचे दिसून आले.

**कुटुंब नियोजन** - बहुतके सर्व तरूण विवाहितांना कुटुंब नियोजनाबद्दल माहिती आहे. मात्र त्यांना पाळणा लांबविण्याच्या पद्धतीपेक्षा पाळणा थांबविण्याच्या पध्दतीबद्दल अधिक ज्ञान होते. देशाच्या बहुतेक सर्व भागामध्ये स्त्रिया कुटुंबनियोजनाची शस्त्रक्रिया करताना दिसतात. येथे मात्र बहुसंख्य पुरुषांनी नसबंदीची शस्त्रक्रिया करून घेतली आहे. हे आदिवासी भागाचे वेगळेपणच म्हटले पाहिजे. याबद्दल लोकांना विचारले असता त्यांनी उत्तर दिले की "पुरूष नसबंदीची शस्त्रक्रिया अत्यंत सोपी आहे, केवळ दोन तीन तासानंतर घरी जाता येते व दुसऱ्या दिवशीपासून कामदेखील सुरू करता येते. याउलट शस्त्रक्रिया करायची म्हणजे दवाखान्यात दोन तीन दिवस रहावे लागते. आणि स्त्रिया पुरूषांपेक्षा शारीरिकदृष्ट्या कमजोर असल्याने त्यातून पुढे गंभीर समस्या देखील उद्भवू शकते. म्हणून पुरूषच ऑपरेशन करतात."

कुटुंब नियोजन का करावे या प्रश्नाला उत्तर देताना चिमाने सांगितले "कुटुंब नियोजन केले नाही तर पुढच्या पिढीमध्ये घरात काही खायला उरणार नाही. खाणाऱ्या तोंडाची संख्या वाढेल तर जमीन भावंडांमध्ये विभागली गेल्याने मिळणारे धान्य अपुरे पडेल."

भूतबाधा किंवा देवाच्या कोपामुळे आजार होतात असा या लोकांचा समज आहे. अंगामध्ये अशा अज्ञात शक्तीचा प्रवेश झाल्यास किंवा काही मानसिक आजार झाल्यास भगतामार्फतच इलाज केला जातो. आदिवासी संस्कृतीमध्ये धार्मिक उपचार पद्धतीत 'जागरण' महत्वाची भूमिका बजावते.

**जागरण** - जेव्हा एखादी व्यक्ती बराच काळ आजारी असते त्यावेळेस शारीरिक कारणांपेक्षा इतर काही कारणाने आजार झाला आहे असे समजले जाते. आजारी व्यक्तीचा नातेवाईक किंवा परिचिताच्या मनामध्ये काही इच्छा किंवा आकांक्षा आहे आणि त्याच्या परिणामस्वरूप ती व्यक्ती आजारी पडली आहे असे समजले जाते. याला 'सवाल' असे म्हणतात. आणि त्याला ओळखण्याचे काम भगत करतो, अशा विधीला 'दिवा बघणे' असे म्हणतात.

**दिवा बघणे** - एका ताटामध्ये तांदळाचे पाच ढीग घेतले जातात. आजारी व्यक्ती संभावित नातेवाईक किंवा परिचिताला (जिच्यामुळे आजार झाला आहे असे वाटते त्या व्यक्तीला) मनामध्ये धरते तसेच त्या व्यक्तीचे प्रतिक म्हणून ताटामधील एक ढीगदेखील मनात धरते. त्यानंतर भगत त्याच्या बोटाने ढीग दर्शवितो. जर भगताने दर्शविलेला व आजारी व्यक्तीने मनामध्ये धरलेला ढीग सारखाच आला तर त्याने मनात धरलेली व्यक्ती हीच आजाराला कारणीभूत आहे असे समजले जाते. नंतर ज्या व्यक्तीमुळे आजार झाला आहे त्या व्यक्तीला आजारी व्यक्तीसाठी कपडे, खास अंगठी व रोख रक्कम द्यावी लागते.

खरोंदा गावामध्ये वास्तव्य असताना असे जागरण बघायला मिळाले गावच्या भगताने आपली सून सहा महिने तापाने आजारी होती म्हणून मेढा गावच्या भगतिणीला जागरणासाठी बोलावले होते. 'सवाल' सुनेच्या भावावर आला. त्या भावाने बहिणीला साडी,

अंगठी व पन्नास रुपये दिले. ''त्या सुनेने मिळालेली साडी वर्षभर नेसली पाहिजे जर का त्या साडीला काही झाले तर जागरण पुन्हा करावे लागेल.'' अशी माहिती भगताने पुरविली.

आजाराचे कारण शोधण्याशिवाय आजार होऊ नये म्हणून जागरण केले जाते. खरोंद्यातील एका म्हातारीने आपल्याला कुठलाही आजार होऊ नये, प्रकृती चांगली रहावी म्हणून गावच्या भगताकडून जागरण करून घेतले.

काळाच्या ओघामध्ये आदिवासी लोक आधुनिक वैद्यकीय उपचारांच्या सान्निध्यात आले आहेत. पारंपारिक उपचारांपेक्षा अत्यंत भिन्न प्रकारच्या उपचार पद्धतीशी त्यांनी स्वत:ला जुळवून घेतले आहे. ही गोष्ट आरोग्य सुविधांच्या वापरावरून स्पष्ट होते. याचा अर्थ असा नाही की पारंपारिकपणे चालत आलेली वनौषधी व 'भगत' या संस्था संपूर्णपणे नष्ट झाल्या आहेत, तर त्यांचा वापर कमी झाला आहे. भगतांचे काम आजारांवर उपचार करण्यापेक्षा सण समारंभ व धार्मिक विधींसाठी लोक व देव यांच्यातील दुवा साधण्यापुरतेच मर्यादित राहिल्याचे दिसते.

याबाबत काही लोकांनी सांगितलेल्या माहितीची चर्चा करणे येथे उद्बोधक ठरेल. शंकर मोर्घाच्या सांगण्याप्रमाणे ''डॉक्टर व भगत या दोघांचेही वेगवेगळे असे कार्यक्षेत्र आहे. जेव्हा एखादी स्त्री गर्भवती रहाते त्यावेळेस भगतच तिला काय खायचे व काय खायचे नाही हे सांगतो.''

वावर गावच्या भगताच्या सांगण्यानुसार ''आम्ही काही रुग्णांना प्राथमिक आरोग्य केंद्राच्या डॉक्टरकडे उपचार घेण्यासाठी जाण्याचा सल्ला देतो. तर कधीकधी डॉक्टरसुद्धा त्याच्या रुग्णांना उपचारासाठी आमच्याकडे पाठवतो. जर का एखादा माणूस 'हिरवा देवा'च्या कोपामुळे आजारी पडला तर डॉक्टर त्यावर काहीही उपाय करू शकत नाही. देवाच्या कोपामुळे झालेला आजार देवच बरा करू शकतो. आणि देवाच्या जवळ माणसाच्या भावना पोचवण्यासाठी त्याच्या सर्वात जवळची व्यक्ती कोण असेल तर भगत, डॉक्टर नव्हे. कधीकधी भगताला आजाराचे कारण जंतू आहे असे दिसून आले तर तो रुग्णाला डॉक्टरकडे जायला सांगतो.''

उंबरविहिरचा बुध्या जीवा चिबडे हा ठाकूर जमातीचा आदिवासी म्हणाला, ''आम्हाला जेव्हा आजारी असल्यासारखे वाटायला लागते तेव्हा आम्ही सर्वप्रथम भगताकडे जातो. भगत हा गावतलाच असतो, त्याच्याकडे गेले नाही तर तो रागावतो. जर भगताच्या उपचाराने आजार बरा झाला नाही तर तो स्वत: सांगतो किंवा आम्हीच डॉक्टरकडे जाण्याचा निर्णय घेतो. कधीकधी डॉक्टरच सांगतो की आजाराची कारणे माहित नाहीत किंवा कधी कधी डॉक्टरचे बराच काळ उपचार घेतल्यानंतर देखील आजार बरा होत नाही अशा वेळेस आम्ही पुन्हा भगताकडे जातो. परंतु आत्तापर्यंतचा डॉक्टरबद्दलचा आमचा अनुभव चांगला आहे. बहुतेक वेळेला डॉक्टरच्या उपचारामुळे आजारी माणूस लवकर बरा झाल्याचे दिसते.''

जानू गवत्याच्या सांगण्यानुसार ''उपचारासाठी आम्ही भगताकडे जातो. जर त्याच्या उपचारांमुळे आजार बरा झाला नाही तर आम्ही डॉक्टरकडे जातो. पण आजकाल डॉक्टरांचे उपचार अत्यंत परिणामकारक असतात. त्यामुळेच आम्ही भगताकडे जाणे जवळजवळ थांबवले आहे. जेव्हा आजारी माणूस हॉस्पिटलात सुद्धा बरा होत नाही तेव्हा भगताचे उपचार घेतो. डॉक्टरांकडून जर का आजार बरा होत नसेल तर भगत तरी कसा बरा करू शकणार ? डॉक्टर हा शहरातून शिकून आलेला असतो आणि त्याला सर्व माहिती असते.''

डॉक्टरांच्या उपचाराबद्दल बोलताना यशवंत म्हणाला, ''डॉक्टर योग्य पद्धतीनेच उपचार करतात. डॉक्टरांनी तपासणी करताना स्त्रिच्या स्तनाला जरी हात लावला तरी आम्हाला काही वाटत नाही. कारण ते त्यांचे कामच असते.'' लासू डोकेच्या सांगण्यानुसार ''जितके लोक जास्त निरक्षर तितके ते भगताला प्राधान्य देतात.'' लासू स्वत: निरक्षरच आहे परंतु मजुरीच्या कामामुळे शहरांशी संपर्क येत असल्याने त्याने अशी प्रतिक्रिया व्यक्त केली असावी.

बेहेडपाडचाच्या शंकर या तरूण युवकाच्या मतानुसार, ''आमच्या गावामध्ये ट्रक भरून भगत असले तरी खरजेसारख्या आजारावर उपचार भगतांच्या आवाक्याबाहेरचे आहेत.''

उपचारासाठी भगत देखील डॉक्टरांकडे जात असल्याचे दिसते. वावरच्या बाळू भगताने स्वत:ला पोटदुखी झाली म्हणून वनौषधी घेऊन पाहिली पण उपयोग न झाल्याने डॉक्टरांचे उपचार घेतले. खरोंड्याचा शिवराम भगतदेखील आपण आजारी पडल्यावर डॉक्टरकडे जाऊन औषध घेतो असे मान्य करतो. चांभारशेतच्या प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी देखील याला दुजोरा देतात- ''आमच्याकडे सर्व प्रकारचे लोक, भगतदेखील उपचारासाठी नेहमी येतात.''

डॉक्टर आणि भगत या दोन्ही उपचार करणाऱ्या संस्थावर लोकांचा विश्वास असल्याचे दिसते. पारंपारिक पद्धतीच्या उपचारांपेक्षा आधुनिक वैद्यकीय उपचार पद्धतींवर आदिवासी लोकांचा विश्वास वाढत असल्याचे जाणवते. मात्र लोकांना दोन्ही पद्धतीचे फायदे तोटे व मर्यादा माहिती आहेत. लोकांनी आपल्या परीने आजारांचे वर्गीकरण केले आहे व त्याप्रमाणेच डॉक्टरकडून उपचार घेतले जातात. देवाच्या कोपामुळे किंवा भूतबाधा यामुळे आजार उद्भवला असे वाटत असेल तर भगताच्या उपचारांनाच प्राधान्य दिले जाते.

या अभ्यासात, उपचार पद्धतींची निवड करताना बाहेरच्या जगाशी संपर्क, आरोग्य सोयींची उपलब्धता तसेच निरक्षरता व धार्मिक श्रद्धेचा पगडा या गोष्टींचा घनिष्ठ संबंध असल्याचे दिसून आले. उंबरविहिर या गावातील लोकांचा बाहेरच्या जगाशी सततचा संपर्क असल्याने तसेच वाहतुकीची साधने उपलब्ध असल्याने लोक आधुनिक वैद्यकीय उपचार सेवांचा लाभ घेताना दिसतात. तर वावर या दुर्गम भागात असलेल्या खेड्यातील लोक निरक्षर असल्याने व धार्मिक श्रद्धा परंपरांचा लोकांच्या मनावर पगडा असल्याने गावात प्राथमिक आरोग्य पथक असून देखील पारंपारिक उपचार पद्धतींनाच चिकटून राहिल्याचे दिसतात.

या आदिवासी भागातील आजारांचे व मृत्यूचे प्रमाण (खासकरून बाल मृत्यूचे) कमी करायचे असेल तर आधुनिक व पारंपारिक उपचार पद्धतीमध्ये समन्वय साधून आरोग्य सुविधांचा प्रभावीपणे उपयोग करणे गरजेचे आहे. दळणवळणाच्या सोयीसुविधा, आहार व आरोग्य शिक्षणाबरोबरच उत्पन्नाचे साधनदेखील लोकांना मिळणे अत्यावश्यक आहे तरच लोकांचे जीवनमान उंचावून आरोग्याचे प्रश्न सुटू शकतील.

**भगत**

दोन प्रकारचे भगत या भागात आढळून येतात. एक सर्वसामान्य आजारांवर उपचार करणारा तर दुसरा हाडाच्या विकारांवर मात करणारा हाड भगत. सर्वसामान्य आजारांवर उपचार करणाऱ्या भगतांमध्येदेखील दोन प्रकार आहेत. एक वनौषधीच्या सहाय्याने उपचार करणारा तर दुसरा जादूटोना, मंत्रतंत्र, दैवी विद्या, धार्मिक विधी यांच्या सहाय्याने इलाज करणारा.

खरोंद्याच्या शिवराम भगताच्या अंगामध्ये दैवी शक्तीचा संचार होतो. परंतु त्याला आजारावर उपचार करण्यासंबंधीचे ज्ञान नसावे. म्हणूनच त्याच्याबद्दल बोलताना गावातीलच एक माणूस म्हणाला, ''तो नुसताच अंगाभोवती गोल गोल घुमत असतो.''

बेहेडपाडा, वावरमध्ये एकच हाड भगत आहे. या हाड भगताला इतर भगतांपेक्षा जास्त मान दिला जातो. बारकू भगत या साधारण भगताने सांगितले की ''आम्ही एकमेकांच्या रुग्णांवर उपचार करत नाही. जर का माझ्याकडे हाडाचा आजार असलेला रुग्ण आला तर मी त्याला हाड भगताकडे पाठवून देतो. मी स्वत; उपचार केले तर माझी स्वत:ची विद्या नाहीशी होईल. हाड भगतदेखील इतर आजारांचे रुग्ण आमच्याकडे पाठवून देतो.''

खरोंदा या कोकणा जमातीचे प्राबल्य असलेल्या गावामध्ये वनौषधी देणाऱ्या भगतांची संख्या फारच कमी आहे. जादूटोना, दैवी विद्या मंत्रतंत्राच्या सहाय्याने उपचार करणारे वारली भगत आहेत. मात्र त्यांचा उपयोग वैद्यकीय उपचारापेक्षा धार्मिक विधींसाठी जास्त होतो.

उंबरविहिर या दळवळणाची साधने उपलब्ध असलेल्या गावामध्ये झपाट्याने सामाजिक बदल होताना दिसतो. त्याचा परिणाम म्हणून पारंपारिक वनौषधांची परंपरा लुप्त झाली आहे. येथील लोक आता चालतवडच्या प्राथमिक आरोग्य केंद्रातच उपचार घेताना आढळतात. बेहेडपाडा, वावरचा मात्र बाहेरगावाशी कमी संपर्क असल्याने तसेच नैसर्गिक विविधता व वारल्यांचे प्राबल्य असल्याने येथे पारंपारिक वैद्यकाची परंपरा टिकून राहिली आहे. येथील शंकरच्या मतानुसार ''वावर गावामध्ये ट्रकभरून भगत आहेत.''

"लोकांकडून गोळा केलेल्या या वैविध्यपूर्ण माहितीबरोबच घराघरातून जाऊन गोळा केलेली आरोग्यविषयक आकडेवारी बघणे निश्चितच उपयुक्त ठरेल.

तक्ता क्र. १

**मागील एक महिन्यातील (डिसेंबर १९९३) आजार**
**गावानुसार स्त्रीपुरुष संख्या.**

| गाव | रुग्णांची संख्या | | | एकूण लोकसंख्या | आढळलेल्या रुग्णांची एकूण लोकसंख्येशी टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| | पुरुष | स्त्रिया | एकूण | | |
| १. वावर | १९ | २१ | ४० | ३६५ | ११% |
| २. साखरशेत | २८ | ३५ | ६३ | ६०४ | १०.४% |
| ३. खरोंदा | १८ | २४ | ४२ | २५२ | १६.६% |
| ४. चांभारशेत | १३ | १३ | २६ | १७८ | १४.६% |
| ५. अक्रा | १ | १ | २ | २८ | ७.१% |
| एकूण | ७९ | ९४ | १७३ | १४२७ | १२.१% |

तक्ता क्र. १ मध्ये डिसेंबर १९९३ या संदर्भ महिन्यामध्ये कुठला ना कुठला तरी आजार असलेल्या रुग्णांची गाववार माहिती देण्यात आली आहे. या तक्त्यावरून असे दिसते की सर्वेक्षण केलेल्या एकूण १४२७ लोकसंख्येपैकी १७३ लोक आजारी होते. त्यापैकी ७९ पुरुष तर ९४ स्त्रिया होत्या. खरोंदा गावात आजाराचे प्रमाण १६.६%, चाभांरशेतमध्ये १४.६% तर साखरशेतमध्ये फक्त १०.४ टक्के एवढेच होते.

साखरशेत व खरोंदा गावामध्ये पुरुषांपेक्षा स्त्रियांमध्ये आजाराचे प्रमाण थोडेसे जास्त आढळून येते.

तक्ता क्र. २

**मागील एक महिन्यातील (डिसेंबर १९९३) आजार**
**जमातीनुसार वर्गीकरण**

| जमात | रुग्ण पुरुष | रुग्ण स्त्री | रुग्ण एकूण | एकूण लोकसंख्या | आढळलेल्या रुग्णांची लोकसंख्येशी एकूण टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १. कोकणा | २४ | ३४ | ५८ | ४३६ | १३.३% |
| २. वारली | ३३ | ३३ | ६६ | ५४२ | १२.१% |
| ३. ठाकूर | १६ | १७ | ३३ | ३१० | १०.६% |
| ४. इतर | ६ | १० | १६ | १३९ | ११.५% |
| एकूण | ७९ | ९४ | १७३ | १४२७ | १२.१% |

(इतर जमातींमध्ये ढोर कोळी, मल्हार कोळी, राज कोळी, महादेव कोळी या जमातींचा समावेश होतो.)

आजारी रुग्णांची जमातवार विभागणी केली असता त्यामध्ये विशेष असा फरक दिसून येत नाही. कोकणा जमातीत (१३.३%) वारली (१२.१%) व ठाकूर (१०.६%) जमातीपेक्षा आजाराचे प्रमाण थोडेसे जास्त आढळते. मात्र वरील तक्त्यावरून एक गोष्ट स्पष्ट जाणवते की अन्य जमातींमध्ये पुरुष व स्त्रियांमध्ये आजार होण्याचे प्रमाण जरी सारखेच असले तरी कोकण जमातीत मात्र स्त्रिया आजारी पडण्याचे प्रमाण पुरुषांपेक्ष जास्त आहे.

तक्ता क्र. ३

**मागील एक महिन्यातील आजार**
**वयोगटानुसार स्त्रीपुरुष रुग्णसंख्या**

| वयोगट वर्ष | पुरुष | स्त्रिया | एकूण |
|---|---|---|---|
| ०-१ | ८ (४.६%) | ११ (६.४%) | १९ (११%) |
| १-५ | १२(६.९%) | १४ (८.१%) | २६(१५%) |
| ५-१५ | १७ (९.८%) | १८ (१०.४%) | ३५(२०.२%) |
| १५-४५ | ३५(२०.२%) | ४२(२४.२%) | ७७(४४.५%) |
| ४५-६० | ६ (३.५%) | ८ (४.६%) | १४ (८.३%) |
| ६० + | १ (०.६%) | १. (०.६%) | २ (१.२%) |
| एकूण | ७९ (४५.७%) | ९४ (५४.३%) | १७३(१००%) |

वयोगट व लिंगानुसार रुग्णसंख्या पाहिली असता असे दिसते की प्रत्येक वयोगटामध्ये पुरुषांपेक्षा स्त्रियांमध्ये आजाराचे प्रमाण थोडेसे जास्त आहे. एकूण रुग्णापैकी पुरुषांची संख्या ७९ (४५.७%) तर स्त्रियांची संख्या ९४ (५४.३%) होती.

तक्ता क्र. ४

**वयोगटातील एकूण लोकसंख्येच्या**
**टक्केवारीच्या प्रमाणानुसार आजार**

| वयोगट | एकूण लोकसंख्या | रुग्ण | टक्केवारी |
|---|---|---|---|
| ०-१ | ७० | १९ | २७.१% |
| १-५ | १६७ | २६ | १५.६% |
| ६-१५ | ३५० | ३५ | १०% |
| १५-४५ | ६६३ | ७७ | ११.६% |
| ४६-६० | १४६ | १४ | ९.६% |
| ६०+ | ३१ | २ | ६.५% |
| एकूण | १४२७ | १७३ | १२.१% |

तक्ता क्र. ४ मध्ये प्रत्येक वयोगटातील एकूण लोकसंख्येच्या प्रमाणात रुग्णांची संख्या किती आहे हे दर्शविले आहे. विश्लेषणावरून असे दिसते की नवजात बालकांमध्ये (०-१ वर्षे) आजाराचे प्रमाण सर्वात जास्त (२७.१%) तर १ ते ५ वर्ष या वयोगटात १५.६% आहे. त्यानंतर जसजसा वयोगट वाढत जाईल तसतसे आजारी रुग्णांचे प्रमाण कमी झाले आहे.

पाच वर्षाखालील एकूण मुलांपैकी ४२.७% टक्के मुले डिसेंबर १९९३ मध्ये आजारी होती. ही मोठी गंभीर समस्या असून आदिवासी भागातल्या आरोग्याच्या दर्जावर प्रकाश टाकणारी बाब आहे.

तक्ता क्र. ५ मध्ये विविध आजारांप्रमाणे स्त्री पुरुष रुग्णांची विभागणी दर्शविली आहे. आरोग्य सर्वेक्षणामध्ये एकूण १७३ रुग्ण डिसेंबर १९९३ या संदर्भ महिन्यात आजारी असल्याचे आढळून आले, तर तक्ता क्र. ५ प्रमाणे एकूण आजार संख्या २७९ आहे. याचे कारण म्हणजे रूग्ण जरी १७३ असले तरी काही रुग्णांना या एका संदर्भ महिन्यामध्ये एकापेक्षा अधिक आजार वेगवेगळ्या वेळेस झाले आहेत. व त्या आजारांचा एकमेकांशी संबंध नव्हता म्हणून पुढील तक्ता तयार तयार करताना असे आजार वेगवेगळे म्हणून गणले आहेत. उदा. ताप व जुलाब.

तक्ता क्र. ५

## विविध कारणांमुळे आजारी असलेल्या स्त्रीपुरुषांची संख्या

| आजार | आढळलेले आजार प्रमाण | | |
|---|---|---|---|
| | पुरुष | स्त्रिया | एकूण |
| १. संसर्गजन्य आजार (५४.१%) | | | |
| अ) ताप | ७०(२५.१%) | ७४(२६.५%) | १४४(५१.६%) |
| ब) मलेरिया | ४ (१.४%) | २ (०.७%) | ६(२.१ %) |
| क) गोवर | - | १ (०.४%) | १ (०.४%) |
| २. पोटाचे विकार (२७.६%) | | | |
| अ) जुलाब | २५ (९%) | २२ (७.९%) | ४७(१०.९%) |
| ब) उलटच्या | ७ (२.५%) | ५ (१.८%) | १२(४.३%) |
| क) काविळ | १ (०.४%) | - | १ (०.४%) |
| ड) पोटदुखी | ६ (२.२%) | ११ (४%) | ७ (६.१%) |
| ३. श्वसन विकार (२.१%) | | | |
| सर्दी व खोकला | २(०.७%) | ४ (१.४%) | ६ (२.२%) |
| ४. अ) डोकेदुखी | ३ (१.१% | ५ (१.८%) | ८ (२.९%) |
| ब) अंगदुखी | ४ (१.४%) | ६ (२.२%) | १०(३.६%) |
| ५. दुखापती व जखमा (१.१%) | १ (०.४%) | २ (०.७%) | ३ (१.१%) |
| ६. त्वचा विकार (५.७%) | | | |
| अ) फोड, गळू | ३ (१.१%) | १ (०.४%) | ४ (१.४%) |
| ब) खरूज | ३ (१.१%) | ९ (३.२%) | १२ (४.३%) |
| ७. इतर आजार (२.९%) | | | |
| अ) रक्तदाब | १ (०.४%) | १ (०.४%) | २ (०.७%) |
| ब) अपस्मार | १ (०.४%) | - | १ (०.४%) |
| क) स्त्रियांचे आजार | - | १ (०.४%) | १ (०.४%) |
| ड) मूत्ररोग | २ (०.७%) | - | २ (०.७%) |
| इ) दंत विकार | २ (०.७%) | - | २ (०.७%) |
| एकूण | १३५ (४८.४%) | १४४ (५१.६%) | २७९(१०० %) |

विविध आजारांमध्ये ताप, मलेरिया व गोवर यासारख्या संसर्गजन्य रोगांची संख्या ५४.१% होती तर पोटाचे विकार २७.६% होते. त्वचा विकाराच्या रूग्णांची संख्या १६ (५.७%) होती. रक्तदाब, अपस्मार यासारख्या आजारांचा प्रत्येकी एक रुग्ण आढळला. हे सर्वेक्षण जरी डिसेंबर १९९३ या संदर्भ महिन्यासाठी केले होते तरी केवळ ६ जणांनाच (२.१%) सर्दी खोकला झाला असल्याची माहिती मिळाली.

**सरकारी व खासगी आरोग्य सेवांचा वापर**

या आदिवासी भागातील लोक गोळ्या कॅप्सूल अथवा पातळ औषधापेक्षा इंजक्शनला जास्त प्राधान्य देतात. इंजक्शन घेतल्याने माणूस अत्यंत थोड्या वेळात बरा होतो तर कॅप्सूलमुळे बरं होण्यास वेळ लागतो अशी या लोकांची भावना आहे. जर डॉक्टरांनी इंजक्शन न देता गोळ्या दिल्या तर दुसऱ्या दिवशी जव्हारला जाऊन खासगी दवाखान्यातून इंजक्शन घेऊन येण्याची प्रवृत्ती उंबविहिर गावातील लोकांमध्ये दिसली.

तक्ता क्र. ६

**आरोग्य सुविधांचा वापर**

| आरोग्य सुविधा | रुग्ण संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| १. प्राथमिक आरोग्य केंद्र व सरकारी रुग्णालय | १०२ | ५८.९% |
| २. खासगी दवाखाना व रुग्णालय | २६ | १५% |
| ३. भगत व डॉक्टर | २३ | १३.३% |
| ४. भगत | ११ | ६.४% |
| ५. उपचार नाहीत | ६ | ३.५% |
| ६. घरगुती उपचार | ५ | २.९ % |
| एकूण | १७३ | १००% |

वरील तक्त्यावरून असे दिसते की ५९ % लोकांनी उपचारासाठी सरकारी आरोग्य सुविधांचा वापर केला आहे. गावांमधून खासगी दवाखाने नसल्याने तसेच सरकारी आरोग्य सुविधा चांगली असल्याने एवढा वापर झाल्याचे दिसते व ही बाब निश्चितच समाधानकारक आहे. खाजगी दवाखाना व रुग्णालयाचा (जी सुविधा जव्हार गावात आहे) वापर २६ रुग्णांनी (१५%) केला आहे. तर १३.३% रुग्ण भगत व डॉक्टरकडे गेलेले दिसतात. ११ (६.४%) रूग्णांनी भगताकडून तर ५ (२.९%) रूग्णांनी घरगुती उपचार केले आहेत. यावरून असे म्हणता येईल की नविन वैद्यकीय सुविधांमुळे पारंपारिक वनौषधी उपचारासाठी घेण्याचे प्रमाण खूपच कमी झाले आहे. ६ (३.५%) रुग्णांनी आजारावर कुठल्याच प्रकारचे उपचार केले नाहीत.

तक्ता क्र. ७

**वर्ष १९९३ मधील नवजात बालकांचे मृत्यू**

| गाव | लिंग | | |
|---|---|---|---|
| | पुरुष | स्त्री | एकूण |
| १. वावर | ९ | ४ | १३ |
| २. साखरशेत | ३ | २ | ५ |
| ३. खरोंदा | ३ | - | ३ |
| ४. चांभारशेत | १ | १ | २ |
| ५. अक्रा | - | १ | १ |
| एकूण | १६ | ८ | २४ |

आजार विषयक माहिती बरोबरच गेल्या एक वर्षात झालेल्या नवजात बालकांच्या मृत्यूंबद्दलही माहिती गोळा केली गेली. तक्ता क्र. ७ मध्ये गाववार नवजात बालकांच्या मृत्यूची संख्या दर्शविली आहे.

एकूण २४ नवजात बालमृत्यू नोंदविले गेले. त्यापैकी १६ मुले व ८ नवजात मुली होत्या. वावर गावामध्ये सर्वात जास्त म्हणजे १३ नवजात बालकांचे मृत्यू झाले आहेत. तर साखरशेत मध्ये एकूण ५ मृत्यू झाले आहेत. वावर हे गाव अतिशय दुर्गम भागात असून येथे वारली या जमातीचे लोक रहातात.

तक्ता क्र. ८

**वर्ष १९९३ मधील नवजात बालकांचे मृत्यू वय व लिंगाप्रमाणे संख्या**

| वय | लिंग | | |
|---|---|---|---|
| महिन्यामध्ये | पुरुष | स्त्री | एकूण |
| ०-१ | ९ | ३ | १२ |
| १-६ | ३ | ३ | ६ |
| ६-१२ | ४ | २ | ६ |
| एकूण | १६ | ८ | २४ |

पहिल्या वर्षात मृत्यू पावलेल्या एकूण २४ बालकांपैकी १२ बालकांचा मृत्यू पहिल्याच महिन्यात झाला आहे. तर जन्मानंतर १-६ महिने व ६-१२ महिने या कालावधीत प्रत्येकी सहा मुले दगावली आहेत.

या बालमृत्यूंना मातेचे कमी वय लागोपाठची बाळंतपणे, कुपोषण, कमी जन्मवजनाचे बालक तसेच साथीचे रोग या सर्व गोष्टी कारणीभूत आहेत.

तक्ता क्र. ९

**नवजात बालकांच्या मृत्यूची कारणे**

| मृत्यूचे कारण | लिंग | | |
|---|---|---|---|
| | पुरुष | स्त्री | एकूण |
| १. ताप | १ | ० | १ |
| २. गोवर | ५ | २ | ७ |
| ३. जुलाब | ३ | १ | ४ |
| ४. कांजिण्या | ० | २ | २ |
| ५. कमी वजन | ३ | ० | ३ |
| ६. काळी जादू | १ | ० | १ |
| ७. माहित नाही | ३ | ३ | ६ |
| एकूण | १६ | ८ | २४ |

एक वर्षाच्या आत झालेल्या बालकांच्या मृत्यूची कारणे बघितली असता (तक्ता क्र. ९) असे दिसते की ताप (१), गोवर (७), जुलाब (४) कांजिण्या (२) असे एकूण २४ पैकी १४ मृत्यू साथीच्या आजारांमुळे झाले आहेत तर ३ मृत्यू बालकाचे जन्म वजन कमी असल्याने झाले आहेत. एका बालकाच्या मृत्यूचे कारण मात्र काळी जादू असल्याचे सांगितले गेले तर ६ मृत्युंची कारणे माहित नव्हती.

तक्ता क्र. १०

**गेल्या दोन वर्षातील मृत्यू (नवजात बालके वगळून) गाव व लिंगाप्रमाणे संख्या**

| महिन्यामध्ये | पुरुष | स्त्री | एकूण |
|---|---|---|---|
| १. वावर | १० | ३ | १३ |
| २. साखरशेत | ३ | १ | ४ |
| ३. खरोंदा | ३ | - | ३ |
| ४. चांभारशेत | २ | २ | ४ |
| ५. अक्रा | - | १ | १ |
| एकूण | १६ | ७ | २५ |

तक्ता क्र. १० मध्ये नवजात बालकांचे मृत्यू वगळता गेल्या दोन वर्षात झालेल्या मृत्यूंची गाववार माहिती दिली आहे. गेल्या दोन वर्षात एकूण २५ मृत्यू झाले त्यापैकी १८ पुरुष होते तर ७ स्त्रिया होत्या. वावर या गावामध्ये सर्वात जास्त मृत्यू (१३) झाले आहेत तर साखरशेत व चांभारशेत मध्ये प्रत्येकी ४ व खरोंद्यामध्ये ३ मयती झाल्या.

तक्ता क्र. ११

**इतर मृत्यू**
**वयोगट आणि लिंगाप्रमाणे संख्या**

| वयोगट | लिंग | | |
|---|---|---|---|
| | पुरुष | स्त्री | एकूण |
| १-५ | १० | ३ | १३ |
| ५-१५ | २ | ० | २ |
| १५-४५ | १ | १ | २ |
| ४५-६० | ४ | २ | ६ |
| ६०+ | १ | १ | २ |
| एकूण | १८ | ७ | २५ |

वयोगटवार इतर मृत्यूची संख्या बघितली असता १ ते ५ वयोगटामध्ये सर्वात जास्त १३ मृत्यू झाल्याचे दिसते. ४५-६० व ६०+ या दोन्ही वयोगटांमध्ये मिळून ८ मृत्यू झाले आहेत. या आदिवासी भागामध्ये नवजात बालकांच्या मृत्यू बरोबरच ५ वर्षाखालील बालकांच्या मृत्यूचे प्रमाणही जास्त असल्याचे तक्ता क्र. ११ वरून स्पष्ट होते.

तक्ता क्र. १२

इतर मृत्यू
मृत्यूची कारणे

| मृत्यूचे कारण | लिंग | | |
|---|---|---|---|
| | पुरुष | स्त्री | एकूण |
| ताप | १ | ० | १ |
| जुलाब | ६ | ३ | ९ |
| काविळ | १ | ० | १ |
| मातामृत्यू | ० | १ | १ |
| प्रदिर्घ | २ | १ | ३ |
| म्हातारे वय | ३ | २ | ५ |
| काळी जादू | १ | ० | १ |
| माहित नाही | ४ | ० | ४ |
| एकूण | १८ | ७ | २५ |

तक्ता क्र. १२ मध्ये नवजात बालके सोडून इतर मृत्यूची कारणे दर्शविली आहेत. ४ मृत्यूंच्या बाबत कारण माहित नव्हते तर १ मृत्यू काळ्या जादूमुळे झाल्याचे लोकांनी सांगितले. एका महिलेचा बाळंतपणात मृत्यू झाला. ताप, जुलाब व काविळ यासारख्या साथीच्या रोगांमुळे ११ जण दगावले. तर म्हातारे वय व प्रदिर्घ आजारामुळे अनुक्रमे ५ व ३ मृत्यु झाले.

## शारीरिक मोजमापे

आरोग्याचा दर्जा ठरविताना आजारविषयक माहितीचा उपयोग होतो. त्याचबरोबर शारीरिक मोजमापे व घेतला जाणारा दैनंदिन आहार यावरूनही व्यक्ती अथवा समाजाचा आरोग्य दर्जा ठरविला जातो; व कुपोषणाचे प्रमाण काढता येते.

**शारीरिक मोजमापे** - जव्हार भागातील आदिवासींचा अभ्यास करताना उंची व वजन या दोन परिमाणांचा वापर करून प्रत्येक व्यक्तीसाठी शरिराचा वस्तुमान निर्देशांक काढण्यात आला त्यासाठी पुढील सूत्र वापरण्यात आले.

$$\textbf{शरीर वस्तुमान निर्देशांक} = \frac{\textbf{वजन (कि. ग्रॅ.)}}{\textbf{(उंची (मी))}^{२}}$$

या निर्देशांकाचा वापर करून व्यक्ती स्थूल का कुपोषित आहे याचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे करण्यात येते.

| वर्ग | | निर्देशांक |
|---|---|---|
| कुपोषित | श्रेणी ३ | १६ पेक्षा कमी |
| | श्रेणी २ | १६ - १७ |
| | श्रेणी १ | १७ - १८.५ |
| कमी वजन सामान्य | | १८.५ - २० |
| सामान्य | | २० - २५ |
| स्थूल | श्रेणी १ | २५ - ३० |
| स्थूल | श्रेणी २ | ३० + |

या निर्देशांकाचे वैशिष्टय म्हणजे हा निर्देशांक व्यक्तीच्या अथवा लिंगावर अजिबात अवलंबून नसतो. त्यामुळे बहुतेक वेळा याच निर्देशांकाचा वापर केला जातो.

अभ्यास केलेल्या गावातून एकूण २११ जणांची वजन व उंची घेण्यात आली. त्यापैकी ११९ पुरुष होते तर ९२ स्त्रिया होत्या. येथे पुरुषांपैकी कोणाचेही वजन ५० किलोपेक्षा जास्त नव्हते तर सर्व स्त्रिया ४० किलोपेक्षा कमी वजनाच्याच आढळल्या.

तक्ता क्र. १३

**शरीर वस्तुमान निर्देशांकाप्रमाणे स्त्रीपुरुषांचे वर्गीकरण**

| | पुरुष | स्त्रिया | एकूण |
|---|---|---|---|
| कुपोषित श्रेणी ३ | ६१ (५१.३%) | ५८ (६३%) | ११९ (५६.४%) |
| कुपोषित श्रेणी २ | १८ (१५.१%) | १६ (१७.४%) | ३४ (१६.१%) |
| कुपोषित श्रेणी १ | २३ (१९.३%) | १२ (१३%) | ३५ (१६.६%) |
| कमी वजन सामान्य | १३ (१०.९%) | ५ (५.४%) | १८ (८.५%) |
| सामान्य | ४ (३.४%) | १ (१.२%) | ५ (२.४%) |
| स्थूल श्रेणी १ | - | - | - |
| स्थूल श्रेणी २ | - | - | - |
| एकूण | ११९ | ९२ | २११ |

शरीर वस्तुमान निर्देशांकाच्या वर्गीकरणाप्रमाणे स्त्रियांमध्ये कुपोषणाचे प्रमाण पुरुषांपेक्षा जास्त दिसते. जवळजवळ निम्मे पुरुष (५१.३%) कुपोषित श्रेणी ३ या वर्गात आहेत तर ६३% स्त्रिया या वर्गात आढळतात. सामान्य या वर्गात केवळ ४ पुरुष १ स्त्री असल्याचे

दिसते. स्थूल श्रेणी १ व २ या वर्गामध्ये कोणीही स्त्री पुरुष दिसत नाही.

वरील तक्ता आदिवासी भागामध्ये कुपोषणाचे प्रमाण फार मोठे आहे हेच दर्शवितो.

## आहार सर्वेक्षण

शारीरिक मोजमापांबरोबरच आहार विषयक सर्वेक्षण सुध्दा करण्यात आले. एकूण ११३ लोकांकडून गेल्या २४ तासात घेतलेल्या आहाराबद्दल माहिती घेण्यात आली. घेतलेल्या आहाराचे प्रमाणित आहार तक्त्यांच्या सहाय्याने उष्मांकांमध्ये रूपांतर करण्यात आले. या आहार सर्वेक्षणाचे निकाल पुढील तक्त्यात दाखवले आहेत.

तक्ता क्र. १४

**घेतला जाणारा आहार**

| गट | सर्वेक्षितांची संख्या | सरासरी उष्मांक |
|---|---|---|
| पुरुष | ७९ | १८०४ |
| स्त्रिया | १९ | १५०९ |
| गर्भवती व स्तनदा माता | १५ | १५१८ |

पुरुषांच्या आहारामध्ये स्त्रियांपेक्षा ३०० उष्मांक जास्त आहे. मात्र सामान्य स्त्रिया व गर्भवती व स्तनदा माता यांच्या आहरातील उष्मांक जवळजवळ सारखेच आहेत. खरे म्हणजे गर्भवती व स्तनदा मातांनी सामान्य स्त्रियांपेक्षा ५०० उष्मांक अधिक घेणे आवश्यक आहे. तरच गर्भाची किंवा बाळाची वाढ व्यवस्थित होऊ शकेल.


सर्वच गटांमध्ये आवश्यकतेपेक्षा कमी उष्मांक असलेला आहार घेतला जात आहे हे वरील तक्त्यावरून दिसते.

पायाभूत अभ्यासातील आजार, शारीरिक मोजमापे तसेच आहार सर्वेक्षण याविषयीची माहिती बघितली असता जव्हार भागातील आदिवासींच्या आरोग्याची कल्पना येते.

कुपोषित श्रेणी ३ या वर्गामध्ये निम्म्याहून जास्त लोक मोडतात, पुरुष, स्त्रिया तसेच गर्भवती महिलांना आहारातून पुरेसे उष्मांक मिळत नाहीत. डिसेंबर सारख्या महिन्यात देखील बऱ्याच मोठ्या प्रमाणात आजार आढळून येते. नवजात बालकांच्या मृत्यूचे प्रमाणही मोठे आहे या गोष्टी सरकार व स्वयंसेवी संस्थांची ध्येयधोरणे व विकास कार्यक्रम अत्यंत तोकडे आहेत हेच दर्शवितात.

आदिवासींचे आरोग्य सुधारायचे असेल तर त्यांच्या सर्वांगिण विकासाच्या दृष्टीने प्रयत्न व्हायला हवेत. शेतीतून मिळणारे अन्नधान्याचे उत्पन्न वाढले तरच त्यांचा कर्जबाजारीपणा कमी होईल, स्थलांतर थांबेल व आरोग्याचा दर्जा वाढून जीवनमानाचा स्तर उंचावेल.

बायफने 'वाडी प्रकल्प' सुरु करून त्या दिशेने महत्वाचे पाऊल उचलले आहे. हा प्रकल्प आदिवासींच्या जीवनात नवी पहाट फुलवेल अशी आशा आहे.



# ऋणनिर्देश

थोर समाजसेवक कै. श्री. मणिभाई देसाई यांचे विकास व आरोग्याच्या संदर्भातले मौलिक विचार आम्हाला अत्यंत मार्गदर्शक ठरले आहेत. बायफचे उपाध्यक्ष श्री. गिरीश सोहोनी व डॉ. दिप्ती चिरमुले यांनी आपला अमूल्य वेळ या अभ्यासाच्या चर्चेसाठी दिला. श्री. मिलिंद शाळीग्राम यांनी पूर्वनियोजित कामे असतानादेखील संगणकावर संख्यात्मक माहितीचे विश्लेषण वेळात वेळ काढून करून दिले. बायफच्या संशोधक व कर्मचारी वर्गाने एप्रिल १९९४ मध्ये अहवाल सादरीकरणाच्या वेळेस अत्यंत भरीव व महत्वाच्या सूचना केल्या. आम्ही या सर्वांचे हार्दिक आभारी आहोत.

जव्हारमधील बायफचे कर्मचारी श्री. राडे व श्री. वागळे यांनी गावांमधून संशोधन करण्यासाठी व रहाण्यासाठी मोलाचे सहकार्य केले. चालतवडच्या श्री. कोळी गुरुजींनी नेहमीप्रमाणेच आमच्या कामाला मदतीचा हात दिला. अभ्यास केलेल्या गावातील लोकांनी उत्साहाने माहिती देऊन सहकार्य केले व आमच्या संशोधकांचे यथोचित आदरातिथ्य केले.

पुणे विद्यापीठाच्या आरोग्यशास्त्र विभागाच्या एम. एस्सीच्या (१९९२-९४) विद्यार्थ्यांनी संख्यात्मक माहिती गोळा करण्यास मदत केली. संशोधकांच्या गटाने एक दिलाने समन्वयपूर्वक काम केले. संशोधन गटातील संशोधक परिषदेच्या कार्यकारिणीचे सदस्य अथवा आजीव सभासद आहेत.

श्री. पाटील, श्री. डांगे यांनी टंकलेखनात तर श्री. नाईक यांनी इंग्रजी अहवालाची अक्षरजुळणी करून अहवाल त्याच्या मूळ स्वरूपात छापण्यास मदत केली.

आम्ही या सर्वांचे अत्यंत ऋणी आहोत.

**रा. के. मुटाटकर**
सचिव
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद
२५ ऑगस्ट १९९४

दि. ३०।०६।१९९८

प्रति,
मा. मुटाटकर
संपादक "हाकारा"

सविनय नमस्कार,

"हाकारा" अंकाबद्दल खूप ऐकलं होतं. पण कसे मिळविता येतील-याबद्दल प्रश्न होता. म्हणून एकदाचं त्याची माहिती काढली. आणि हे पत्र आपणास लिहिताना आनंद होत आहे. हाकारा हे त्यावेळी अनेक सामाजिक चळवळींचा आत्मा होते असे म्हणायला हरकत नाही. विजय साठे, मुरकुटे भाऊ आणि शरद कुलकर्णी यांनीही याबद्दल आम्हाला सांगितले होते. तेव्हा अंकाचे आजिव सभासद व्हायचे आहे. परंतु या मागचे अंक खूपच महत्वाच्या प्रश्नांवर प्रकाश टाकणारे आहेत. हे अंक आमच्या कार्यकर्त्यांच्या उपयोगाचे आहेत. म्हणून आपणाकडे एक-सदर पत्राद्वारे विनंती करत आहे की मागचे सर्व अंक वाचनासाठी-उपलब्ध झाल्यास खूपच उपयोगाचे होईल.

आम्ही जव्हार तालुक्यातील अतिदुर्गम गाव-पाड्यांवर काम करतो. तेथील आदिवासी तरुणांसाठी तीन ठिकाणी वाचनालयांची सुरुवात करण्यात आली आहे. तेव्हा या वाचनालयात "हाकारा" अंकास या भागातील च काही चळवळींचा १५ वर्षापूर्वी झालेला- घडलेला इतिहास मांडला आहे. त्यातून चांगल्या गोष्टी कार्यकर्त्यांना शिकता येईल. त्या अंका-तील विषय हे, काही शिबिरांचे विषय सुद्धा होऊ शकतील असे आहेत. तेव्हा कृपया आपण हाकाराचे सर्व जुने अंकांचे ३ सेटस. (तीन प्रती) जव्हारला पाठवून द्यावेत. पत्रव्यवहाराच्या खर्चाबाबत काही आर्थिक पूर्तता आवश्यक असेल तर सदर पत्यावर पत्रव्यवहार करावा ही विनंती.

सहकार्याबद्दल धन्यवाद!

आपला,

सविता बनसोडे.

# महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

आदिवासी व दलितांच्या समस्यांबाबत संशोधन, चर्चा व प्रकाशन, कार्यकर्त्यांचे शिबिराद्वारे प्रशिक्षण.

शासकीय, राजकीय व रचनात्मक कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांना एकत्र व्यासपीठावर आणून त्यांच्यात आदिवासी व दलितांच्या समस्यांबाबत आणि विकासाबाबत सुसंवाद घडवून आणणे.

मानव विज्ञान व सामाजिक शास्त्र यांच्या शिक्षकांना व विचारवंतांना, मुख्यत: आदिवासींबाबत अभ्यासकांना एकत्र आणणे.

मानव विज्ञानाच्या सर्व शाखांत अध्ययन, संशोधन प्रकाशन.

या उद्देशाने 'महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद' स्थापन करण्यात आली आहे. याच उद्देशाचे मूर्त स्वरुप म्हणून 'हाकारा' त्रैमासिक सुरु करण्यात आले आहे. परिषदेचे सदस्यत्व स्वीकारुन आपणही या कार्यात सहभागी व्हावे. (संस्थांना फक्त 'हाकारा' चे वार्षिक सदस्यत्व मिळेल)

## मानव विज्ञान परिषदेचे सदस्यत्व

आजीव सभासद ५०० रुपये (फक्त व्यक्तींसाठी)

हाकारा वार्षिक सभासद ५० रुपये (व्यक्ती व संस्था दोन्ही)

परिषदेच्या सभासदांना 'हाकारा' विनामूल्य पाठविला जातो. आपले सदस्यत्व आणि वार्षिक वर्गणी कृपया खालील पत्त्यावर 'महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद' (दि महाराष्ट्र असोसिएशन ऑफ अॅन्थ्रॉपॉजिकल सायन्सेस) यांचे नावे डिमांड ड्राफ्ट अथवा मनी ऑर्डरने पाठवावी. मनीऑर्डर करताना फॉर्ममागे कृपया आपले पूर्ण नाव व पूर्ण पत्ता लिहिण्यास विसरू नये.

**पत्रव्यवहाराचा पत्ता :**


रा. के. मुटाटकर, सचिव<br>
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद<br>
६४, आनंद पार्क, औंध,<br>
पुणे - ४११ ००७.


**आपल्या क्रियाशील सहकार्याची अपेक्षा आहे.**


महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाने या नियतकालिकास अनुदान दिले असले तरी नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ व राज्य शासन सहमत असेलच असे नाही.

Registered with the Registrar of News Papers of India Under No. 35835/80





Printed by Assign Systems, Pune - 30